# एम.ए (राज्यशास्त्र)

## सत्र - IV (CBCS)

## पेपर - II

# माहितीचा अधिकार

## विषय कोड : 91695-J

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ संतोष बालासाहेब कोल्हे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी.

**लेखक** : **डॉ संतोष बालासाहेब कोल्हे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र,
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी.

**फेब्रुवारी २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार (फ्रेमवर्क) | १ |
| २ | भारतात माहिती अधिकाराचा विकास | १७ |
| ३ | माहितीचा अधिकार कायदा २००५ : सार्वजनिक प्राधिकरणाचे दायीत्व | ४२ |
| ४ | मुक्त माहिती आणि भविष्यातील मार्ग | ७३ |

एम.ए (राज्यशास्त्र)

सत्र - iV (CBCS)

# पेपर - II

# माहितीचा अधिकार

अभ्यासक्रम

**1. International Framework** **(15 Hours)**

a) Theories of Right to Information (RTI)
b) History of RTI in the World
c) International Laws on Transparency

**2. Development of RTI in India** **(15 Hours)**

a) Supreme Court/High Courts judgments
b) Initiatives and Movements: NCPRI, CHRI, Anna Hazare, MKSS and others
c) Information Acts in States

**3. RTI Act 2005: Obligations of Public Authorities** **(15 Hours)**

a) Eligibility of applicants
b) Public authority obligations about *suo motto* disclosures, Appointment of PIO and their duties
c) Submissions and Disposal of Applications

**4. Exempt Information and Future Trajectory** **(15 Hours)**

a) Exemptions, Larger public interest and copyrights
b) Severance of information, Third Party Information
c) Whistleblower Act, Right to Hearing, Grievance Redressal Bill, Right to Public Services

**Reading List:**


1. Alfredsson, G. .(1999) *The Universal Declaration of Human Rights:A Common Standard of Achievement* 1 ) edition .(Springer.
2. Basu, D. .(2013) *Introduction to the Constitution of India*) Twenty-First edition .( LexisNexis
3. Bakshi, P. M. (2014). *The Contitution of India.* New Delhi: Universal Law Publishing Company.
4. Bhattachrya,A., & Ghosh, B.K. (2010). *Human Rights in India*. Kolkatta: Setu Prakashani
5. Blaugh, R., & Schwarzmantel, J. (2004). *Democracy a Reader.* Edinburgh: Edinburgh University Press.
6. Carolyn M. Elliot. (2003). *Civil Society and Democarcy.* New DElhi: Oxford University Press.
7. Government of Inda. (2006). *The Right to Information Act, 2005.* New Delhi:

8. Government of India. (2006). *Official Sectrets Act, 1923.* New Delhi: Professional Book Publishers.
9. Jayal, N. G., & Mehta, P. B. (2011). *Oxford Companion to Politics in Inda.* New Delhi: Oxford University Press.
10. Kashyap, S. (2011). *Our Parliament.* New Delhi: National Book Trust.
11. Kishwar, M. P. (2006). *Deepening Democracy Challenges of Governance and Globalisation in India.* New Delhi: Oxford University Press.
12. Kumbhar, V. (2012). *Pailu Majitichya Adhikarache.* Pune: Prajakta Prakashan.
13. Narayan, V. .(2015) *Right to Information-A route to good Governance.* Mumbai: BCAS Foundation.
14. Nile, M. J. (2014). *Right to Information: An Intervention Towards Participatory Governance in Maharashtra.* Navi Mumbai: NavVishnu.
15. O'Byrne, D.J. (2008). Human Rights: an Introduction. New Delhi: Dorling Kindersely (India) Pvt. Ltd.
16. Ramchandran, R. (2006). *Urbanisation and Urban Systems in India.* New Delhi: Oxford University Press.
17. Ryder, R. D. (2006). *Right to Information: Law-Policy and Practice.* Nagpur: Wadhwa and Company.
18. कार्मिक जन तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय भारत सरकार) .२००९ .(*माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मार्गदर्शिका*) .सार्वजनिक धोरण केंद्र यशदा, अनु (.नवी दिल्ली.
19. सार्वजनिक धोरण केंद्र, यशदा .*माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि महत्वाच्या संकल्पना दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका क्र.१*. पुणे : यशदा.
20. सार्वजनिक धोरण केंद्र, यशदा .*सार्वजनिक प्राधिकरणे आणि त्यांच्या जबाबदाऱ्या दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका क्र.२*. पुणे : यशदा.
21. सार्वजनिक धोरण केंद्र, यशदा .*माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आणि त्याअंतर्गत नियम, दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका क्र.३* .पुणे :यशदा.
22. सार्वजनिक धोरण केंद्र, य) .एन .डी .(.*माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शासन आदेश, परिपत्रके आणि महत्वपूर्ण न्यायनिर्णय दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका क्र.४*. पुणे : यशदा.
23. सार्वजनिक धोरण केंद्र, यशदा .*जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांची कार्यपद्धती दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुस्तिका ५*. पुणे : यशदा

# १

# आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ (अ) माहिती अधिकाराचे सिद्धांत

१.४ (ब) जागतिक माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.५ (क) पारदर्शकते वरील आंतरराष्ट्रीय कायदे

## १.१ उद्दिष्टे

१. आंतरराष्ट्रीय माहिती अधिकाराचे स्वरूप माहिती होईल.

२. जगातील माहिती अधिकाराचा इतिहास जाणून घेता येईल.

३. पारदर्शकते वरील आंतरराष्ट्रीय कायद्यांची माहिती प्राप्त होईल**.**

## १.२ प्रास्ताविक

भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. त्यानुसार संसदीय लोकशाहीचा अवलंब करण्यात आला आहे. निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाही शासन व्यवस्थेचे संचलन केले जाते. लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये नागरिकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत नागरिकांच्या सुख, सोयीसाठी राज्यकारभार केला जातो. अमेरिकेचे पूर्व राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी म्हटल्या प्रमाणे “लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही होय.” असा लोकशाहीचा अर्थ लावला आहे. आदर्श लोकशाही व्यवस्था म्हणजे सर्व निर्णय सर्वांनी मिळून घेणे परंतु नागरिकांच्या अफाट संख्येमुळे हे अशक्यप्राय आहे. प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे नागरिक राज्यकारभार चालविण्यासाठी आपले प्रतिनिधी निवडून देतात. निवडणुका, मतदानाचा हक्क, स्वतंत्र न्यायव्यवस्था, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, शासनव्यवस्था, इत्यादी राज्यकारभार व्यवस्थितपणे चालवण्यासाठी राज्यघटना तिला अनुसरून कायदे, नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, इत्यादी तरतुदी आज लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये अंतर्भूत होतात. घटनेच्या कलम १२ ते ३५ यामध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कात नागरि स्वातंत्र्याचा हक्क अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भारतीय राज्यघटनेतील कलम १९ ते २२ मध्ये नागरिकांना उपलब्ध असलेल्या विविध स्वातंत्र्याच्या हक्कांच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्याघातानेतील १९ व्या कलमातून ऊलेखलेले स्वातंत्र्य हा स्वराच्या सुसंस्कृत समाजात राहताना व वावरताना अशा स्वातंत्र्याचा उपभोग कसा घ्यावा याची तरतूद करण्यात आली आहे. स्वातंत्र्याचा उपभोग

घेताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यवर मर्यादा येणार नाहीत. याची जबाबदारी देखील नागरिकांनी घेणे आवश्यक असते. जास्तीत जास्त नागरिकांना जास्तीत जास्त स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा. म्हणून अशा स्वातंत्र्यावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याचा आणि तसे कायदे करण्याचा अधिकार सरकारला आहे. आणि म्हणून ज्या देशाच्या नागरिकांना सर्वाधिक स्वातंत्र्य बहाल केलेले असते तेच राज्य किंवा राष्ट्र श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते. या स्वातंत्र्याच्या हक्काचा उपभोग घेण्यासाठी व्यक्तीला माहितीच्या अधिकाराची आवश्यकता होती.

**माहिती अधिकार**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ मधील स्वातंत्र्याचा हक्क बजावण्यासाठी नागरिकांना सरकारी कामकाजाची माहिती मिळणे अत्यावश्यक आहे. नागरिकांना शासकीय व निमशासकीय आस्थापणेतून योग्य ती माहिती मिळावी, असा न्यायालयांचा पहिल्यापासून दृष्टिकोन होता. नागरिकांना माहिती मिळवण्याच्या हक्कांविषयी लोकशाही देशांमध्ये कायदे अमलात आल्यानंतर भारतातही सजक नागरिकांकडून, सामाजिक संस्थांकडून, तसेच न्यायालयांकडून दबाव वाढल्यानंतर २००२ साली माहिती स्वातंत्र्य कायदा २००२ संमत करण्यात आला. त्यानुसार २००५ साली माहिती अधिकार कायदा ‘राईट टू इन्फॉर्मेशन ॲक्ट’ हा अधिक व्यापक प्रमाणात तयार करण्यात आला. या कायद्यान्वये नागरिकांना सरकारी व निमसरकारी खात्यातून व अस्थापनातून माहिती मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय, राज्य व स्थानिक अशा सर्व स्तरावर यंत्रणा उभारण्यात आली आहे. सार्वजनिक कामात पारदर्शकता आणणे व जबाबदारीने शासन चालवणे, हे या कायद्याचे मुख्य उद्देश आहेत. या कायद्याने माहितीच्या क्षेत्रात जनू क्रांतीच घडून आली आहे. सामान्य नागरिकाच्या हातातील ते मोठे शस्त्र मानले जाते. भारतीय प्रशासनातील हा सर्वात महत्त्वाचा कायदा मानला जातो.

## १.३ (अ) माहिती अधिकाराचे सिद्धांत किंवा दृष्टीकोन

**(Theories of Right to Information (RTI)**
**(माहितीच्या अधिकाराची गरज आणि महत्त्व)**

### १.३.१ सरकारची पारदर्शकता :-

भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे लोकांनी लोकांसाठी चालवलेल्या शासन म्हणजे लोकशाही होय. या व्याखेप्रमाणे लोकशाही शासन व्यवस्था पारदर्शक करावयाची असेल. तर नागरिकांना अधिकाधिक हक्क बहाल करावी लागतात. नागरिकांचे शासन व्यवस्थेवरती पूर्णतः नियंत्रण असले पाहिजे. त्यासाठी सरकारची पारदर्शकता देखील तेवढीच महत्त्वाची आहे. शासनाला लोकांचे प्रतिनिधी म्हणून भूमिका पार पाडावी लागते. अर्थात विकासात्मक धोरण राबवत असताना योग्य त्या गोष्टीवर संचित निधीचा वापर करावा लागतो. तसेच खर्चाचा ताळमेळ व हिशोब ठेवावा लागतो. या सर्व घटकांची माहिती घेण्याचा अधिकार जनतेला बहाल करण्यात आला आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारामुळे सरकारला आपली जबाबदारी ही पारदर्शकपणे पार पाडावी लागते. एक प्रकारचे जनतेचे नियंत्रण शासनाच्या कामकाजावर या कायद्यामुळे निर्माण झालेले असते. त्यामुळे या

कायद्याचे महत्त्व नाकारता येत नाही. तसेच या कायद्यामुळे लोकशाही शासन व्यवस्था जिवंत व अधिक लोकाभिमुख बनत आहे.

### १.३.२ सरकारची जबाबदारी :-

भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे विकेंद्रीकरणाचे तत्व अवलंबिण्यात आले आहे. ग्रामीण पातळीपर्यंत राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यात आले आहे. निवडणुकीच्या माध्यमातून या सर्व स्तरातील नेतृत्वाला राजकारणामध्ये सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे प्रतिनिधींच्या संदर्भातील सर्व प्रकारची माहिती  सर्वांनाच व मतदारांना प्राप्त करता यावी. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून माहिती अधिकाराची निर्मिती करण्यात आली आहे. तेवढ्याच जबाबदारीने सरकारची जबाबदारी ही आहे की, अधिकाधिक लोकांना शासन व्यवस्थेत सामावून घेऊन शासकीय कामकाजाची माहिती सामान्य जानतेपर्यंत प्रसारित करावी. जेणेकरून सरकारच्या कामामध्ये अधिक गतिशीलता आणि पारदर्शकता निर्माण होईल.

### १.३.३ लोकसहभाग :-

लोकशाही शासन व्यवस्थेत केंद्रीय पातळीपासून ते ग्रामीण पातळीपर्यंत राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. शासकीय व राजकीय प्रक्रियेत सर्व नागरिकांना नेतृत्व करण्याची व सहभागी होण्याची समान संधी निर्माण करून देणे गरजेचे आहे. तसेच सर्व प्रकारच्या निर्णय प्रक्रियेमध्ये लोकसहभाग असणे आवश्यक आहे. आज ग्रामीण पातळीवर ग्रामसभेसारख्या सभांमधून ग्रामीण नागरिकांना आपले मत व्यक्त करता येते किंवा लोकप्रतिनिधींना कामकाजाबद्दल जाब विचारता येतो. अर्थात या सर्व प्रक्रियेमुळे तळागाळापर्यंत लोकसहभाग वाढवता येतो.

### १.३.४ दारिद्र्य निर्मूलन :-

भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी अनेक आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे त्यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने अनेक कल्याणकारी योजना भारतात राबविण्यात येतात. या सर्व योजनांच्या संदर्भातील खर्चाचे हिशोब तसेच या योजनेचा लाभ योग्य लाभार्थीपर्यंत पोहोचवण्यात आला आहे किंवा नाही या सर्व घटकांची माहिती नागरिकांना प्राप्त करता येते. यातून लाभार्थीपर्यंत योजनेचा लाभ प्राप्त झाल्यामुळे दारिद्र्याचे निर्मूलन घडून आणता येते. यावरून असे लक्षात येते की, दारिद्र्य निर्मूलनामध्ये माहिती अधिकाराची महत्त्वाची भूमिका आहे.

### १.३.५ भ्रष्टाचार निर्मूलन :-

भारतीय प्रशासनामध्ये आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने भ्रष्टाचार होताना दिसून येतो. भ्रष्टाचारावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी अनेक महत्वपूर्ण कायदे करण्यात आले आहेत. मात्र त्यांचा फारसा उपयोग होताना दिसत नाही. अण्णा हजारे यांनी यासाठीच लोकपाल विधेयक लोकप्रतिनिधींना देखील लागू करावे. यासाठी आग्रह धरला होता. त्याचे फलित म्हणून माहिती अधिकार कायदा निर्माण करण्यात आला. या कायद्याच्या भीतीपोटी आज

भ्रष्टाचाराचे निर्मूलन होत आहे. नोकरशाहीची प्रशासकीय दिरंगाई देखील यामुळे कमी होत आहे.

### १.३.६ नागरी स्वातंत्र्याचे रक्षण :-

भारतीय घटनेने नागरिकांना कलम 19 नुसार पुरेशे स्वातंत्र्य बहाल केले आहे. मात्र स्वातंत्र्याचा उपभोग घेत असताना प्रशासकी दिरंगाई सरकारची पारदर्शक भूमिका व सरकारची जबाबदारी या सर्व घटकांची जाण ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येकाला आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा आणि आपली सर्वांगीण प्रगती साधता यावी. याकरिता माहिती अधिकाराची आवश्यकता आहे. माहिती अधिकारामुळेच नागरिकांच्या परस्पर स्वातंत्र्याची रक्षण करता येऊ शकते.

### १.३.७ संसदीय माहितीमध्ये प्रवेश :-

संसदीय शासन पद्धतीत निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींच्या हाती व सत्ताधारी पक्षाच्या हाती सत्तेची सूत्रे सोपीविली जातात. त्यामुळे लोकांच्या वतीने लोक मतानुसार व लोकांच्या इच्छेनुसार शासन कारभार चालवला जातो. तसेच सर्व समाज घटकांना विचारात घ्यावे लागते. त्यासाठी संसदीय पातळीवर राबविल्या जाणाऱ्या कामकाजाची माहिती सर्वसामान्यांना प्राप्त व्हावी यासाठी माहिती अधिकाराची आवश्यकता प्रकर्षाने निर्माण झाली आहे. या कायद्याच्या माध्यमातून आज नागरिकांना संसदीय कामकाजाची व प्रक्रिया बद्दलची माहिती सहज प्राप्त होत आहे.

### १.३.८ आर्थिक वृद्धीची समानता :-

भारतात आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आणि आर्थिक विषमतेची दरी नाहीशी करण्यासाठी आणि आर्थिक वृद्धी घडवून आणण्यासाठी अनेक पातळीवर उपाययोजना केल्या जातात. उत्पन्नाचे समान वाटप करणे, तसेच उत्पन्नाचे स्त्रोत सर्वसामान्यांना उपलब्ध करून देणे, समान कामासाठी सामान वेतन देणे, कामाचे तास निश्चित करणे व योग्य मोबदला मिळवण्याचा हक्क प्रत्येकाला बहाल करण्यात आला आहे. तसेच विविध योजनेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला रोजगारहमी योजनेसारख्या योजनेतून प्राप्त करता येतो. प्रत्येक नागरिकांसाठी अन्न, वस्त्र व निवारा या किमान मूलभूत गरजा भागविण्यासाठी आर्थिक वृद्धीची समानता या घटकाला महत्त्व देण्यात आले आहे. या सर्व घटकांच्या अनुषंगाने माहिती अधिकाराला प्राधान्य देण्यात आले आहे. या कायद्यामुळेच आर्थिक घटकांना नियंत्रित केले जाते.

### १.३.९ सु-शासन :-

भारताने कल्याणकारी राज्याचा स्वीकार केल्यामुळे प्रत्येक नागरिकांना विकासाची पुरेशी समान संधी उपलब्ध करून देण्यात येते. कल्याणकारी या शब्दासाठी आज सुशासन असा शब्दप्रयोग करण्यात येतो अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनाच्या अवचित त्याने २५ जानेवारी रोजी सुशासन दिन साजरा केला जातो. सुशासन म्हणजे एक आदर्श व चांगल्या दर्जाचे शासन होय. प्रत्येक नागरिकाला आवश्यकतेप्रमाणे शिक्षण रोजगार आरोग्य व अन्न वस्त्र निवारा या सर्व मूलभूत घटकांची पूर्तता केली जाते. नागरिकांना सुखी समृद्धी व प्रतिष्ठा

पूर्वक जीवन जगता यावे. नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला जावा. या अनुषंगाने सर्व सुख सुविधा नागरिकांना प्राप्त करण्याचा हक्क बहाल करण्यात आला आहे. त्यासाठी माहिती अधिकाराची निर्मिती करून सुशासनाच्या माध्यमातून न्याय प्रदान करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

### १.३.१० ई- गव्हर्नन्स :-

आज माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगती व विकासामुळे आणि प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकापर्यंत शासकीय व राजकीय प्रक्रियेची माहिती पोचविले जाते. तसेच नागरिकांच्या अपेक्षा इच्छा व अकांशा व भावना शासनापर्यंत पोहोचविलया जातात. या अनुषंगाने अधिकाधिक माहिती प्रसारित केली जावी. जेणेकरून त्यातून पारदर्शकता प्रस्थापित व्हावी. या उद्देशाने आज ई- गव्हर्नन्स या घटकाला प्राधान्य दिले जात आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाला घरबसल्या आज विविध योजनांची माहिती पुरविली जाते. ई- गव्हर्नन्स मुळे माहिती अधिकाराला आज जास्तीत जास्त महत्त्व प्राप्त होत आहे. तसेच ई-गव्हर्नन्स मुळे सामान्य नागरिकाच्या कामकाजाच्या पद्धतीमध्ये गतिशीलता निर्माण झाली आहे.

### १.३.११ नागरिक केंद्रित दृष्टिकोन :-

आज माहिती अधिकाराच्या माध्यमातून नागरिक केंद्रित दृष्टिकोन जोपासण्याचा प्रयत्न केला जात आहे. नागरिकांना येणाऱ्या प्रत्येक अडथळे व अडचणींना सामोरे जाता यावे. नागरिकांना स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणता यावा यासाठी या कायद्याची आवश्यकता होती. हा कायदा निर्माण करण्यामागे नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगता यावे. यासाठी माहिती केंद्रित व नागरिक केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात आले आहे.

### १.३.१२ माहिती अधिकार आणि मानवी अधिकार :-

आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघाच्या पुढाकाराने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. आणि आंतरराष्ट्रीय मानवी हक्क जाहीरनामा (Universal Declaration) प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये जगातील सर्व नागरिकांना २९ प्रकारचे महत्वपूर्ण हक्क प्रदान करण्यात आले आहेत. याच अनुषंगाने भारतीय राज्यघटनेने कलम १२ ते ३५ मध्ये भारतीय नागरिकांना मूलभूत हक्क बहाल केले आहेत. अर्थात या मानवी हक्क व मूलभूत हक्क यांची पायमल्ली किंवा उल्लंघन होऊ नये. नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर मर्यादा येऊ नयेत. यासाठी माहिती अधिकाराची निर्मिती करण्यात आली आहे. नागरिकांचे मूलभूत हक्क अबाधित ठेवावयाचे असतील तर माहिती अधिकाराचा अधिक पारदर्शकपणे उपयोग करावा लागेल. माहिती अधिकारामुळेच आज मूलभूत हक्कांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.४. (ब) जागतिक माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी (History of RTI in the World)

जागतिक स्तरावर कार्यरत असणाऱ्या जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वित्तीय संस्थांनी धोरणात्मक पाऊल म्हणून वित्तपुरवठा करतांना शासकीय क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त आणि अधिक पारदर्शी बनविण्याची अट प्रत्येक विकसनशील व अविकसित राष्ट्रासमोर

ठेवली. सन १९९० पर्यंत जगातील केवळ १३ देशांनीच राष्ट्रीय स्तरावर माहितीचा अधिकार कायदा लागू केला होता. त्यानंतर आशिया खंडात जपान, दक्षिण कोरियासह अनेक राष्ट्रांनी हा कायदा अंमलात आणला. परिणामी, आज जगातील ८५ पेक्षा अधिक देशात माहिती अधिकाराचा कायदा लागू झाला आहे. मुळातच नव्वदचे दशक हे माहितीच्या विस्फोटाचे दशक मानले जाते. उदारमतवादी आणि प्रगल्भ लोकशाहीसाठी माहितीचे प्रवाह खुले असले पाहिजे असे या काळात अधिकच सुस्पष्ट होत गेले आहे. नव्वदच्या दशकात जगात आंतरराष्ट्रीय धोरणांचा सकारात्मक परिणाम म्हणून माहिती अधिकाराची प्रक्रिया गतिमान होत गेली.

माहितीच्या अधिकार कायद्याला केवळ प्रशासन सुधारण्याचा कायदा असे न मानता, सर्वत्र मूलभूत मानवी अधिकार म्हणून मान्यता मिळाली आहे. दक्षिण आफ्रिकेत शासकीय क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्रालाही या कायद्याच्या चौकटीत आणावे, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील माहितीचा अधिकार नागरिकांना असावयास पाहिजे, असा विचार मांडल्याने जगातील विविध देशांनी या अधिकाराचा समावेश राज्यघटनेत करुन हा अधिकार बहाल केला. आपल्या देशाच्या राज्यघटनेत माहिती अधिकाराचा स्पष्ट उल्लेख नसला, तरी तो मूलभूत अधिकारात अंतर्भूत असल्याचे मानले जाते.

कोणत्याही राष्ट्रामध्ये एखादा कायदा नव्याने निर्माण केला जात असल्यास सर्वप्रथम त्या कायद्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरते. ही अंमलबजावणी करतांना सरकारला त्यांच्या विविध अंतर्गत धोरणांमध्ये कधीकधी बदल करावा लागतो. याशिवाय प्रस्थापित शासना बरोबरच त्या राष्ट्रातील नागरी समाजालाही नव्याने निर्माण केलेले अधिकार आणि कायदा याबद्दल जागरूक राहावे लागते. जबाबदार शासन पध्दतीत व्यक्तीला अधिकार दिले गेले असले तरीही शासन हे अधिकार, निर्णय कधीकधी लांबणीवर टाकते, बऱ्याचदा कायद्यातील तरतुदीनांही अनेकदा पूर्णविराम मिळतो. प्रत्येक अधिकाऱ्यामध्ये परिपूर्णता असणे स्वाभाविकतः शक्य नसते. अर्थात माहितीचा अधिकार कायदा हा मूलभूत हक्का एवढाच आवश्यक असला तरी जगातील बहुतांश राष्ट्रामध्ये हा कायदा म्हणावा तेवढा प्रभावी ठरू शकला नाही.

जगात पहिल्यांदा माहितीचा अधिकार हा 'स्वीडन' या राष्ट्राने १७७६ मध्ये नागरिकांना प्रदान केला. या कायद्याचे महत्व विविध राष्ट्रांना जरी वाटत असले तरी या कायद्याबाबतची जाणीव काही राष्ट्रामध्ये योग्य प्रकारे होऊ शकली नाही. झिंम्बाबे या राष्ट्रात गुप्ततेचा कायदा आणि माहितीच्या कायद्यामध्ये वृत्तत्रांवर अनेक प्रकारची बंधने लादली गेली आणि या अधिकाराने मिळणाऱ्या पूर्ण तरतुदींना स्थगिती आली. पेरूग्वे मध्ये भाषणावर बंधने आल्याने प्रसारमाध्यमे आणि नागरी समाज यांनी सरकार विरूध्द बंड पुकारून निर्माण केलेला प्रस्थापित कायदा हा अयोग्य स्वरूपाचा असून तो तात्काळ रद्द करावा असे सांगण्यात आले. सर्बियामध्ये जन माहिती अधिकाऱ्यामार्फत कायद्यातून मिळणारी माहिती लोकांपासून दूर ठेवण्यात येत होती. अल्बानिया मध्ये हे अधिकार नव्याने निर्माण केले असले तरी त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होऊ शकली नाही, याचे कारण म्हणजे तेथील शासन पध्दती आणि नोकरशाही यांच्यात असलेला निरूत्साह होय. वरील विशिष्ट राष्ट्रात जनकल्याणपुरक शासन व्यवस्था अस्तित्वात नसल्याने या देशात माहिती अधिकार कायदा तितक्या प्रमाणात

यशस्वी झाला नाही, जेवढा लोकशाहीप्रधान राष्ट्रांमध्ये झाला. हा कायदा स्वीडन बरोबरच फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इत्यादी राष्ट्रात अस्तित्वात आणला गेला.

माहिती अधिकार कायद्याची जागतिक पार्श्वभूमी अभ्यासतांना असे दिसून येते की, विविध आंतरराष्ट्रीय संघटना आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानेही या कायद्यास मान्यता दिल्याचे सिद्ध झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा प्रकर्षाने उल्लेख करता येईल.

### १.४.१ The General Assembly Resolved 1946 :-

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या प्रथम अधिवेशनात नागरिकांचे माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य हे मूलभूत अधिकारातील एक भाग असून तो संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या नागरिकांच्या सर्व स्वातंत्र्याची आधारशिला आहे. "Freedom of Information is a fundamental Human Right and the touch stone for all freedoms to which the United Nations is concentrated." या अधिकारास आमसभेने नागरिकांच्या सर्व स्वातंत्र्यापैकी महत्त्वाचा हक्क मानला आहे.

### १.४.२ Universal Declaration of Human Right - 1948 :-

संयुक्त राष्ट्र संघटनेने डिसेंबर १९४८ मध्ये मानवी हक्काच्या जागतिक घोषणापत्रात माहितीच्या हक्कांचा समावेश करून त्याला जागतिक स्तरावर मार्ग मोकळा करून दिला आहे. त्यातील कलम १९ नुसार "Everyone has right to freedom of opinion an expression, this right includes freedom to hold opinion without interferenced and to seek, receive and impart information and ideas through any media regardless of frontiers."

यानुसार प्रत्येक व्यक्तीला विचाराचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे. कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय विचार निर्मित करण्याचा आणि व्यक्त करण्याचा समावेश या अधिकारात करण्यात आला आहे. देशांच्या सीमांचा विचार न करता कोणत्याही माध्यमातून माहिती एकत्र करणे आणि ती लोकांपर्यंत पोहोचविणे असे या घोषणापत्रात सांगितले आहे.

### १.४.३ American Declarations of the Right of Man -1948 :-

सर्व व्यक्ती निसर्गत: स्वतंत्र असून ते त्यांच्या बुद्धी आणि विवेकानुसार इतरांशी बंधुभावाने वागतात. American declarations of the right of man मधील कलम १ व ४ नुसार

"Every human being has the right to life, liberty and the security of his person. Every man has the right to freedom of investigation of opinion and of the expression and dissemination of ideas, by any medium whatsoever."

या कलमानुसार प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि त्याच्या खाजगी सुरक्षिततेचा अधिकार आहे. या बरोबरच त्यास मत व्यक्त करण्याचे तसेच त्याला अवगत असलेल्या कोणत्याही भाषेत विचार व कल्पना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे.

### १.४.४ The European Convention on Human Right -1950 :-

संयुक्त राष्ट्र संघटना आणि युनेस्कोच्या मानवी अधिकार व राजकीय अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत माहिती अधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यातील कलम १० नुसार प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. तो आपल्या विचारांची देवाण घेवाण करू शकतो.

"Everyone has the right to freedom of expression. This right shall include freedom to hold opinions and to receive and impart information and ideas without interference by public autority regardness of frontiers. This article shall not present states from requiring the licensing of broadcasting, television or cinema enterprises."

### १.४.५ International Convention on Civil and Political Right -1966 :-

संयुक्त राष्ट्राच्या घोषणापत्रकानुसार मानवाला हक्क आणि प्रतिष्ठा मिळण्यासाठी आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय हक्क घोषीत केले. त्यातील कलम १९ नुसार, "Everyone shall have the right to hold opinions without interference. Everyone shall have the right to freedom of expression, this right shall include freedom to seek, receive and import information and ideas of all kinds, regardless of frontiers, either orally, in writing or in print, in the form of art, or through any other media of his choice."

यानुसार व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यात सर्व प्रकारची माहिती गोळा करणे, एकत्र विचार करून लोकांपर्यंत पोहोचवणे, देशाच्या सीमांचा विचार न करता तोंडी, लेखी किंवा त्याला जो प्रकार आवडेल त्या प्रकारातून माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य आहे.

या प्रतिज्ञापत्रात कोणत्याही व्यक्तीला माहिती मिळविण्याचा हक्क असल्याचे मान्य करण्यात आले असून, तो अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी महत्त्वाचा आहे, असे म्हटले आहे.

### १.४.६ United Nations Educational, Scientific and Cultural Organisation -1978 :-

युनेस्कोच्या या प्रपत्रानुसार, "विचार, अभिव्यक्ती आणि माहितीच्या अधिकाराला मानवी अधिकारासारखे महत्व द्यायला पाहिजे किंवा स्वातंत्र्याच्या अधिकारासारखी मान्यता द्यायला पाहिजे."

### १.४.७ The African Charter on Human and Peoples Right -1981 :-

आफ्रिकेमध्ये व्यक्तीचे स्वातंत्र्य, समता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यांचे महत्व समजून लोकांना कायदेशीर हक्क प्रदान करण्यात आले. यातील कलम ९ नुसार, "Every individual shall have the right to receive the information. Every individual shall have the right to express and dissminate his opinions within the law."

प्रत्येक व्यक्तीला या कायद्यामुळे माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला असून तो त्याचा उपयोग आपल्या विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी करू शकतो. याशिवाय 'मेनीवासेस वन वर्ल्ड' च्या अहवालात असे म्हटले आहे की, "माहितीच्या अधिकाराशिवाय व्यक्ती स्वातंत्र्याची कल्पना पूर्ण होणार नाही."

माहितीचा अधिकार कायदा हा व्यक्ती स्वातंत्र्यासाठी किती महत्त्वाचा आहे. हे वरील सर्व संस्थांच्या प्रपत्रानुसार स्पष्ट होऊ शकते. आज जगातील बहुतांश विकसीत राष्ट्रांबरोबरच विकसनशिल राष्ट्रांमध्येही हा कायदा अस्तित्वात आणला गेला. लोकशाहीप्रधान शासनपध्दती मध्ये माहितीचा अधिकार कायदा हा त्या देशाच्या आर्थिक, औद्योगिक, आणि सामाजिक विकासाचा कणा बनत चालला आहे. देशाला सर्व क्षेत्रामध्ये यशस्वी करण्यासाठी, कल्याणासाठी आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आणला आहे. यामध्ये प्रामुख्याने स्वीडन, जर्मनी, फिनलॅड, डेन्मार्क, अमेरिका, नॉर्वे, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सोव्हिएट रशिया, इंग्लंड, भारत या राष्ट्रात माहिती अधिकार कायद्याचे महत्व वाढून तेथील शासन पध्दतीत बदल होताना दिसत आहे.

## १.५ (क) पारदर्शकते वरील आंतरराष्ट्रीय कायदे:- (International Laws on Transparency)

### १.५.१ स्वीडन :-

जगामध्ये स्वीडन या राष्ट्राने सर्वप्रथम माहितीचा अधिकार कायदा १७६६ मध्ये जनतेला बहाल केला. "राज्य शासन आणि स्थानिक संस्थांकडे असणारी सर्व माहिती, लेखे आणि दस्तऐवज स्वीडीश नागरिकांना उपलब्ध व्हावेत" असे १७६६ च्या कायद्यानुसार सांगण्यात आले. त्यानंतर या कायद्यामध्ये थोडी दुरूस्ती करून १८१० आणि १९४९ मध्ये खऱ्या अर्थाने घटना दुरुस्ती करून तो जनतेला अर्पण करण्यात आला. स्वीडनच्या घटनेतील कलम १३ अन्वये नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. त्यामध्ये, "स्वीडन मधील सरकारचे दस्तऐवज स्वीडीश नागरिकांना उघड स्वरूपात तपासण्यासाठी उपलब्ध असतात." असे म्हटले गेले. प्रत्येक प्रशासनामध्ये त्या त्या प्राधिकरणातील नोंदी आणि कागदपत्रे जपून ठेवून ती स्वीडीश नागरिकांना हवी तेंव्हा द्यावी लागतील, असे म्हटले आहे.

स्वीडन मधील या अधिकारामुळे प्रत्येक सामान्य नागरिकाला पंतप्रधानाच्या कचेरीत जाऊन हवी ती माहिती घेण्याचे स्वातंत्र्य मिळाल्याने खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात आली. यामध्ये नोंदवह्या, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मिळविण्याची माहिती. या अंतर्गत साहित्य, मसूदा, आणि वरवरची माहिती जी कार्यालयाच्या व्यतिरिक्त आहे त्यांना यातून वगळले आहे. मात्र त्या कार्यालयाची सत्य माहिती ज्यावर निर्णय झालेला आहे. अशी माहिती देणे बंधनकारक आहे. यामध्येच जी माहिती कार्यालयाच्या संबंधीत नाही, ती माहिती कार्यालयाबाहेर ठेवणे बंधनकारक केले आहे. यामध्ये काही बाबींना मात्र वगळण्यात आले आहे. उदा : राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्रीय संबंध, वित्तीय धोरण, गुन्हेगारी, वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन इत्यादी.

### **१.५.२ जर्मनी :-**

१९४९ मध्ये मान्य करण्यात आलेल्या 'फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी' च्या राज्यघटनेत ५ व्या कलमानुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबर माहितीचा अधिकार अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

### **१.५.३ फिनलँड :-**

१९५१ मध्ये फिनलँडने माहितीचा अधिकार कायदा लागू केला.'लॉ ऑन दि पब्लिक कॅरेक्टर ऑफ ऑफिशियल डाक्युमेंटस' या कायद्यानुसार माहितीचा अधिकार देण्यात आला. या अधिकारामुळे नागरिकांना सरकारी दस्तऐवज मिळू लागले.

### **१.६.४ डेन्मार्क :-**

१९६४ मध्ये डेन्मार्कने माहितीच्या अधिकाराचा कायदा केला; परंतु हा कायदा सर्वसामान्य कायद्यासारखा १९७० मध्ये घटनेचा भाग बनला आहे.

### **१.५.५ अमेरिका :-**

अमेरिकेने माहितीचा अधिकार कायदा १९६६ साली लागू केला आणि १९६७ मध्ये खऱ्या अर्थाने तो जनतेला प्रदान केला. तत्कालीन कायद्यामध्ये ज्या उणीवा होत्या, त्या १९८६ मध्ये दुरूस्त करण्यात आल्या. या कायद्यानुसार, "प्रत्येक व्यक्तीला, संस्थांना शासकीय कचेरीमध्ये माहिती विचारण्याचा अधिकार आहे. असे स्पष्ट करण्यात आले. या कचेरीमध्ये कार्यकारी संस्था, लष्करी विभाग आणि इतर संस्था ज्या शासन प्रणालीशी संबंधीत आहेत. यांचा समावेश होतो. या मध्ये विचारलेली प्रस्तुत माहिती २० दिवसांच्या आत देणे बंधनकारक केले आहे." माहिती अधिकारातून अमेरिकेने काही क्षेत्रे वगळली आहेत. यात प्रामुख्याने राष्ट्रीय सुरक्षा, अंतर्गत संस्थांचे नियम, कायद्याने संवर्धन केलेली माहिती, आर्थिक माहिती, वैयक्तिक गोपनीयता, वित्तीय संस्था आणि तेल विहिरी यांचा यात समावेश होतो.

अमेरिकेतील माहितीच्या स्वातंत्र्याचा कायदा विकेंद्रीत करण्यात आला आहे. अमेरिकन न्यायव्यवस्था विभाग संबंधीत मंडळांना या कायद्याचे मार्गदर्शन देते. या बरोबरच या कायद्यामुळे सरकारी मंडळाशी संबंधीत असणाऱ्या प्रत्येक क्षेत्रातील विभागांना संबंधित माहिती, त्यांची कार्ये, निर्णय पध्दती, योजना यांची माहिती व्यवस्था ठेवण्याचे आदेश देते. १९९६ च्या माहिती अधिकार कायद्याच्या दुरूस्तीनुसार प्रत्येक संस्थांना संबधित माहिती योग्य त्या वेळेत देण्यासाठी त्या कार्यालयाचे यांत्रिकीकरण(संगणकीकरण) करणे बंधनकारक ठरले आहे. " २००२ मध्ये सांघीक प्रशासनाला दोन अब्जापेक्षा जास्त बाबींची माहिती विचारण्यात आली होती."

अमेरिकेने जो माहितीचा कायदा लागू केला होता. त्याची कार्यक्षमता जाणून घेण्यासाठी २००३ मध्ये जो हिशोब तयार करण्यात आला. त्यामध्ये National Security Archive ने खालील प्रकारच्या अडचणी निदर्शनास आणून दिल्या.

- अपूर्ण आणि संस्थांची अर्धवट माहिती
- संबंधीत माहिती समजण्याची, अपयशाची भूमिका
- गहाळ झालेली माहिती
- अतिरिक्त अनुशेष
- संपूर्णपणे केलेले प्रशासकीय यंत्रणेचे विकेंद्रीकरण

### १.६.६ नॉर्वे :-

१९७० मध्ये नॉर्वेने आपल्या नागरिकांसाठी शासकीय दस्तऐवज मिळविण्याचा कायदा केलेला आहे. त्यानुसार कोणत्याही नागरिकाला हवी असलेली माहिती मिळू लागली.

### १.५.७ ऑस्ट्रेलिया :-

ऑस्ट्रेलियामध्ये माहितीचा कायदा १९८२ मध्ये करण्यात आला. यामध्ये प्रत्येक नागरिकाला हवी ती माहिती मिळविण्यासाठी ऑस्ट्रेलियन शासनाने खालील प्रकारची रचना केली होती. यामध्ये प्रामुख्याने

- त्या राष्ट्रातील प्रत्येक संस्थांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधीत माहिती, कार्ये आणि सत्ता जी नगारिकांच्या धोरणा विषयी संबंधीत आहेत. ती प्रसिध्द करणे अनिवार्य केले.
- यामध्ये जी माहिती लोकांना द्यायची आहे, ती संबंधीतांना द्यावी आणि जी माहिती या कायद्यातून वगळलेली आहे ती माहिती देण्याचे टाळले आहे.

याच कायद्यामध्ये १ डिसेंबर १९८२ रोजी मूलभूत प्रकारचा बदल करण्यात आला. यामध्ये प्रत्येक नागरिकाला १ डिसेंबर १९८२ पूर्वीची माहिती देण्याचे सूचित करण्यात आले. यामध्ये कोणत्याही व्यक्तीला 'माहितीची गरज' या विषयी विधान करण्याचा हक्क देण्यात आला नाही.

" ऑस्ट्रेलिया मध्ये नागरिकांना हवी ती माहिती देण्यासाठी संसदीय आयुक्ता सारख्या डेप्युटी आँबुडस्मनची नेमणूक केलेली आहे. संबंधीत माहिती ३० दिवसाच्या आत देणे या कायद्याने बंधनकारक केले आहे."

### १९८८ चा गोपनियतेचा कायदा :-

१९८८ च्या ऑस्ट्रेलियाच्या कार्यकारी मंडळात माहितीच्या गोपनीयतेची ११ तत्वे देण्यात आली. यामध्ये ज्या संस्था राष्ट्रीय सुरक्षा, सांघीक न्याय पध्दती, आर्थिक बाबी या संबंधीत आहेत. अशांना वगळले आहे. या तत्वामध्ये प्रामुख्याने व्यक्तीची माहिती जी गोळा करून दिली जाते. ती गुपीत ठेवण्याचे स्पष्ट केले आहे. " माहितीच्या गोपनीयतेच्या ६ व्या तत्वानुसार नागरिकांना कार्यकारी मंडळाने तयार केलेली माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. यातील तत्व क्र. ०७ नुसार प्रत्येक व्यक्तीला जी माहिती चुकीची आहे, ती दुरूस्त करण्याचा हक्क दिलेला आहे."

### १.५.८ कॅनडा :-

कॅनडा सरकारने माहिती जाणून घेण्याचा अधिकार १९८४ मध्ये संसदेमध्ये पास केला. या कायद्याचा मुख्य उद्देश, " प्रत्येक व्यक्तीला शासकीय यंत्रणेशी संबंधीत असलेल्या प्रत्येक प्राधिकरणातून त्यांची तत्वे आणि कार्ये यांची माहिती मिळवून देणे, असा होता." यामध्ये त्यांनी काही बाबींना नागरिकांपासून दूर ठेवले आहे. या कायद्यामुळे कॅनडीयन नागरिक आणि सहकारी संस्था अशा सर्वांना सांघीक प्रशासनाकडून दस्तऐवज मिळवून देण्याचा अधिकार प्रदान केला आहे. या दस्तऐवजात पत्रे, सूचना, बातम्या, छायाचित्र, योजना, आकृत्या, नकाशे, दृश्य फित आणि संगणक याद्या इत्यादींचा समावेश केला आहे.

**माहिती आयुक्त :**

कॅनडामध्ये माहिती आयुक्त हा संबंधीत जनतेच्या तक्रारी दूर करणारा प्रशासकीय अधिकारी आहे. हा प्रशासकीय अधिकारी सर्वश्रेष्ठ मानून त्याला तक्रारी दूर करण्याचे अनेक अधिकार दिलेले आहेत. हा अधिकारी नागरिकांच्या तक्रारी आणि शासकीय संस्था यामध्ये योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. नागरिकांच्या तक्रारी नुसार माहिती आयुक्त हा शासकीय संस्थांना त्यांच्या योजना, धोरणे यामध्ये हवे तसे बदल सुचवू शकतो.

**आयुक्त :**

कॅनडात नागरिकांकडून आलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी प्रशासनाकडून ऑबुडस्मन (प्रशासकीय अधिकारी) यांची नेमणूक केली जाते. गुप्ततेच्या कायद्यामुळे आयुक्ताला नागरिकांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी सर्व अधिकार दिलेले आहेत. यामध्ये हा आयुक्त संबंधित प्रशासनाशी व्यवहार करून योग्य तो निर्णय देण्याची भूमिका बजावतो. यामध्ये त्याला काही कार्ये पार पाडावी लागतात. त्यात प्रामुख्याने एखाद्या माहितीचे (शंकेचे) निरसन संबंधीत प्रशासनाकडून नागरिकाला झाले नसेल, तर ती माहिती निदर्शनास आणून देण्याचे तो कार्य करतो. कधी कधी तो ज्या बाबींमुळे कॅनडीयन गुप्ततेवर बंधने येतील अशा घटकांचा अभ्यास करतो. " कॅनडातील माहिती अधिकार कायद्यामध्ये संबंधित नागरिकाने विचारलेली माहिती १५ दिवसात देणे बंधनकारक आहे."

### १.५.९ रशिया :-

सोव्हिएट रशियामध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह १९८५ मध्ये सत्तेवर आले. रशियात साम्यवादी राजवट असल्यामुळे वृत्तपत्रांना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. रशियातील जनतेला देखील शासनाविरूध्द मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे सरकारच्या कोणत्या योजना लोकांपर्यंत पोहोचतात हे शोधण्याचा मार्गच उपलब्ध नव्हता. परंतु उदारमतवादी स्वभाव असलेला राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह सत्तेवर आल्यावर त्यांनी नागरिकांसाठी ग्लासनोस्त म्हणजेच मोकळेपणाचे किंवा खुलेपणाचे धोरण स्वीकारले. " मोकळेपणाची पहिली झलक दिसायला १९८५ पासूनच सुरुवात झाली. मोकळेपणाचा पहिला परिणाम अर्थात वृत्तपत्रांमध्ये, साहित्यात आणि कलाक्षेत्रामध्ये दिसायला लागला. रशियातील अप्रिय आर्थिक बाबी पूर्वी कधीच वृत्तपत्रामध्ये छापल्या जात नसत. त्या छापण्यास परवानगी मिळाली. रशियन साम्यवादी राजवटीतील घसरणारे आयुर्मान व बालमृत्युचे प्रमाण या विषयी धक्कादायक आकडेवारी प्रसिध्द होऊ लागली. शेतीच्या दूरावस्थेचे चित्र वृत्तपत्रांमध्ये स्पष्ट

होऊ लागले. टीका युक्त भाषणे, अपघात, बातम्या, एवढेच काय कम्युनिष्ट पक्षाच्या ऐतिहासिक घटनांवर देखील खुली टीका, टिप्पणी इत्यादी महत्वपूर्ण बातम्या छापल्या जाऊ लागल्या."

मोकळेपणा असला तर खरे चित्र समोर येऊ शकते, याची ग्लासनोस्त च्या धोरणापासून संपूर्ण जगाला जाणीव झाली आणि प्रशासनात मोकळेपणा असायलाच पाहिजे, असा विचार प्रभावी ठरू लागला, परंतु सध्या रशियात माहिती अधिकाराचा कायदा नाही.

### १.५.१० फ्रान्स :-

१७८९ च्या मानव अधिकाराच्या निर्णयातील कलम १५ नुसार फ्रान्सने देशातील लोकांना अंदाजपत्रकाची माहिती उघडपणे देण्याचे ठरवले. या कलमानुसार, "प्रत्येक नागरिकाला कोणती माहिती घ्यायची अथवा ठरवावयाची ती तो स्वत: किंवा प्रतिनिधींच्या मार्फत जनतेच्या भल्यासाठी किंवा गरजेसाठी प्राप्त करून घेऊ शकतो आणि ती माहिती कशासाठी वापरता येऊ शकते, याचा अधिकार प्राप्त करून दिला आहे."

फ्रान्सचे नागरिक या कायद्यान्वये ज्या कागदपत्रांची माहिती घेऊ शकतात. त्यात प्रामुख्याने दस्तऐवज, रिपोर्ट, सांख्यिकीय माहिती, आदेश, सूचना, मंत्रालयातील अध्यादेश, सकारात्मक कायद्याची माहिती, प्रशासनाबाबतची माहिती, मान्यता पत्रे, सूचना पत्रे, राज्याने निर्माण केलेले निर्णय इत्यादींचा यात समावेश होतो. ही कागदपत्रे कोणत्याही स्वरूपात असू शकतात. यांचा वापर प्रशासनामध्ये एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होतांना त्यामध्ये पैशाचा व्यवहार हा कायद्याने अमान्य केलेला आहे. नागरिकांनी जी माहिती मागितली आहे. ती माहिती एक महिन्याच्या आत प्राप्त करून देणे अनिवार्य आहे. नागरिकांनी मागवलेली माहिती प्राप्त करुन देण्यासाठी तेथे ऑमबुडस्मन ची नियुक्ती केली जाते.

फ्रान्स मधील कायद्यात काही बाबींना वगळण्यात आलेले आहे. यात प्रामुख्याने जी माहिती गुप्ततेला धोकादायक ठरेल, अशी माहिती ज्यात राष्ट्रीय संरक्षण विषयक माहिती, फ्रान्सचे परराष्ट्र धोरण, राज्याची सुरक्षा, नागरिकांची सुरक्षा, चलन आणि नागरिकांची पत तसेच एखाद्या कायद्याने गुप्त ठेवलेली माहिती न देणे इत्यादींचा यात समावेश होतो.

### १.५.११ दक्षिण आफ्रिका :-

दक्षिण आफ्रिकेच्या १९९६ च्या राज्यघटनेतील कलम ३२ नुसार-

(१) प्रत्येक नागरिकाला राज्याने दिलेली माहिती किंवा एखाद्या नागरिकाने दिलेली माहिती जी इतर अधिकाराच्या संरक्षणासाठी आहे. ती माहिती प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

(२) या कायद्याची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय कायदे मंडळाने योग्य प्रकारची जबाबदारी पार पाडणे अनिवार्य आहे.

दक्षिण आफ्रिकेत माहिती मिळवण्याचा कायदा संसदेत फेब्रुवारी २००० मध्ये मंजूर करण्यात आला तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मार्च २००१ पासून सुरु झाली. या कायद्यानुसार सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणणे महत्त्वाचे ठरते.

या कायद्यानुसार प्रत्येक नागरिक हा प्रशासनाला कोणतेही कारण न सांगता हवी ती माहिती विचारू शकतो. उपरोक्त माहिती मिळवण्यासाठी ३० दिवसांचा मर्यादित कालावधी निश्चित करण्यात आला आहे. (मार्च २००२ साली ही मर्यादा ९० दिवसांची तर मार्च २००३ पूर्वी ही मर्यादा ६० दिवसांची होती)

या कायद्यामध्ये माहिती विचारण्याची क्षेत्रे ही काही मर्यादित क्षेत्रांच्या वेगळी आहेत. या मर्यादित क्षेत्रामध्ये कॅबीनेट विषयाची माहिती, न्यायमंडळाची, संसदेतील स्वतंत्र पदाधिकारी यांचा समावेश होतो. या व्यतिरिक्त ज्या माहितीमुळे देशाच्या अस्मितेला धोका पोहचू शकेल, अशी माहिती न देणे बंधनकारक केले आहे. याशिवाय व्यक्तीगत गुप्तता, वित्तीय माहिती, गुप्ततेची माहिती यांचाही समावेश करण्यात आला.

### १.५.१२ न्युझीलँड :

न्युझीलँड सरकारला खुले आणि पारदर्शक शासन बनवण्यासाठी २० वर्षापेक्षा जास्त वर्षाची वाट पाहावी लागली. न्युझीलँडने राष्ट्रातील नागरिकांना अनेक प्रकारचे वैयक्तिक माहितीचे अधिकार प्राप्त करून दिलेले आहेत. या राष्ट्रातील नागरिकांना माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात आणण्यासाठी विविध वैयक्तिक कायद्यांची एकत्रितता परिणामकारक ठरली.

**कायद्याने प्राप्त करुन दिलेला माहिती अधिकार :**

न्युझीलँड मधील नागरिकांना माहितीचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी दोन कायद्यांची माहीती प्रभावी ठरली. त्यात प्रामुख्याने प्रशासनातील माहिती कायदा १९८२ सरकारने दिलेली माहिती आणि गुप्ततेचा कायदा १९९३ यात नागरिकांच्या वैयक्तिक माहिती बाबतच्या अधिकारांचा समावेश होतो.

"१९८२ च्या कायद्यानुसार प्रशासनातील माहिती प्राप्त करून देणे महत्त्वाचे आहे. यामध्ये प्रत्येक व्यक्ती हवी ती माहिती घेऊ शकतो. यात नागरिक घेत असलेली माहिती चांगल्या कारणासाठीच घेत आहे, असे भाकीत केले आहे. या कायद्यानुसार नागरिकाला प्रशासन आणि शासन याबद्दलची माहिती देणे आवश्यक आहे. नागरिक ही माहिती मंत्री, शासकीय कार्यालय या संदर्भात विचारू शकतो. हवी ती माहिती नागरिकांना प्राप्त करून देण्यासाठी २० दिवसांचा कालावधीत देण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त या कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व येईल असे अपेक्षित आहे."

न्युझीलँड मध्ये प्रशासकीय माहिती कायदा खूप महत्त्वाचा ठरला आहे. या कायद्यामुळे शासनाची वाटचाल खुल्या शासन पध्दतीकडे तर झालीच पण यामुळे तेथील सार्वजनिक व्यवस्थेत माहिती प्राप्त करून देण्यासाठी मूलभूत घटकातही बदल घडून आला. यामुळे शासन आणि प्रशासन यांच्यात खुलेपणा आणण्याचे धाडस या कायद्याने केले.

### १.५.१३ इंग्लंड (U.K.) :-

इंग्लंड मध्ये माहितीच्या स्वातंत्र्याचा कायदा नोव्हेंबर २००० मध्ये लागू करण्यात आला. या कायद्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे उपलब्ध होत असलेली माहिती नागरिकांना देणे

महत्त्वाचे आहे. ही माहिती संबंधीत अधिकाऱ्याला २० दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. या व्यतिरिक्त ब्रिटिश शासनाने या अधिकारातून तीन वर्गातील क्षेत्रांचा समावेश केलेला नाही. यामध्ये

(१) पुर्णत: वगळलेली क्षेत्रे ज्यात न्यायमंडळ व तेथील दस्तऐवज महत्त्वाची वैयक्तिक माहिती, संरक्षण सेवा विषयक माहिती, गोपनियतेच्या नावाखाली मिळालेली माहिती किंवा एखाद्या कायद्याला धरून संरक्षित असलेली माहिती यांचा समावेश होतो.

(२) गुणात्मक वर्गातून वगळलेली क्षेत्रे यामध्ये अशी माहिती देणे जे की, सर्व क्षेत्रातून वगळण्यात आलेली आहे. यात प्रामुख्याने शासनाच्या धोरण आखणीच्या संदर्भात असलेली माहिती, राज्याच्या सुरक्षीततेविषयीची माहिती, अन्वेषण विभाग कायद्याची माहिती किंवा परकीय शासनाकडून जनतेच्या हिताची माहिती यांचा समावेश होतो.

(३) या वर्गवारीत शासन एखादी माहिती का देता येत नाही. या तत्वानुसार ही क्षेत्रे वगळलेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने संरक्षण विषयक माहिती, आंतरराष्ट्रीय संबंध, अर्थ व्यवस्था, गुन्हेगारी नियंत्रण, वाणिज्य व्यापार संबंध, अर्थव्यवस्था यांचा समावेश करण्यात येतो." शेवटच्या दोन तत्वातील माहिती ही जनतेचा सहभाग जाणून घेणे आणि लोकांना या कायद्यातून प्राप्त होत नसलेली माहिती न देण्याची कारण मीमांसा यातून स्पष्ट होते.

संबंधित नागरिकांनी विचारलेली माहिती २० दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे. सार्वजनिक क्षेत्रांशी संबंधित असलेली प्राधिकरणे यांना वेगवेगळ्या योजना प्रसिध्द करणे किंवा ते कोण कोणत्या कामकाजाची आखणी करतात हे नागरिकासमोर ठेवणे अपेक्षित आहे.

नागरिकांनी मागीतलेली माहिती देण्यासाठी माहिती आयुक्ताची नेमणूक इंग्लंड मध्ये करण्यात आली आहे. जेंव्हा माहिती आयुक्त सार्वजनिक सहभागाच्या संदर्भात निर्णय देतो. त्या निर्णयावर समजकल्याण विभागाचा मंत्री हस्तक्षेप करू शकतो. यामध्ये तो प्राप्त माहितीसाठी उच्च न्यायालयाची मदत घेऊ शकतो. अशा पद्धतीने आंतरराष्ट्रीय पातळीवरून विविध राष्ट्रांमध्ये माहिती कायद्याची निर्मिती करण्यात आलेली दिसून येते. या सर्व कायद्यास आंतरराष्ट्रीय माहिती कायदे म्हणून ओळखले जाते.

**आपली प्रगती तपासा (सरावासाठी महत्वपूर्ण प्रश्न) :-**

(१) माहिती अधिकाराचे विविध दृष्टीकोन स्पष्ट करा ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(२) जागतिक माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(३) पारदर्शकते वरील आंतरराष्ट्रीय कायदे विशद करा ?

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-**

(१) Goel, S.L., (2007) Good-Governance: An Integrated Approach, Deep and Deep Publications Pvt. Ltd., New Delhi.

(२) Ian Brownline and Guy S, Goodwin Gill, (2003) Basic Documents on Human Rights, Oxford University Press, New York.

(३) Narayana, P.S. and Reddy, G.B., (2003) Freedom of Information and Law, Gogia Law Agency, Hyderabad.

(४) जैन रमेश, (२००४) मीडीया कानुन एवं सूचना की स्वतन्त्रता, मंगल दिप पब्लिकेशन्स, जयपूर.

(५) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, (२००२) माहितीचा अधिकार २००२ , शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

(६) महाजन ॲड. अविनाश, (२००६) केंद्रीय माहितीचा अधिकार दफ्तर दिरंगाई कायद्यासहित, प्रशांत जोशी सि.बि.डी. बेलापूर, नवी मुंबई.

(७) कचरे प्रल्हाद आणि गायकवाड शेखर, (२०१०) कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे.

(८) कुलकर्णी डी.एस., (२००७) माहितीचा अधिकार, मनोरमा प्रकाशन, दादर पूर्व, मुंबई.

(९) शेलकर अभया, (२००५) माहितीचा अधिकार, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद. यशदा आणि राजहंस प्रकाशन, (संपा) माहितीचा अधिनियम २००५ , सदाशिव पेठ, पुणे.

(१०) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (संपा) ग्राम विकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, बाणेर रोड, पुणे.

(११) राज्य माहिती आयोग अहवाल, (२००५) माहिती अधिकार अधिनियम २००५ , प्रथम वार्षिक अहवाल १२ ऑक्टोबर २००५ ते ३१ डिसेंबर २००६ , १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई.

❄❄❄❄❄❄❄

# २

# भारतातील माहिती अधिकाराचा विकास

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ (अ) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे निकाल (न्यायालयीन सक्रियता)

२.४ (ब) स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार आणि चळवळी

२.५ (क) विविध घटक राज्यांमधील माहिती कायदा

## २.१. उद्दिष्टे :-

२.१.१ माहिती कायद्या संदर्भातील सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे निकाल व न्यायालयीन सक्रियता संबंधी माहिती जाणून घेता येतील.

२.१.२ माहिती अधिकाराच्या निर्मिती संबंधी स्वयंसेवी संघटनांचा पुढाकार आणि चळवळी यांची भूमिका लक्षात येईल.

२.१.३ विविध राज्यांमधील माहिती कायद्यांचे स्वरूप समजून घेता येईल.

## २.२ प्रास्ताविक :-

जगातील सामाजिक, आर्थिक, व औद्योगिकदृष्ट्या, विकसित असलेल्या किंवा विकासाच्या मार्गावर असलेल्या लोकशाहीप्रधान देशात माहितीचा अधिकार कायदा खूप पूर्वीपासूनच लागू झाला असला, तरी भारतात मात्र हा कायदा अस्तित्वात येण्यासाठी बरीच वर्षे वाट पाहावी लागली. तसे पाहिले तर स्वीडन या राष्ट्राने जनतेला सर्वप्रथम माहितीचा अधिकार बहाल केला. भारताच्या संदर्भात सागावयाचे झाल्यास स्वातंत्र्यपूर्व काळातील राणी व्हिक्टोरियाला महत्त्वाचे स्थान देता येईल. याचे कारण म्हणजे सन १८५७ च्या विद्रोहानंतर राणी व्हिक्टोरियाने स्वातंत्र्यपूर्व भारतीय नागरिकांना "हेबीयस कॉपर्स" चा अधिकार प्रदान केला. प्रत्यक्ष पाहता हेबीयस कॉपर्स म्हणजे बंदी प्रत्यक्षीकरण होय. शारीरिकदृष्ट्या व्यक्तीस प्रत्यक्ष हजर करा असा आहे. एखाद्या अधिकाऱ्याने एखाद्या नागरिकाला अटक केली असेल, किंवा डांबून ठेवले असेल, तर सदर व्यक्तीने न्यायालयास विनंती केल्यास न्यायालय वरील आदेशाद्वारे सदरील व्यक्तीला कोणत्या कारणासाठी डांबून ठेवण्यात आले आहे. त्याचे स्पष्टीकरण करण्यास सांगून त्या व्यक्तीस न्यायालयात उपस्थित करण्यास सांगीतले जाते. जर त्यात कायदेशीर बाब नसेल किंवा त्या व्यक्तीस अवैधपणे अटक केली असल्यास, न्यायालय त्याची सुटका करण्याचे आदेश देते. थोडक्यात या आदेशाद्वारा व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण केले जात होते. व्यक्तीस्वातंत्र्यामुळे संबंधीत व्यक्ती न्यायालयाला अटकेबाबत लेखी

माहिती अर्जाद्वारे विचारू शकत होता. म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश शासनाने भारतीय जनतेस व्यक्ती-स्वातंत्र्यांतर्गत अंशत: माहितीचा अधिकार लागू केला होता.

### २.२.१ ब्रिटीश कालीन ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट(गोपनीयतेचा कायदा- १९२३) :-

भारतावर १५० वर्षापेक्षा जास्त काळ राज्य गाजवणाऱ्या ब्रिटिश सरकारने भारतीय लोकांना त्यांच्या कार्यपध्दतीबद्दल जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. आणि यातूनच भारतीय जनतेला बंदीस्त ठेवण्यासाठी सन १९२३ साली ब्रिटिशांनी प्रशासनात ऑफीशियल सीक्रेट्स ॲक्ट (गोपनीयतेचा कायदा) लागू केला. या कायद्या व्यतिरिक्त ब्रिटिश साम्राज्यात सर्वच ठिकाणी वेगवेगळे कायदे अस्तित्वात होते. इंग्रज राज्यकर्ते हे केवळ वसाहतवाद आणि शोषण या हेतूनेच भारतात आले होते. त्यांचे प्रजेशी कोणतेच नाते नसल्याने प्रजेचा खिसा जितक्या बेमालूमपणे कापता येईल तेवढा कापण्याचा प्रयत्न केला. यात त्यांनी कचेरी नावाची बंदिस्त जागेतील दाराआडची कार्य पध्दती स्वीकारली आपले अंतस्थ हेतू समोरच्याला कळू नयेत, यासाठी सर्व कारभाराला गोपनीयतेची झालर चढवली होती. आणि या विचारसरणीला गोपनीयतेचा कायदा १९२३ असे म्हटले जाऊ लागले. राज्यकर्त्यांच्या हातातले कागद प्रजेला दिसणार नाही हे या कायद्याचे ब्रीद वाक्य होते. भारताव्यतिरिक्त इंग्रजाच्या इतर वसाहतीतही हा कायदा थोड्याफार प्रमाणात अस्तित्वात होता. या कायद्याच्या कलम ५ नुसार

"If any person, retains the sketch, plan, model, article, note or document in his possession or control when he has no right to retain it, or when it is contrary to his duty to retain it, or willfully fails to comply with all directions issued by lawful authrity with regard to the return or disposal there of, he shall be quality of offence under this section."

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रशासनामध्ये चांगल्या प्रकारचे बदल होणे अपेक्षित होते. पण गुप्ततेचा सुरूंग लागलेल्या राज्यकर्त्यांनी इंग्रजांची देणगी स्वातंत्र्योत्तर काळात सुरू ठेवली. याशिवाय गुप्ततेच्या कायद्यामधील काही तरतुदी सौम्य करण्याचा प्रयत्न खूप वेळेस करण्यात आला. परंतु हितसंबंधी लोकांनी तसे होवू दिले नाही. लोकशाहीप्रधान भारतात व्यक्तीस्वातंत्र्याला दगा देऊन राज्यकारभारात येणारी गोपनीयता आणि प्रजेचे होणारे शोषण हे येथील नागरिकांना झालेली खंतच होय. म्हणूनच या कल्याणकारी लोकतांत्रिक राज्यात गुप्ततेचा कायदा लवकरात लवकर नाहीसा होणे, आणि त्याच्या विरूध्द टोकाची भूमिका घेणारा माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात येणे अनिवार्यच होते.

### २.२.२ भारतीय राज्याघटनेतील तरतुदी :-

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. यापैकी महत्त्वाचा म्हणजे स्वातंत्र्याचा अधिकार जो मूलभूत हक्कांच्या तिसऱ्या प्रकरणात कलम १९ नुसार देण्यात आलेला आहे. राज्यघटनेतील कलम १९ नुसार प्रत्येक नागरिकास (क) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा (ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा (ग) अधिसंघ वा संघ बनविण्याचा (घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा (ङ) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा इत्यादी अधिकार प्राप्त

झालेले आहेत. यानुसार नागरिकाला भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ, योग्य कल्पना अभिव्यक्त करणे आणि व्यक्तीला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य शिक्षण आणि अज्ञानापासून मुक्ती मिळविण्याचा अधिकार आहे. कलम २१ नुसार कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपध्दती अनुसरल्या खेरीज कोणत्याही व्यक्तीला तिचे जीवीत किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही, असे सांगण्यात आले आहे. म्हणजेच प्रत्येक नागरिकास या कलमानुसार पशुसारखे जीवन जगणे असा अर्थ नसून माहितगार आणि अज्ञानापासून मुक्त जीवन जगणे असा होय. भारतीय राज्यघटनेतील कलम ५१ नुसार नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांना आणि विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाबरोबरच मानवी मनाचा शोध घेणे, तसेच सुधारणावाद यांचा विकास करणे यांचा समावेश करण्यात आला आहे. आणि मूलभूत कर्तव्या बरोबर सदगुणांसाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

### २.२.३ राज्याघटनेतील गुप्ततेची शपथ :-

भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत असे म्हटले आहे की, आम्ही भारताचे लोक लोकशाही गणराज्य घडवण्यासाठी, न्याय, स्वातंत्र्य, समता, व बंधुता यांचे आश्वासन देण्यासाठी हे संविधान स्वत:प्रत अर्पण करत आहोत. या प्रास्ताविकानुसार प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता यांचा उपभोग घेता यावा. यासाठी विविध प्रकारचे मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या मूलभूत अधिकारावर गदा येवू नये यासाठी घटनात्मक उपायांचा हक्क नागरिकांना देऊन त्यांच्या अधिकाराला विविध कायद्यामार्फत बळकटी प्राप्त करुन देण्यात आली आहे.

व्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी घटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार जरी दिला असला. तरी त्यात अंतर्भूत असलेला माहितीचा अधिकार जनतेला खऱ्या अर्थाने प्राप्त होऊ शकला नाही. भारताच्या तुलनेत इतर देशांमध्ये माहितीचा अधिकार कायदा खूप लवकर नागरिकांना प्रदान करण्यात आला. भारतामध्ये माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी लवकर न होऊ शकण्याचे एकमेव कारण म्हणजे येथील राज्यघटनाच होय. भारतीय राज्यघटनेतील गोपनीयतेची शपथ कोणत्याही प्रकारचा पश्चाताप न करता आजही ती तरतुदी नुसार सहन केली जात आहे. राज्यघटनेतील कलम ७५ (४) नुसार प्रत्येक मंत्र्याला त्याचे पद भुषवण्यापूर्वी एक गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते, जी खालील प्रमाणे आहे.

"मी क. ख. ईश्वरसाक्ष शपथ घेतो, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की, संघराज्याचा मंत्री म्हणून माझ्या विचारार्थ आणली जाईल किंवा मला ज्ञात होईल, अशी कोणतीही बाब, असा मंत्री म्हणून माझी कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी आवश्यक असेल, ते खेरीजकरुन एरव्ही, मी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही."

भारतीय संसदिय लोकशाही पध्दतीत प्रधानमंत्री हा कायदे मंडळाचा प्रतिनिधी आणि कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. जेव्हा एखादा मंत्री किंवा जो एखाद्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख आहे. तो त्या मंत्रीपदाची शपथ घेतांना गुप्ततेची शपथ घेतो. तेव्हा त्याच्या व्यतिरिक्त त्याच्या समवेत असणाऱ्या इतर मंत्र्याकडून कोणती अपेक्षा केली जाऊ शकेल ? याचाच अर्थ असा की, भारतीय लोकशाही पध्दतीत प्रत्येक मंत्र्याला त्याच्या कार्याबाबत गोपनीयता बाळगून ती माहिती नागरिकांपासून कशी दूर ठेवता येईल, आणि ती नेहमीच दूर ठेवणे

याबाबतचे स्वातंत्र्य राज्यघटनेने बहाल केलेल्या शपथेनुसार स्पष्ट होऊ शकते. ज्या लोकशाहीला जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून गणले जाते. आणि सर्वसामान्य जनतेकडून निवडून दिलेल्या प्रातिनिधीक शासनपध्दतीच्या भारतामध्ये गोपनीयतेलाच महत्व दिल्याचे स्पष्ट होते. लोकशाहीप्रधान भारतात सर्वसामान्य नागरिक ते वरिष्ठ स्तरापर्यंतचे सर्व नागरिक सर्व मंत्र्यांची निवड करतात. ही निवड म्हणजे जनतेने विश्वासाने निवडून दिलेला आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारा तो मंत्री होय. यामध्ये मंत्र्याला त्याच्या प्रजेसोबत राहून प्रजेसंबंधीची आवश्यक कार्य पूर्ण करावी लागतात. यात नागरिक आणि मंत्री यांचे संबंध जोपासले जाणे महत्त्वाचे असते. थोडक्यात भारतीय शासन पध्दतीमध्ये नागरिक मंत्र्याला राजा म्हणून संबोधतात तर नागरिक ही राजाची प्रजा असेच म्हणावे लागेल. यामध्ये हा राजा तेथील जनतेविषयीचे निर्णय घेतो. पण घटनेतील कलम ७५ (४) नुसार जर याच मंत्र्याला सर्वसामान्य नागरिकांपासून जर एखादी माहिती जाणून बुजून गुप्त ठेवायची असेल. तर त्या घटनेचा आणि मंत्र्याचा नागरिकांना काय फायदा ? थोडक्यात असे म्हणता येईल की, जी माहिती सर्वसामान्य नागरिकांसाठी आणि समाजहितासाठी महत्त्वाची आहे, अशी माहिती कायद्याने नागरिकांपुढे न आणणे हे सिध्द केलेले आहे. या गुप्ततेच्या शपथे मुळेच नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा येऊ लागली आणि खऱ्या अर्थाने घटनेतील या कलमानुसारच भारतात माहितीचा अधिकार कायदा अंमलात येण्यासाठी वेळ लागला.

सर्वसामान्य नागरिकांच्या कार्यक्षमतेवर सार्वजनिक प्राधिकरणाचा फार मोठा पगडा असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे प्रत्येक नागरिक या ना त्या कारणामुळे प्रशासनाच्या संपर्कात येतो. या प्रशासनात हस्तक्षेप करतांना त्याला अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. एखाद्या नागरिकाला हवी ती माहिती द्यायची असेल तर प्रशासकीय अधिकाऱ्याकडून हरकत असलेली उत्तरे मिळत होती. म्हणजेच, विविध मंत्री जी गोपनीयतेची शपथ घेतात. त्याचाच भाग म्हणून प्रशासनातही गोपनीयतेची वाढ झाली. अशा रितीने लोकशाहीप्रधान भारतामध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, "आपले मंत्री जी शपथ घेतात, त्या शपथेमध्ये गोपनीयतेची शपथ न घेता पारदर्शकतेची शपथ देणे महत्त्वाचे ठरेल."

## २.३ (अ) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांचे निकाल :- (Supreme Court/High Courts judgments) (न्यायालयीन सक्रियता)

भारतीय राज्यघटनेतील कलम १९ (१) मध्ये ज्या मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये माहितीचा अधिकार याला कायदेशीर स्थान प्राप्त झालेले नव्हते. तेव्हा हा कायदा नागरिकांच्या अस्तित्वासाठी कितपत उपयोगी आहे. आणि वेगवेगळ्या न्यायालयात न्याय मिळवण्यासाठी करण्यात आलेल्या नागरिकांच्या याचिका संदर्भात जे विविध निर्णय दिले. त्यात माहितीचा अधिकार किती महत्त्वाचा आहे हे स्पष्ट होते. यामध्ये न्यायालयाने कलम १९ (१) मध्येच माहितीचा अधिकार कायदा अंतर्भूत असल्याचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निर्णयावरून स्पष्ट केले. न्यायालयाने दिलेले निकाल खालील प्रमाणे आहेत.

(१ बेनेट कोलमन विरुध्द संघशासन, १९७३ .

(२ उत्तरप्रदेश विरुध्द राज नारायण व इतर, १९७५ .

(३ मनेका गांधी विरुध्द संघशासन, १९७८ .

(४ प्रभा दत्त विरुध्द संघशासन व इतर, १९८० .

(५ एस.पी. गुप्ता विरुध्द संघशासन, १९८२ .

(६ इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर विरुध्द संघशासन व इतर, १९८५ .

(७ एल.के. कुलवाल विरूध्द जयपूर महानगर पालिका, १९८६ .

(८ शीला बारसे विरुध्द महाराष्ट्र शासन, १९८७ .

(९ रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लि. विरुध्द प्रोप्रायटर्स ऑफ इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स प्रा.लि. व इतर, १९८८ .

(१० लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया विरुध्द प्रो. मनुभाई डी. शाह, १९९२ .

(११ सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया व इतर विरुध्द क्रिकेट असोसिएशन ऑफ बेंगॉल, १९९५ .

(१२ टाटा प्रेस लिमिटेड विरुध्द महानगर टेलिफोन निगम लि., १९९५ .

(१३ दिनेश त्रिवेदी विरूध्द संघ शासन, १९९७ .

(१४ संघशासन विरुध्द मोशन पिक्चर असोसिएशन, १९९९ .

(१५ पीपल्स युनियन फॉर सिव्हील लिबर्टी विरुध्द संघशासन, २००४ .

### २.३.१ बेनेट कोलमन विरुध्द संघशासन :-

न्यूज प्रिंट आणि जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ या संदर्भातील निवाड्यावर निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, "वृत्तपत्रांचे संपादक, कंपनीचे संचालक किंवा भागधारक हे नागरिक असून त्यांचा भाषण आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अधिकार त्यांच्या वृत्तपत्रातील मतप्रदर्शनातून बजावत असतात. राज्यघटनेच्या कलम १९ (१) मध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे." खऱ्या अर्थाने या खटल्यापासून भारतात माहितीच्या अधिकारास चालना मिळाली, आणि पुढील विविध खटल्यात या अधिकारास बळकटी प्राप्त होत गेली.

### २.३.२ मनेका गांधी विरुध्द संघ शासन :-

मनेका गांधी विरुध्द संघशासन या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, "भारतीय राज्यघटनेतील कलम १९ (१) नुसार उच्चार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला भौगोलिक सीमा नसतात. नागरिक माहिती मिळविण्यासाठी आणि स्वतःचे मत

व्यक्त करण्यासाठी या अधिकाराचा कोठेही व केव्हाही वापर करु शकतात." म्हणजेच या निवाड्याने व्यक्तीच्या उच्चार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बळकटी प्राप्त करुन दिली. त्याचबरोबर स्वतःचे मत मांडण्यासाठी कोणत्याही क्षेत्रातील माहिती मिळविण्याच्या अधिकाराचे समर्थन केले. या निकालाबाबत सर्वोच्च न्यायालयाचे न्या.कृष्णा अय्यर म्हटले होते की, "जे सरकार गोपनीयतेच्या छायेत कामकाज करते ते केवळ लोकशाही मूल्याच्या विरोधातच काम करते असे नव्हे, तर असे शासन स्वतःच्या कृतीनेच लोकशाही शासनाचे मूल्य संपवत असते." यावरुन लोकशाही शासनात माहिती अधिकाराचे महत्त्व स्पष्ट होते.

### २.३.३ एस.पी.गुप्ता विरूध्द संघशासन :

गुप्ता विरूध्द संघशासन हा खटला न्यायाधिशाचे प्रकरण म्हणून ओळखला जातो. केंद्रीय कायदामंत्र्यांनी १८ मार्च १९८१ रोजी भारतीय संघराज्यातील सर्व घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना एक पत्र पाठवले. त्यात विषय होता उच्च न्यायालयातील अतिरिक्त न्यायाधिशांची राज्याबाहेर बदली करावयाची असल्यास त्यास न्यायाधीश संमती देतील काय ? अशी विचारणा त्या पत्रात करण्यात आली होती. विविध उच्च न्यायालयांतील वकिलांनी रिट याचिकांद्वारे या परिपत्रकाला आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने हे सर्व रिट अर्ज आपल्याकडे विचारार्थ घेतले. त्याच बरोबर दिल्ली उच्च न्यायालयातील तीन अतिरिक्त न्यायाधिशांच्या नेमणूकांबाबतचा वि. म. तारकुंडे यांचा तक्रार अर्जही विचारात घेण्यात आला. न्या. व्होरा, न्या. कुमार आणि न्या. वाड या तिघांची दिल्ली उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून ३ महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. मुदत संपल्यावर व्होरा आणि कुमार यांची फेरनियुक्ती करण्यात आली नाही. कायदेपंडीत वि. म. तारकुंडे यांचा तक्रार अर्ज त्याबद्दल होता.

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांशी पुरेसा विचारविनिमय न करता असंबंध कारणास्तव आपली फेरनियुक्ती करण्यात आली नाही. असे कुमार यांचे म्हणणे होते. भारताचे मुख्य न्यायाधीश आणि केंद्रीय कायदेमंत्री यांच्यातील गोपनीय पत्रव्यवहार उघड करावा. अशी कुमार यांच्या वतीने मागणी करण्यात आली. मात्र सर्व पत्रव्यवहाराबाबत सरकारला सार्वजनिक उन्मुक्ती विशेषाधिकार (Public Immunity Priviledge) असल्याचे कारण सांगून तो न्यायालयासमोर आणण्यास सरकारने नकार दिला. परंतु सर्वोच्च न्यायालयाने सरकारचा सार्वजनिक उन्मुक्ती विशेषाधिकार अमान्य केला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश आणि केंद्रीय कायदेमंत्री यांच्यामधील गोपनीय पत्रव्यवहार न्यायालयात प्रकट करावा लागला.

"एस.पी.गुप्ता विरूध्द संघशासन खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सरकारी दस्ताऐवजांचे प्रकटन रोखून धरण्याबाबत सरकारचा निर्णय अंतिम मानला जाणार नाही, हे स्पष्ट झाले." पूर्वी सरकारी दस्तऐवज प्रकट करण्यास सरकार तयार नसायचे, मात्र या निर्णयामुळे सरकारला दस्ताऐवज प्रकट करणे भाग पडले. यातूनच माहितीच्या अधिकाराचा मार्ग मोकळा झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर खुले शासन, पारदर्शक व्यवहार आणि माहितीचा अधिकार याबाबत चर्चा होऊ लागली.

### २.३.४ इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स विरुध्द संघशासन :-

१९८५ च्या या खटल्याचा निकाल देताना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रेसच्या उच्चार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ लावताना म्हटले होते की, "प्रसारमाध्यमांचे उच्चार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाही शासनप्रणालीतील पायाभूत घटक आहेत. आणि ज्यामुळे अशा स्वातंत्र्यावर निर्बंध आणले जातील. अशा प्रत्येक बाबतीत न्यायालय या हक्काच्या संरक्षणाची भूमिका घेईल." या निवाड्यातून सर्वोच्च न्यायालयाने प्रसारमाध्यमांच्या उच्चार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे तीन महत्वाचे घटक अधोरेखीत केले. त्यात १) सर्व मार्गानी माहिती मिळविण्याचा हक्क, २) माहिती प्रसिध्द करण्याचा हक्क, ३) प्रसिध्द केलेली माहिती वितरीत करण्याचा हक्क.

या याचिकेच्या निकालाने हे स्पष्ट केले की, लोकशाही शासनव्यवस्थेत वृत्तपत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण शासनाची विविध ध्येय धोरणे योग्य किंवा अयोग्य आहेत. याची चिकित्सा करुन वृत्तपत्रांना ती जनतेसमोर मांडण्याचा अधिकार आहे. प्रसारमाध्यमांच्या या अधिकारातून सामान्य जनतेच्या माहिती मिळविण्याच्या अधिकाराला चालना मिळाली.

### २.३.५ शिला बारसे विरूध्द महाराष्ट्र शासन :-

शीला बारसे या पत्रकार आणि समाजसेविका म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी १९८२ मध्ये पोलीस कोठडीत डांबून ठेवलेल्या १५ महिलांच्या मुलाखती घेतल्या व पोलीस कोठडीमध्ये महिलांना दिल्या जाणाऱ्या वाईट वागणुकीला वाचा फोडली. या खटल्याचा निकाल देतांना न्या. भगवती, न्या. पाठक, न्या. ए.एन.सक्सेना या तिघांनी मिळून दिलेल्या निर्णयात असे म्हटले की, कोठडीतील महिलांच्या मुलाखती घेण्यात याव्यात.

"शीला बारसे यांनी केलेल्या याचिकेमुळे समाजसेवकांना तुरूंग, बालसुधारगृहे, किशोर सुधारगृहे आणि इतर संबंधित संस्थांना भेटी देऊन त्यांच्या विषयी माहिती मिळविण्याचा अधिकार मिळाला." या खटल्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या कक्षा रूंदावण्याला मदत झाली.

### २.३.६ एल.के. कुलवाल विरूध्द जयपूर महानगरपालिका :-

एल.के.कुलवाल या नागरिकाने राजस्थान उच्च न्यायालयात एक रिट याचिका दाखल केली. जयपूर शहरात अस्वच्छता भयानक असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला काही निर्देश द्यावेत अशी मागणी त्या रिट याचिकेत करण्यात आली होती. शहरातील स्वच्छतेबाबत महानगरपालिकेने काय उपाययोजना केल्या आहेत. याची माहिती अर्जदाराला पाहिजे होती. ही माहिती मिळविण्याचा अधिकार आपल्याला आहे. असे अर्जदाराचे म्हणणे होते.

या याचिकेचा निर्णय देतांना उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी.एल. मेहता यांनी राज्याच्या आणि राज्य या संज्ञेत येणाऱ्या नगर पालिका इत्यादी. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थानिक कारभाराची माहिती मिळविण्याचा नागरिकांना अधिकार आहे असे आपल्या निकाल पत्रात नमूद केले. शासनाच्या कारभाराविषयी नागरिकांना माहिती मिळाली नाही तर नागरिक आपले मत कसे व्यक्त करणार ? यातूनच राज्यघटनेच्या कलम १९ मधील अभिव्यक्ती

स्वातंत्र्य माहितीच्या अधिकाराशी निगडीत आहे. असे न्यायमूर्ती यांनी सांगितले. "माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकाराचाच एक भाग आहे. असे सांगणारा १९८६ मध्ये दिलेला हा पहिला निकाल आहे." हे याचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

### २.३.७ रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लि. कंपनीचा खटला :-

रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लि. कंपनीने काही परिवर्तनीय कर्ज रोखे बाजारात आणण्याचे ठरवले होते. या संदर्भात निरनिराळ्या न्यायालयात खटले दाखल झाले. हे खटले सुरू असतांनाच इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राने याबाबत मत प्रदर्शन करणारे काही लेख छापले. त्याविरोधात रिलायन्स कंपनीने सर्वोच्च न्यालयात मनाई हुकूम मागणारा अर्ज दाखल केला. या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराबद्दल महत्त्वाचे मत नोंदवले आहे. "आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, यंत्र युगातील जीवन आणि लोकशाहीत नागरिकांच्या सहभागाने होणाऱ्या विकासात लोकांना भाग घेण्यासाठी माहितीचा अधिकार महत्त्वाचा आहे. कलम २१ मध्ये सांगितलेल्या जीवन जगण्याच्या आणि स्वातंत्र्य उपभोगण्याच्या अधिकाराचा विस्तार करण्यासाठी माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार म्हणून महत्त्वाचा आहे."

या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने माहितीचा अधिकार महत्त्वाचा आहे आणि २१ व्या कलमात सांगितलेल्या जीवन जगण्याच्या अधिकारासाठी 'माहितीचा अधिकार' आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

### २.३.८ दिनेश त्रिवेदी विरूध्द संघशासन :

राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि चिंता वाटण्यासारखे असल्याचे भाकित करून भारतीय समाजव्यवस्थेमध्ये गुन्हेगारींना त्याचे पाठबळ मिळणे शक्य होते. कधी कधी गुन्हेगारी टोळी शासकीय अधिकारी व राजकीय व्यक्ती यांच्याशी संगनमत करू शकतात. त्यांच्या कार्यवाही करीता माहिती मिळवून शिफारस करण्यासाठी तत्कालीन गृहसचिव श्री. एन.एस. व्होरा यांच्या अध्यक्षतेखाली ९ जुलै १९९३ मध्ये एक समिती नेमण्यात आली. या समितीने ५ ऑक्टोबर १९९३ रोजी सरकारला अहवाल सादर केला. तो अहवाल लोकसभेतही चर्चेसाठी ठेवण्यात आला. मात्र तो पूर्ण होऊ शकला नाही. पूर्ण अहवाल हा शंभर पानाचा असून त्यातील दहा, बारा पानांचा सारांश सभागृहात सादर करण्यात आला होता. आणि या अहवालाला आधारभूत असलेले इतर अहवाल आणि परिशिष्टे जाहीर करण्यात आली नव्हती. सार्वजनिक हितासाठी तो प्रसिध्द होणे आवश्यक होते. कारण तसे झाले असते तर सार्वजनिक जीवनातील गुन्हेगारांना संरक्षण देणारे कोणते लोक आहेत, हे जनतेला समजेल असे म्हणणे मांडणारी रिट याचिका दिनेश त्रिवेदी या राज्यसभा सदस्याने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली.

या खटल्याचा निकाल देतांना सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती ए.एम. अहमदी आणि सुजाता मनोहर यांनी म्हटले होते की, "आधुनिक घटनात्मक लोकशाहीत आपण निवडून दिलेल्या व लोककल्याणासाठी सुयोग्य धोरण आखण्याचे कर्तव्य असलेल्या सरकारच्या कामकाजा विषयी माहिती करून घेण्याचा अधिकार नागरिकांना आहे." या निकालपत्रात माहितीच्या अधिकाराचा मूलभूत अधिकाराशी संबंध जोडण्यात आलेला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निवाड्याबाबत प्रसिध्द कायदेतज्ञ न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर म्हणतात की, "माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकाराचाच एक भाग आहे, असे मानणाऱ्या न्यायालयीन निवड्यापैकी सर्वात महत्त्वाचा आणि अलीकडील निकाल म्हणजे व्होरा समितीच्या अहवालासंबंधीच्या खटल्यातील निकाल होय."

### २.३.९ माहिती नभोवाणी मंत्रालय विरूध्द बंगाल क्रिकेट असोसिएशन (१९९५) :

नभोवाणी मंत्रालय विरूध्द बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, "जो पर्यंत सर्वसामान्य नागरिकांना सरकारच्या योजना बाबत हस्तक्षेप करता येत नाही किंवा सहभागी होता येत नाही. तोपर्यंत खरी लोकशाही प्राप्त झाली असे म्हणता येनार नाही. जोपर्यंत नागरिकांना देशाबाबत घेतलेले निर्णय याविषयची माहिती मिळणार नाही. तोपर्यंत नागरिक हे देशाच्या धोरणाबाबत कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. यामधील माहिती जर एकतर्फी असेल किंवा चुकीची असेल तर अशी घटना त्या नागरिकाला अनोळखी करते. आणि शेवटी ही लोकशाही धोक्यात येऊ शकते. भारतासारख्या देशामध्ये जेथे ६५ % लोक हे निरक्षर आहेत. त्यापैकी जास्तीत जास्त १ % लोकांना संबंधित माहिती प्रसार माध्यमांकडून घेता येते."

थोडक्यात माहितीचा अधिकार कायदा हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून तो व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी जोडला गेला आहे. कारण ज्या विषयावर एखाद्या नागरिकाला आपले विचार व्यक्त करायचे आहेत. त्या विषयाची आवश्यक ती माहिती मिळाल्या शिवाय तो त्याचे विचार व्यक्त करू शकत नाही. म्हणूनच माहितीचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे असे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले.

### २.३.१० लोकशाही धोरणांचे संघटन विरुध्द संघशासन :

सन २००२ साली लोकशाही धोरणांचे संघटन विरुध्द संघशासन या खटल्यातील एका याचिकेवरुन सर्वोच्च न्यायायाने निवडणुक आयोगाला एक ऐतिहासिक आदेश दिला की, "संसद अथवा विधानसभेची निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र घ्यावे. व या प्रतिज्ञापत्रात संबंधित उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची, प्रलंबित खटल्यांची, संपत्तीची, सार्वजनिक संस्थांच्या देण्याची तसेच शैक्षणिक पात्रतेची माहिती देण्यास सांगावे, म्हणजेच जनता ज्या उमेदवाराला निवडून देणार त्याची पार्श्वभूमी मतदाराला माहिती होणे, लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे." या वरील निकालावरुन हे स्पष्ट झाले की, लोक उमेदवाराची पार्श्वभूमी माहित करुन घेऊन चांगल्या, चारित्र्यसंपन्न, अभ्यासू, स्वाभिमानी व्यक्तींना कायदेमंडळात पाठवतील यातून अनेक गैरप्रकारांना आपोआपच आळा बसेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की, युरोपीयन परिषदेच्या मानव अधिकाराच्या कलम १० नुसार "प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. या अधिकारात प्रत्येकाला कोणत्याही सार्वजनिक अधिकाराचा पक्षपात न करता विचार व्यक्त करण्याचे, माहिती घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे." तसेच भारतीय राज्यघटनेतील कलम १९ हेच मानव अधिकारातील महत्त्वाची बाब आहे. माहितीचा अधिकार नागरिकांना मिळावा म्हणून आपल्या देशात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी माहिती अधिकारासाठी सातत्याने चळवळी उभा केल्या

तसेच काही स्वयंसेवी संघटनांनी देखील पुढाकार घेतला. माहिती अधिकाराचे स्त्रोत म्हणून त्यांच्याकडे पहिले जाते. त्या संघटनांचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

## २.४ (ब) स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार आणि चळवळी :- (Initiatives and Movements: NCPRI, CHRI, Anna Hazare, MKSS and others)

### २.४.१ सामाजिक स्तरावरील प्रयत्न :-

भारतात माहितीच्या अधिकाराच्या विकासाचे जी दोन टप्पे आढळतात. त्यातील एक टप्पा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या गुप्ततेच्या कायद्यात दुरूस्ती करणे आणि दुसरा म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात माहितीचा अधिकार देण्याची मागणी. वृत्तपत्रांच्या कायद्यासंदर्भात चौकशी करणाऱ्या समितीने १९४८ साली असे सुचविले होते की, राष्ट्रीय सुरक्षिततेच्या आवश्यकतेसाठी काही बाबी गुप्त ठेवण्यासाठी सुधारणा करावी. मात्र याला नोकरशाहीनेच विरोध केला. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही बरीच वर्षे माहितीचा अधिकार कायदा लागू झाला नव्हता. जनतेला माहितीचा अधिकार हा कायद्याने प्राप्त करून द्यावा हा विचार १९९० नंतर पुढे आला. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय राज्यघटना, न्यायालयीन निर्णय, बिगर शासकीय संघटना यांच्या कडून करण्यात आलेले प्रयत्न व स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार या स्वरूपाचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १९७५ साली एका प्रकरणात असे म्हटले की, "या देशातील नागरिकांना, शासकीय कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक क्षेत्रात केलेले प्रत्येक कार्य व त्यांच्याकडून केली जाणारी प्रत्येक कृती जाणून घेण्याचा अधिकार आहे." याचा अर्थ असा की, सर्वोच्च न्यायालयाच्या मते आपल्यासारख्या जबाबदार शासन असलेल्या देशात फारच थोड्या बाबी गुप्त असू शकतात. सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला असला तरी शासनाची त्यामध्ये उदासीनता दिसून आली. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करता येईल. यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांनी व चळवळीनी पुढाकार घेतला. "माहितीच्या अधिकाराच्या चळवळीची सुरूवात सर्वप्रथम १९९० मध्ये राजस्थान मधील मजदूर किसान शक्ती संघटन (M.K.S.S.) या स्वयंसेवी संस्थेने सुरू केलेला प्रयत्न हा माहितीच्या अधिकाराच्या लढ्याचा प्रारंभ होता."

#### २.४.१.१ मजदूर किसान शक्ती संघटन :-

माहितीच्या अधिकाराच्या चळवळीला प्रथम मजदूर किसान शक्ती संघटनेने (M.K.S.S.) प्रारंभ केला. या संघटनेची स्थापना राजस्थानमध्ये मे १९९० मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भुमीहीन शेतमजूर गावात मंजूर होऊन येणारी दुष्काळी कामे करतात. अज्ञान आणि अशिक्षितपणामुळे ते कंत्राटदारांकडून सहज फसवले जाऊ शकतात. त्यांनी आपण केलेल्या कामाबद्दल काही मुद्दे उपस्थित केले, तर त्यांना डावलले जाते. त्यांना वाचता येत नसल्यामुळे नेमून दिलेली मजूरी मिळत नाही. आणि त्यांना आपण फसविले गेलो हे कळत नाही. त्यांच्या अज्ञानाचा फायदा लोक सहजपणे घेतात, म्हणून ग्रामीण भागातील मजुरांना सरकारी योजनांची माहिती आवश्यक आहे. ती माहिती मजुरांना देण्यासाठी या संघटनेची

स्थापना करण्यात आली.(M.K.S.S.) या संघटनेचे प्रसिध्द नेतृत्व सामाजिक कार्यकर्त्या व निवृत्त सनदी अधिकारी "श्रीमती अरूणा रॉय" यांनी केले व "निखील डे" यांनी त्यांना सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून सहकार्य केले.

मजदूर किसान शक्ती संघटनेने ग्रामीण भागातील मजुरांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि तेथील शासकीय व्यवस्थेत होत असलेली अफरातफर जाणून घेण्यासाठी राजस्थान मधील भिल्ल तालुक्यातील देवडुंगरी हे गाव निवडले. या संघटनेमुळे त्या गावातील मजुरांना सुज्ञानी बनवण्यास सहकार्य केले. भिल्ल प्रांतात अज्ञानी मजुरांची संख्या जास्त असल्याने शासनाकडून येणारा पैसा मजुरांना त्यांच्या कामाप्रमाणे मिळत नव्हता. त्यामुळे तेथील लोकांना प्रशासनामध्ये आपल्या अज्ञानाचा गैरवापर होत असल्याचे जाणवले. त्यामुळे साहजिकच आपण ज्या कामाची माहिती घेतो किंवा ते काम केल्यावर त्याचा खर्च कुठपर्यंत झाला इत्यादी अनेक प्रश्नांची माहिती मिळण्याचा अधिकार प्राप्त व्हावा अशी मागणी या संघटनेकडून केली जाऊ लागली. सरकारकडून मागासलेल्या प्रांतासाठी जे वेगवेगळ्या प्रकारचे अनुदान (फंड) दिले जात होते. त्यासाठी, "विकास कामाचे स्वरूप, त्यासाठी झालेला खर्च, त्याचे फलीत व त्यासंबंधातील सर्व तपशील शासनाने जाहीर करावा. ही या संघटनेची प्रमुख मागणी होती."

विकास कामे म्हटले तर मागासलेल्या प्रांतामध्ये भ्रष्टाचार होणे स्वाभाविकच आहे. परंतु या भागामध्ये जो भ्रष्टाचार होत होता. तो पुराव्याअभावी स्पष्ट करणे अवघड होते. "जेव्हा संघटनेने कामाचा तपशील दाखवण्याचा आग्रह केला होता. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, या शासकीय बाबी असून त्याबाबत गुप्तता पाळण्यात येते." थोडक्यात, असे म्हणता येईल की, स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी जो गोपनीयतेचा कायदा प्रशासनात लागू केला होता. त्याचेच फलीत म्हणजे भिल्ल तहसील मध्ये विकास कामात होत असलेला भ्रष्टाचार होय. शासकीय बाबीत गुप्तता पाळण्यात येते म्हणजे त्यामध्ये सामान्य नागरिकांच्या अधिकारावर कुठे तरी बंधने आल्याचे स्पष्ट होते. यामुळे संघटनेने शासनाकडे वेळोवेळी आग्रह केले आणि त्यांच्या सततच्या लढ्यांच्या दबावापुढे शासनाला झुकावे लागले. आणि या संघटनेने मागितलेली सर्व कागदपत्रे लोकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून द्यावी लागली. संघटनेने मिळवलेला हा विजय आणि त्यातून मिळणारी माहिती ही शासनाची मेहरबानी नव्हती तर ती माहिती म्हणजेच संघटनेला नव्याने मिळालेला हक्क होता. हा हक्क म्हणजे या चळवळीचा प्रारंभ होता आणि जसजशी या संघटनेची व्याप्ती वाढली त्यातूनच या आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणजे जनसुनवाई होय.

### २.४.१.२ जनसुनवाई :-

१९९४ मध्ये (M.K.S.S.) ने जी नवीन पध्दती स्वीकारली तिला "जनसुनवाई" असे म्हटले गेले. जनसुनवाई म्हणजे जाहीर सुनावणी, एखाद्या प्रकरणाची सार्वजनिक व्यासपीठावरून जाहीर चर्चा घडवून आणणे होय. जनसुनवाई मध्ये ज्या भागातील प्रकरण असेल तेथील स्थानिक लोकांची सभा बोलावली जाते. त्या सभेमध्ये शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना बोलावले जात असे. यामध्ये लोकांच्या ज्या तक्रारी आहेत. त्या तक्रारी आणि त्यांच्या जवळ जी माहिती आहे उदा. शाळेच्या बांधकामाची कागदपत्रे, रस्ते, पुल, धरणे इत्यादी सर्व बाबींची माहिती घेऊन शासकीय अधिकारी आपली भूमिका मांडत असत. यामुळे सर्व प्रश्नांची चर्चा

होवून सर्व बाजू लोकांपुढे येऊ लागल्या. परिणामी विविध प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार सिध्द होऊ लागला.

जनसुनवाई मध्ये कोणताही प्रश्न गुपीत न राहता त्या प्रश्नांची उकल नागरिकांसमोर केली जायची. या प्रश्नांची उत्तरे ऐकण्यासाठी आणि प्रस्थापित व्यवस्थेतील पारदर्शकता दाखवण्यासाठी बाह्य व्यक्ती जसे सुधारक, कायदेपंडीत, कवी, पत्रकार अशा व्यक्तींना जनसुनवाईत सहभागी करण्यात येत होते. जनसुनवाईची पध्दती प्रशासनासाठी गंभीर तर नागरिकांसाठी ती महत्त्वाची ठरली. यामध्ये प्रशासनाशी संबंधीत असलेल्या व्यक्ती ज्या या खटल्या संदर्भातही असू शकतील. अशा सर्व प्रकारच्या नागरिकांना बोलावले जात होते. आणि त्यांच्याकडून व्यवस्थेत होत असलेल्या प्रत्येक बाबींची माहिती लोकांना द्यावी लागत असे. यामध्ये जास्तीत जास्त माहिती ही खोटी असल्याने प्रशासनावर जनसुनवाईचा दबाव वाढत गेला. या जनसुनवाई मध्ये खटल्याच्या संदर्भात एखाद्या व्यक्तीला संबंधीत माहिती किती व का चुकीची आहे. हे व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. विविध प्रसिध्दी माध्यमांच्या मदतीने जनसुनवाईने तिचा पाया भक्कम करून राज्यात सर्वत्र स्थान प्राप्त केले. या जनसुनवाईमुळे, "संबंधित माहिती नागरिकांना प्राप्त करून द्यायची असल्याने ग्रामीण पातळीवरील ग्रामसेवक संबंधीत पध्दतीला खोडा देत संपावर गेले. त्यांच्या मते लोकांना जी माहिती द्यायची आहे. ती माहिती फक्त त्यांच्या वरिष्ठांना द्यावी असे बंधन होते. या व्यतिरिक्त राज्यातील इतर ग्रामसेवकांना संपात सहभागी होण्याची धमकी दिल्याने त्यांना विविध विकास कामांचा आलेला पैसा निवडणुकीसाठी वापरात आणणाऱ्या राजकारणी लोकांच्या ढोंगी प्रवृत्तीला बळी पडावे लागले. या विकास कामातील अनुदानामुळे तेथील लोकांना भ्रष्टाचार आणि छळ थांबवण्यासाठी माहितीच्या अधिकाराची गरज भासली." आणि यातूनच संबंधीत विकास कामाचा लेखाजोखा मिळावा यासाठी प्रयत्न केले गेले.

१९९९ मध्ये जेंव्हा माहितीच्या अधिकाराची गरज जनतेला भासली तेव्हा राजस्थान मधील सरकारने माहितीच्या अधिकाराचा कच्चा मसुदा तयार केला. तेंव्हा M.K.S.S. संघटनेने राजस्थान मधील पाच विभागीय कार्यालयाची दखल घेतली. यामध्ये त्यांनी पथनाट्य, लोकांशी संबंध वाढवणे अशा वेगवेगळ्या बाबींद्वारे माहितीच्या अधिकाराचे महत्व स्पष्ट केले. यामुळे संघटनेचा हस्तक्षेप वाढून नागरिकांमध्ये बळकटी आणण्याचा प्रयत्न झाला. याचाच एक भाग म्हणून M.K.S.S. ने माहितीच्या अधिकाराची गरज किती आहे ? हे शासनाला पोस्ट कार्डच्या विक्रीद्वारे कळविले. यात त्यांनी जो संदर्भ वापरला होता. तो राज्यसरकारला चालना देणारा ठरला. यामध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे आणि अधिकाराबाबतचा संदर्भ, "Buy a postcard address it, post it. Put it in your vote for a right to information Act." हा माहितीच्या अधिकारासाठी महत्त्वाचा ठरला.

**२.४.१.३ सामाजिक परीक्षण (Social Audit) :-**

राजस्थान मध्ये मजदूर किसान शक्ती संघटनेने माहिती अधिकाराच्या लढ्यासाठी जे आंदोलने केले होते. त्यामध्ये "सामाजिक परीक्षण" माहित करून घेण्याची मागणी पुढे आली होती. याचे कारण म्हणजे सरकारकडून येणारे अनुदान समाजाच्या विकास कामासाठी योग्य प्रकारे वापरले जात नव्हते असे 'भिम' तालुक्यातील नागरिकांना कळाले होते. त्यामुळे सामाजिक लेखा जोखा जाणून घेण्याची गरज नागरिकांना भासली. ७३ व्या घटना दुरूस्तीने

ग्रामसभेला महत्त्वाचे अधिकार दिलेले आहेत. या कायद्यानुसार नागरिकांना स्थानिक प्रशासनाच्या सर्व प्रकारच्या कारभाराचे हिशोब तपासण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच "पंचायत राज कायद्यांतर्गत सामाजिक हिशोब तपासण्याचा एक नियम आहे. या कायद्यानुसार स्थानिक प्रशासनाच्या सर्व प्रकारच्या कारभाराचे हिशोब तपासण्याचे कायदेशीर अधिकार नागरिकांना आहेत असे स्पष्ट करण्यात आले." सामाजिक लेखा जोखा संदर्भात नागरिकांची मागणी राजस्थान सरकारने मान्य करून सामाजिक लेखा जोखा मोहीम चालवली. त्यात पंचायत समितीच्या कामाच्या नोंदी वाचून दाखवल्या जात असत. उदा. शाळा, रस्ते, पुल इत्यादींच्या बांधकामासाठी किती रक्कम मंजूर झाली, किती खर्च झाला, हे शासकीय अधिकारी सांगत असत. यामुळे सामाजिक कार्यावर झालेल्या खर्चाची माहिती या कायद्याद्वारे प्राप्त होऊ लागली.

**National campaign for peoples right to information (NCPRI)**

M.K.S.S. संघटनेने ग्रामीण पातळीवर गरीब नागरिकांच्या संदर्भात महत्त्वाचे कार्य केले त्याची प्रचिती (NCPRI) संघटने संदर्भात महत्त्वाची ठरली. NCPRI संघटनेची स्थापना १९९६ मध्ये दिल्ली येथे करण्यात आली. या संघटनेचे प्रमुख शेखर सिंग हे असून जनतेचे सबलीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये लोकशाही रूजवून माहितीचा अधिकार जनतेला प्राप्त करून देणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता.

प्रशासनासंदर्भात नागरिकांचा वाढता अविश्वास कमी करून भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा उभारण्याचे कार्य या संघटनेने केले. M.K.S.S. संघटनेकडून स्फूर्ती प्राप्त झाल्यानंतर या संघटनेचे जाळे संपूर्ण देशभर पसरून राष्ट्रीय स्तरावर माहितीचा अधिकार लागू करण्याचा युक्तिवाद या संघटनेने केला.

M.K.S.S. संघटने प्रमाणेच या संघटनेने लोकांशी संबंध वाढविण्यासाठी 'ट्रान्सपरन्सी' नावाचे मासिक काढले. वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तीचा त्यात समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रेष्ठ समाजसुधारक, प्रसिध्दीमाध्यमांशी संबंधित असलेल्या व्यक्ती, शैक्षणिक आणि नागरी सेवेशी संबंधीत व्यक्ती त्यात सर्वश्री अजित भट्टाचार्य, अंजली भारद्वाज, अरूणा रॉय, भारत डोगरा, हर्ष मंडर, निखील डे, प्रभात जोशी, प्रशांत भूषण, शैलेश गांधी यांचा समावेश होता. "यात प्रामुख्याने नागरीसेवक आणि कायदेपंडितांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तसेच वरिष्ठ पत्रकार यांनी नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी प्रसिध्दी माध्यमासाठी महत्त्वाची भूमिका बजावली." अशा प्रकारे सर्व प्रकारच्या गटातील अनुभवी व्यक्ती मार्फत तसेच M.K.S.S. संघटने मार्फत NCPRI संघटनेला जो सहभाग मिळाला त्या आधारे त्यांनी माहितीचा अधिकार मिळण्यासाठी प्रयत्न केले.

**Common Wealth Human Rights Initiative (CHRI) :**

CHRI च्या मते, "माहितीचा अधिकार कायदा हा विविध मानवी हक्कांच्या संदर्भात आणि ते हक्क वेगवेगळ्या प्रकारच्या क्षेत्रामध्ये लागू करण्यासाठी महत्त्वाचा आहे." सन १९९७ च्या मध्यात या संघटनेने इतर संघटनांशी माहिती अधिकाराचा संबंध जोडण्याचे काम वेगवेगळ्या चळवळीतून केले आहे. याबरोबरच राष्ट्रीय पातळीवर नवी दिल्ली येथे डिसेंबर १९९९ व ऑगस्ट २००० मध्ये आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर 'हारारे' येथे १९९९ मध्ये, 'ढाका' येथे

जुलै १९९९ आणि 'डर्बनला' ऑक्टोबर १९९९ मध्ये माहितीच्या अधिकारावर वेगवेगळी चर्चासत्रे घडवून आणली.

CHRI ने माहितीच्या अधिकाराचे महत्व पटवून देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बैठका आणि कार्यशाळांची मदत घेतली. या संघटनेत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञाबरोबरच वकील, न्यायाधीश, तरूण विद्यार्थी, शासकीय अधिकारी यांचा समावेश केला. CHRI मार्फत माहिती अधिकाराची गरज आणि सामाजिक लेखा जोखा यावर सविस्तर चर्चा केली. अशा प्रकारे या संघटनेने माहितीच्या अधिकाराची बाजू मध्यप्रदेश, दिल्ली, कनार्टक, राजस्थान आणि इतर घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशामध्ये लावून धरण्याचा प्रयत्न केला.

### २.४.१.४ परिवर्तन :-

भारतीय प्रशासन सेवेतील सनदी अधिकारी श्री अरविंद केजरीवाल यांनी जून २००० मध्ये परिवर्तन नावाची संघटना स्थापना केली. ते स्वत:च या संघटनेचे प्रमुख होते. ही संघटना ज्या उद्देशाने प्रेरित होऊन स्थापन झाली होती. तो म्हणजे जनतेला शासकीय कार्यालयातून लाच न देता आपली कामे करून घेण्यास मदत करणे तसेच जनतेला शिक्षित करून माहिती अधिकाराची गरज पटवून देणे.

श्री अरविंद केजरीवाल हे आयकर विभागामध्ये अधिकारी असतांना या विभागात मोठा भ्रष्टाचार झाला होता. हे केजरीवाल यांच्या लक्षात आल्याने केजरीवाल यांनी व परिवर्तन संघटनेतील त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मिळून आयकर विभागातून परतावा (रिफंड) मिळवून देण्यासाठी जनतेला सहकार्य करण्याचे ठरविले. आणि लोकांना आयकर विभागातून कुठलीच लाच न देता परतावा (रिफंड) मिळवून दिला. जवळपास ७०० तक्रारीवर त्यांनी न्याय मिळवून दिला. परिवर्तन संघटनेने नंतर दिल्ली येथील जवळपास २५०० ग्राहकांना दिल्ली विद्युत बोर्डाबाबतच्या तक्रारीवरून मदत केली.

परिवर्तन संघटनेने दिल्लीतील सुंदरनगर वसाहतीच्या समस्या दूर करण्याचा देखील प्रयत्न केला. "सुंदरनगर वसाहतीतील लोकांना हाताशी धरून ६८ प्रकल्पांचे सामाजिक लेखा-जोखा (सोशल ऑडिट) करण्याचा प्रयत्न केला. त्यांना ६४ प्रकल्पांच्या मुळाशी जाता आले." या प्रकल्पांच्या मुळाशी गेल्यामुळेच तेथील ६० लाखांचा भ्रष्टाचार उघड होऊ शकला. परिवर्तन संघटनेने केलेल्या कामाच्या परिणामामुळे नंतरच्या काळात सुंदरनगर वसाहतीत जी नवीन कामे सुरू झाली, ती सुरू करतांना तेथील स्थानिक समितीचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन आणि कंत्राटाचे तपशिल जाहीर केल्याशिवाय कुठल्याही प्रकल्पांना प्रारंभ करता येत नव्हता. यानंतर परिवर्तनने दिल्लीतील जलवितरण व्यवस्थेच्या खाजगीकरणाच्या प्रयत्नाला विरोध केला. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थे (पी.डी.एस.) मध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला.

माहितीचा अधिकार सामान्य लोकांना मिळाला, तर ते प्रशासकीय व्यवस्थेशी प्रखर लढा देऊ शकतात हे परिवर्तन संस्थेला वाटले आणि त्यांनी माहिती अधिकारासाठी सरकारवर सतत दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

### २.४.१.५ नागरी समाज (Civil Society):-

नागरी समाज ही एक अशासकीय स्तरावरील स्वयंसेवी संघटना असून त्याचे स्वरूप राजकारणाबाहेरील चळवळीसंदर्भात आहे. नागरीसमाज हा शासन आणि नागरिक यातील दुवा आहे. या संघटनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे जनतेचे सबलीकरण करणे हे आहे. ही संघटना लोकांना अधिकारासंदर्भात सल्ला देत असल्याने गरीब व दुर्लक्षित लोकांना योग्य न्याय मिळू लागला. या चळवळीने लोकांना जागृत करून शासनास माहितीचा कायदा करण्यास भाग पाडले. सुरूवातीला असे वाटत होते की, माहितीच्या अधिकाराचा फायदा शहरी आणि उच्चभ्रू लोकांना होईल, परंतु या चळवळीने रोजगार हमी योजनेमधील भ्रष्टाचार उघडकीस आणल्याने माहिती अधिकाराचा फायदा सर्वसामान्य माणसांसाठीही आहे असे दाखवून दिले.

### २.४.१.६ ग्राहक संघ चळवळ :-

ग्राहक संघ म्हणजे, "ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी किंवा ग्राहकांनी खर्च केलेल्या पैशांचा त्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी ग्राहकांनी एकत्र येवून स्थापन केलेली ऐच्छिक संघटना होय." या संघटनेचे कार्य म्हणजे ग्राहकांना त्यांच्या फसवणूकी पासून दूर ठेवणे. यात हा संघ ग्राहकांना वस्तूच्या अवास्तव किंमती, भेसळ, बनावट माल या विरोधात संघटीत करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य करतो.

ग्राहक संघातील ग्राहकाने त्यांच्या मालांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी माहितीच्या हक्काचा वापर केला. उदा. १९८० मध्ये ग्राहक शिक्षण आणि संशोधन केंद्र अहमदाबाद यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा इतर राज्यांमध्ये आणि देशांमध्ये कोणत्या पध्दतीचा आहे. यावर संशोधन केले. यामध्ये त्यांनी अमेरिका, कॅनडा या राष्ट्रांचा अभ्यास करून माहितीचा अधिकार कायदा लागू करण्याचा आग्रह केला. याशिवाय चेन्नई येथील ग्राहक कृती संघटनेने तामिळनाडू माहितीचा अधिकार १९९७ या कायद्याचा वापर करून ग्राहकांना न्याय मिळवून दिला. भारतातील इतर छोट्या संघटना आणि काही छोट्या गटांच्या चळवळी माहितीचा अधिकार लागू करण्यासाठी पुढे आल्या. यात बिहार आणि झारखंड या राज्यामध्ये "पंचायत बचाव अभियान या अनौपचारिक चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली." या बरोबरच काही "अशासकीय संस्थांनी माहितीच्या अधिकाराची गरज लक्षात घेवून पारदर्शकतेची उत्कृष्टता या उद्देशानुसार त्यांच्या संघटनेने विविध कार्यालयातील माहिती नागरिकांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला." अशासकीय संघटनाचे हे एक महत्त्वाचे पाऊल होते की, ज्यामुळे सरकारला माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यास भाग पाडले. यामध्ये शासनाने या संस्थांना परकीय अनुदानाबाबतची माहिती लोकांसमोर देण्याचे धाडस केले. गोवा राज्यात गोव्याच्या माहितीच्या कायद्यान्वये पत्रकारांनी माहिती अधिकार कायद्याचा प्रश्न उचलून धरला. आणि प्रसिध्दी माध्यमांनी या प्रकरणात लक्ष घालून माहितीचा अधिकार कायदा नागरिकांना देण्यात यावा. यासाठी प्रयत्न चालू ठेवले. अशा प्रकारे भारतामधील छोट्या संघटना आणि इतर महत्त्वाच्या संघटनांनी माहिती अधिकार कायदा लागू करण्यासाठी जनआंदोलनाचा रेटा सुरू ठेवून शासनावर दबाव आणला. माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू करण्यासाठी विविध चळवळी बरोबरच प्रसारमाध्यमांचे प्रभास जोशी, अजित भट्टाचार्य,

न्या. पी.बी.सावंत, शेखर सिंग, मॅथ्यू शंकरन, आणि पत्रकार व राज्यसभा सदस्य कुलदीप नायर यांनीही मोलाचे सहकार्य केले.

### २.४.२ शासकीय स्तरावरील प्रयत्न :

भारतात १९४८ मध्ये वृत्तपत्रांच्या कायद्याबाबत चौकशी करणाऱ्या समितीने (Press Laws Committee) राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टिने आवश्यक तेवढ्या बाबी गुप्त ठेवण्यासाठी १९२३ च्या ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट (गुप्ततेचा कायदा) मध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. अशी शिफारस केली होती, परंतु याबाबत १९७७ पर्यंत काहीच हालचाली झाल्याचे दिसत नाही. १९७७ मध्ये शासकीय स्तरावर जनतेला माहिती मिळण्याच्या मार्गातील अडथळा असणारा गुप्ततेचा कायदा दुरूस्त करण्यासाठी एका अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली. पण या अभ्यास गटाला म्हणावे तसे यश आले नाही. यानंतर सन १९८२ , १९८३ , १९९० मध्ये सुध्दा गुप्ततेच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी शासनपातळीवर विविध अभ्यासगट, समित्या स्थापन झाल्या, परंतु प्रत्येकवेळी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या मुद्दयाला प्राधान्य देवून तत्कालीन राज्यकर्त्यांनी गुप्ततेच्या कायद्यात सुधारणा करण्यास असमर्थता दर्शवली, तर वरिष्ठ पातळीवरील शासकीय अधिकाऱ्यांनी गुप्ततेच्या कायद्यात सुधारणा करण्यास सतत विरोध केला. म्हणून सन १९९० पर्यंत माहिती अधिकारा बाबत कोणतीही प्रगती झाली नाही.

#### २.४.२.१ राष्ट्रीय आघाडी सरकारचे प्रयत्न :-

पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार डिसेंबर १९८९ मध्ये सत्तेत आल्यावर त्यांनी प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकार आवश्यक असल्याचे सांगितले. पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांच्या मते, "लोकशाहीच्या विकासासाठी खुले प्रशासन ही प्राथमिक आणि महत्त्वाची बाब असून सरकार कडून जो मुक्त माहितीचा प्रवाह मिळतो. त्यामुळे नुसत्या प्रबोधनाने माहितगार असे लोकमत निर्माण केले जात नाही, तर जे अधिकारात आहे. त्यांना उत्तरदायी बनविण्याचे महत्त्वाचे कार्य माहितीमुळे होत असते." पंतप्रधान व्ही.पी. सिंगानी त्यांच्या काळात आपले शासन गुप्ततेसंबंधीच्या कायद्यात दुरूस्ती करणार असल्याचे जाहीर करून माहितीचा अधिकार जनतेला देण्यासाठी विधेयकाचा मसूदा तयार केला होता. पण कालांतराने त्यांचे सरकार कोसळल्याने नवीन सरकारने माहिती अधिकारा बाबत कित्येक वर्ष याबद्दल कोणतीही ठोस कृती केली नाही. परिणामी जनतेला माहिती अधिकार कायद्यासंदर्भात जी आशा निर्माण झाली होती. तिचे कालांतराने निराशेत रूपांतर झाले. यानंतर संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर शासकीय पातळीवर माहिती अधिकार कायद्यासंदर्भात अनेक प्रयत्न करण्यात आले.

#### २.४.२.२ संयुक्त आघाडी सरकारचे प्रयत्न आणि प्रेस कौन्सीलचा मसूदा :-

संयुक्त आघाडी सरकारच्या काळात 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया' ने १९९६ साली माहिती अधिकार कायद्याचा मसुदातयार केला होता. हा मसुदा सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, नगरीसेवक, कायदेपंडीत यांच्या बैठकीत 'मसूरी' येथे ऑक्टोबर १९९५ साली जो मसुदा तयार केला होता. तोच पुढे नव्याने तयार करण्यात आला होता. यामध्ये 'लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय प्रबोधनी' मसूरी येथे प्रेस कौन्सिलने जी सभा घेतली. त्यामुळे माहिती

अधिकार कायद्याबद्दल जागरूकता निर्माण झाली. प्रेस कौन्सिलने तिच्या उद्देशपत्रिकेत सांगितले आहे की, "घटनेमध्येच माहितीच्या अधिकाराला संरक्षण दिले आहे. जो मूलभूत अधिकारांपैकी एक आहे. यामध्ये व्यक्तीला बोलण्याचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे." यात असे म्हटले आहे की, प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक प्राधिकरणातून माहिती मिळवण्याचा अधिकार आहे. प्रेस कौन्सिलने जो मसुदा तयार केला. त्या मसुद्यात, "सार्वजनिक संस्था या संकल्पनेत केवळ राज्यच नव्हेतर समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या सर्व खाजगी संस्था, संघटना, व्यापारी प्रतिष्ठाने अशा अशासकीय संस्थाचा देखील समावेश होता," अशी भूमिका घेऊन त्याला व्यापक परिमाण देण्याचा प्रयत्न केला. यामुळे खाजगी संस्था आणि संघटना याबाबत प्रेस कौन्सिलला माहिती अधिकार कायद्याची गरज महत्त्वाची वाटली असे सिध्द होऊ शकते. नागरिकाला माहितीचा अधिकार मिळण्यासाठी संयुक्त आघाडी सरकारच्या काळात प्रेस कौन्सिलने जो मसुदा तयार केला. त्यात पुढील गोष्टी समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

I. "Every citizen shall have the right to information from public body;

II. It shall be the duty of the public body to maintain all records duly catalogued and indexed;

III. The public body shall be under a duty to make available to the person requestion information, as it is under an obligation to obtain and furnish and shall not withhold any information or limit its availability to the public, except the information specified in clause 4, and

IV. All individuals whether citizens or not, shall have the right to such information that affects their life and liberty."

प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक संस्थांकडून हवी ती माहिती मिळवून घेण्याचा अधिकार आहे. "घटनेच्या ५ व्या भागात जी माहिती संसद किंवा विधानमंडळाला देणे नाकारू शकत नाही, अशी सर्व माहिती नागरिकाला दिली पाहिजे असे आहे. ही माहिती देण्यास उशीर झाल्यास संबधित अधिकाऱ्याला प्रतिदिन ५० रू. दंड करण्याची शिफारस मा. प्रेस कौन्सिलच्या मसुद्यात करण्यात आली होती." न्या.सावंत यांनी तयार केलेल्या मसुद्यात नागरिकांना जी माहिती हवी आहे. ती माहिती घेण्याचा अधिकार असेल, त्यांच्या स्वातंत्र्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या आणि इतर बाबींची माहिती हवी असलेल्या घटकांना यात प्राधान्य दिले गेले. यावर न्या. पी.बी. सावंत यांनी तयार केलेल्या विधेयकाचे ए.जी. नुराणी यांनी परिक्षण केले आहे. नुराणी यांच्या मते, न्या. सावंत यांच्या प्रस्तावित विधेयकाने नागरिकाला कोणताही नवा अधिकार दिलेला नसून घटनेच्या १९ (१) कलमान्वये आधीच मिळालेल्या मूलभूत अधिकाराच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती स्पष्ट केले आहे." अशी टीका केली तर डॉ. य.दि. फडके यांच्यामते, "न्या. सावंत यांनी सुचवलेल्या मसुद्यात सरकारी मालकीच्या कंपन्या, सार्वजनिक महामंडळे तसेच, खाजगी मालकीच्या नियंत्रणाखालच्या संस्थाकडूनही माहिती मिळवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. परिणामत: भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्या देखील माहिती अधिकाराच्या कक्षेत येतील." न्या. सावंत यांच्या

मसुद्यातील सार्वजनिक संस्था ही व्याख्या महत्त्वाची वाटल्याने या मसुद्याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते आणि 'कॉमन कॉज' या संघटनेचे प्रमुख एच.डी. शौरी यांच्या अध्यक्षतेखाली २ जानेवारी १९९७ ला समिती बनवण्यात आली.

### २.४.२.३ एच.डी. शौरी समिती आणि मुख्यमंत्री परिषद :-

सन १९९० मध्ये निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असतांना पारदर्शी आणि प्रशासकीय सुधारणेचे राज्य आणण्याचे वचन विविध राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात केले होते. यामुळे २४ मे १९९७ रोजी संपन्न झालेल्या भारतातील सर्व घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये जबाबदार आणि परिणामकारक शासन याविषयावर जी चर्चा करण्यात आली होती. ती १९९० च्या विविध राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यातील एक भाग होता. या परिषदेमध्ये केंद्रशासन आणि राज्यशासन विविध बाबीवर एकत्र कार्य करेल, ज्यामध्ये पारदर्शकता आणि माहितीचा अधिकार असेल असे स्पष्ट केले. या परिषदेमध्ये "गुप्तता आणि प्रशासनातील अपारदर्शकता हे सार्वजनिक प्राधिकरणातील भ्रष्टाचार वाढवण्यास कारणीभूत आहे. असे स्पष्ट केले." याशिवाय भ्रष्टाचारामुळे उत्तरदायीत्व आणि जनतेचे सरकार याला तडा जाण्याची भिती व्यक्त केली गेली. यामुळे तत्कालीन भारत सरकारने गुप्ततेच्या कायद्यातील तरतुदीत दुरूस्ती करून, तसेच १९९७ पूर्वीच्या पुरावा कायद्यात (Evidence Act) दुरुस्त्या करून विविध राज्यांमध्ये माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यासाठी लवकरात लवकर पावले उचलावीत असे ठरवण्यात आले. यामध्ये माहिती अधिकार कायद्यासंदर्भात ज्या राज्यांनी राज्यपातळीवर कायदे तयार केले नव्हते. त्यांनाही याबाबत कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले होते. यात शेवटी भारत सरकारने कामगार गटाची (Working Group) नेमणूक करून १९९७ साली माहिती स्वातंत्र्याच्या विधेयकाचा मसूदा तयार केला.

केंद्र आणि राज्य सरकारने पारदर्शकता निर्माण करण्यासाठी पावले उचलली, यामध्ये प्रशासनातील कार्यालयात संगणकाचा वापर वाढवून हवी ती माहिती नागरिकांना देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रयत्न केले गेले. १९९७ मध्ये सरकारने जो कामगार गट तयार केला होता. त्यालाच एच.डी. शौरी आणि पूर्व नोकरशहाच्या मदतीने शौरी समिती असे नाव देण्यात आले. या समितीने जो मसुदा तयार केला होता. त्यामध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात आला होता.

i. आपल्या कार्य योजनांची माहिती शासनाने देणे बंधनकारक आहे.

ii. हवी ती माहिती देण्यासाठी सरकारी कार्यालयांनी माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केली पाहिजे.

iii. माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्याचे नाकारले तर त्याच विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आव्हान अर्ज दाखल करण्याची तरतूद करावी.

iv. माहितीचा अधिकार वास्तविकता मिळण्यासाठी काही शासकीय कायदे नियम उदा. सरकारी गोपनियता कायदे २३ चे कलम ५ , भारतीय साक्ष कायदा १८७२ चे कलम १२३ , १२४ आणि केंद्रीय नागरी सेवा नियम १९६४ मधील ११ व्या नियमात बदल करण्याची शिफारस यात केली गेली." अशा प्रकारे शौरी समितीच्या विधेयकामुळे

माहिती अधिकाराची अंमलबजावणी लवकरच होईल. असे वाटत असतांनाच दुर्दैवाने केंद्रातील सरकार कोसळले आणि या अहवालावर प्रगती न होता देशभर चर्चा सुरू झाली. परिणामी २४ मे १९९७ ला एच.डी. शौरी समिती संदर्भात मुख्यमंत्र्यांची परिषद घेण्यात आली.

१९९७ मध्ये शौरी समितीच्या संदर्भात जी मुख्यमंत्र्यांची परिषद घेण्यात आली. त्या परिषदेचे उदघाटन तत्कालीन पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी केले. या परिषदेला गृहमंत्री, अर्थमंत्री, कायदामंत्री, कॅबीनेट सचिव, राज्य व केंद्रशासित प्रदेशातील सचिव, भारत सरकारचे वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थिती होती. या परिषदेचा मुख्य विषय परिणामकारक आणि जबाबदार शासन असा होता. या परिषदेमध्ये जो कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यामध्ये

१ . प्रशासनात विश्वसनीयता व जनतेप्रति जबाबदारी असावी.

२ . पारदर्शकता आणि माहितीचा अधिकार असावा.

३ . नागरीसेवेमध्ये तत्परता असावी. इत्यादींचा समावेश करण्यात आला.

थोडक्यात, "या परिषदेने जो कृती आराखडा तयार केला होता, त्यात माहितीच्या अधिकारामुळे प्रशासन पारदर्शक होईल. असे मत या परिषदेत मांडण्यात आले, प्रशासनात जबाबदारपणा येण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने स्वतःच्या कार्यक्षेत्रात माहिती अधिकाराच्या बाबतीत कायदे करण्याचे आवाहन करण्याचा ठराव संमत करण्यात आला." या ठरावानंतर "त्या दिशेने विविध घटकराज्यांचे प्रयत्न सुरू झाले."

### २.४.२.४ ग्राहक शिक्षण व संशोधन परिषद (CERC) :-

माहितीच्या स्वातंत्र्याचा सर्वात जास्त मसुदा ग्राहक शिक्षण व संशोधन परिषदेने मांडला. या मसुद्यामध्ये, "माहितीचा अधिकार कायदा परकीय नागरिकां व्यतिरीक्त भारतातील प्रत्येक नागरिकाला आहे. असे सांगण्यात आले." यामध्ये संघीय आणि राज्यपातळीवरील सार्वजनिक प्राधिकरणांना त्यांचे रेकॉर्ड चांगल्या प्रकारे ठेवणे, त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली माहिती तयार ठेवणे, त्यांची नियमावली आणि विकासासंबंधीच्या योजनाबाबतची सरकार कडून आलेली परिपत्रके आणि मार्गदर्शिका इत्यादींची नोंद करणे अनिवार्य ठरते. या मसुद्यामध्ये नागरिकांनी जी माहिती मागितली आहे. त्या माहितीचा खर्च त्याला भरावा लागेल. असे नमूद करण्यात आले.

CERC च्या मसुद्यात नागरिकांना माहिती दिल्या जाणाऱ्या क्षेत्रापासून काही विशिष्ट दर्जाच्या क्षेत्रांना वगळण्याचे निदर्शनास आणून दिले. यामध्ये प्रामुख्याने कॅबीनेटची कागदपत्रे, संरक्षण, सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय संबंध, आर्थिक आणि व्यापार विषयक घडामोडी ज्यामुळे देशाच्या अस्मितेला तडा जाईल. अशा बाबी विषयी गुप्तता ठेवण्याचे या घटनेमध्ये स्पष्ट केले आहे. या बरोबरच व्यक्तीगत माहिती देण्यासाठी त्यांना बंधनात ठेवल्याचे CERC च्या मसुद्यात सांगितले आहे.

### २.४.२.५ राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) :-

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने सत्तेत आल्यावर भारतीय राज्यघटनेचे पुनर्विलोकन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्यन्यायाधीश न्या. व्यंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने भारतीय संविधानाच्या कलम १९ (१) नुसार नागरिकांना माहितीचा अधिकार मिळावा. अशी शिफारस केल्यामुळे आणि ती शिफारस राष्ट्रीय आयोगाने स्विकारल्यामुळे माहितीचा अधिकार विषय पुन्हा चर्चेत आला. १९९९ मध्ये ॲड. राम जेठमलानी केंद्रीय शहर विकासमंत्री असताना त्यांनी असे म्हटले होते की, "माझ्या मंत्रालयातील सर्व संचिका (फाईल्स) सर्व सामान्य नागरिकांना पाहता येतील. कॅबिनेटशी निगडीत, अंदाजपत्रकीय प्रस्ताव आणि ज्यांचा तपास चालू आहे. अशा फाईल्स वगळता सर्व संचिका (फाईल्स) पाहण्याची, तपासण्याची मुभा लोकांना दिली जाईल. आणि त्यासाठी केवळ १० रु. शुल्क द्यावे लागेल." परंतु या आदेशाला केंद्रीय कॅबिनेट सचिवांनी विरोध केल्याने ॲड. जेठमलानी यांना तो आदेश मागे घ्यावा लागला. त्यातून माहितीचा अधिकार पुन्हा देशात चर्चिला जाऊ लागला.

### २.४.२.६ प्रणव मुखर्जी समिती :-

माहिती अधिकार मिळावा म्हणून अनेक संघटनांनी केंद्र सरकारवर दबाव आणला. यामुळे केंद्राने शौरी समितीने तयार केलेले. माहिती स्वातंत्र्याचे विधेयक २५ जुलै, २००० मध्ये संसदेत मांडले. संसदेने हे विधेयक संसदीय समितीकडे पाठविले. प्रणव मुखर्जीच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीत दोन्ही सभागृहाचे एकूण ४५ सदस्य होते. या समितीने वेगवेगळ्या क्षेत्राशी संबंधीत असणारे तज्ज्ञ श्री. माधव गोडबोले, ए.जी. नुराणी, प्रा. मनुभाई शहा, निवृत्त कॅबिनेट सचिव भालचंद्र देशमुख यांचे आणि स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून मजदूर किसान शक्ती संघटनेच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेतले. यामध्ये त्यांनी न्या. पी.बी.सावंत यांची मते जाणून घेऊन विधेयकात २६ दुरूस्त्या केल्या. (पहा परिशिष्ट-१) सरकारने या उणिवांची दखल घेवून त्यात सुधारणा कराव्यात, अशी शिफारस प्रवण मुखर्जी समितीने केली होती. २००२ पर्यंत हे विधेयक संसदेत संमत न झाल्याने संघटनांच्या काही प्रतिनिधींनी सर्वोच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल केला. या सार्वजनिक जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाच्या कडक शब्दातील आदेशानंतर हे विधेयक १६ डिसेंबर २००२ ला संमत केले. आणि १० जानेवारी 2003 ला राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर माहिती स्वातंत्र्याचा कायदा अस्तित्वात आला. (Freedom of Information Act 2003) हा कायदा जरी अस्तित्वात आला तरी अंमलबजावणीची योग्य नियमावली तयार नसल्याने त्याची अंमलबजावणी झालीच नाही. याच काळात देशातील विविध राज्यांमध्ये माहितीच्या अधिकाराचे विविध कायदे अस्तित्वात आल्याने देशभरात माहितीच्या अधिकार कायद्यात सुसुत्रता आणावी अशी मागणी होऊ लागली. आणि मध्यंतरीच्या काळात 'संयुक्त पुरोगामी आघाडीचे' शासन सत्तेवर आल्याने लोकांना या कायद्याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.

### २.४.२.७ संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार (UPA) :-

माहिती अधिकार कायद्यासंदर्भात शासकीय आणि अशासकीय पातळीवर ज्या चळवळी व संघटना सहभागी झाल्या त्याबद्दलच्या विचारधारेनुसार संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने

किमान समान कार्यक्रमा (C.M.P.) नुसार नागरिकांना माहितीचा अधिकार देण्याबाबतचा विचार विनिमय सुरू केला. हे त्यांच्या निवडणूक जाहिरनाम्यातील एक महत्त्वाचे तत्व होते. परिणामी केंद्र सरकारने 2003 च्या माहिती स्वातंत्र्याच्या जागी माहितीचा अधिकार देणारे विधेयक मांडले. आणि संसदेत त्या विधेयकावर सविस्तर चर्चा करून संसदेकडून ते मंजूर करून घेतले. १५ जून २००५ रोजी या विधेयकाला राष्ट्रपतीची मान्यता मिळाली. आणि कायद्यातील तरतुदीनुसार संपूर्ण भारतात (जम्मू काश्मीर वगळून) १२ ऑक्टोबर २००५ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. यामुळे पूर्वीचे घटकराज्यातील आणि केंद्रशासित प्रदेशातील विविध कायदे रद्द होऊन त्यांची जागा केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ ने घेतली.

### २.५ (क) विविध घटक राज्यांमधील माहिती अधिकार कायदा:- (Information Acts in States)

भारतामध्ये माहितीच्या अधिकाराचा जो लढा उभारला गेला. तो मजदूर किसान शक्ती संघटनेचा यशस्वीतेच्या मैलाचाच दगड होता. या संघटनेने राजस्थान मध्ये जी चळवळ सुरू केली होती. तिचा भाग म्हणून राजस्थान सरकारने २००० मध्ये माहितीचा अधिकार देणारा कायदा केला. M.K.S.S. संघटनेच्या यशस्वीतेनंतर प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया, CHRI आणि ग्राहक मंचाच्या चळवळीचा बराच मोठा हातभार माहितीच्या अधिकारासाठी लागला. आणि या चळवळीला अनुसरून भारतातील बऱ्याच राज्यांनी अशा प्रकारचा कायदा त्या-त्या राज्यामध्ये लागू केला होता.

### २.५.१ तामिळनाडू :-

भारतात माहितीचा अधिकार कायदा तयार करणारे पहिले. राज्य म्हणून तामिळनाडू राज्याचे नाव घ्यावे लागेल. तामिळनाडू सरकारने १७ एप्रिल १९९६ रोजी राज्यात माहितीचा कायदा लागू केला. या कायद्याचा मसुदा त्यांनी कौन्सिल ऑफ इंडिया कडून तयार करून घेतला होता. या कायद्यामध्ये बरीच क्षेत्रे आणि इतर महत्त्वाची माहिती वगळल्यामुळे बिगर शासकीय संघटनांनी (NGO) या कायद्याला म्हणावा तेवढा दुजोरा दिला नसल्याने हा कायदा अयशस्वी ठरला. असे असले तरी तामिळनाडू सरकारने माहिती न देणाऱ्या कायद्यांचे रूपांतर माहितीच्या अधिकारात (Right to no Information Act to Right to Information) केले.

### २.५.२ गोवा :-

गोवा सरकारने राज्यात जेव्हा १९९७ साली माहितीचा कायदा लागू केला. तेंव्हा तत्कालीन माहिती अणि प्रसारण मंत्री डोमीनीक फर्नांडीस यांनी या कायद्याबाबतची रूपरेषा ठरवण्यासाठी प्रसारमाध्यमांची आणि बिगर शासकीय संघटनांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. हा कायदा सर्व शासकीय पातळीवरील संस्थांना लागू करण्यात आला होता. खऱ्या अर्थाने नागरिकांना लोकशाहीप्रधान करण्यासाठी आणि शासकीय संस्थामध्ये पारदर्शकता आणि खुलेपणा आणण्यासाठी गोवा सरकारच्या या कायद्यात राज्याच्या सुरक्षिततेच्या बाबी विषयी तरतूद करण्यात आली होती, असे असले तरी ही माहिती देतांना अपिलीय अधिकारी कोण असावा, याचे स्पष्टीकरण देण्यात आले नव्हते.

### २.५.३ मध्यप्रदेश :-

मध्य प्रदेशात शिधावाटप व्यवस्थेत आणि सेवायोजना कार्यालया संबंधी मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्याने बिलासपूर विभागाचे आयुक्त हर्ष मंडर यांनी प्रशासनात पारदर्शकता आणण्याचे ठरवले. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी माहितीच्या अधिकाराची आवश्यकता असल्याचे त्यांना जाणवले. २ सप्टेंबर १९९६ रोजीच्या शिधावाटप व्यवस्थेसंबंधीच्या परिपत्रकाच्या पहिल्या परिच्छेदात त्यांनी म्हटले की, "प्रशासन पारदर्शक असेल तरच सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे आणि भ्रष्टाचाराचे नियंत्रण करणे संभवनिय असते. हा अधिकार भारतीय संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारात समाविष्ट केलेला आहे, आणि तो अंमलात आणण्यासाठी शासन कटीबध्द आहे" असे एका परिपत्रकात सांगून नागरिकांना माहितीचा अधिकार आहे. असे सांगण्याचा शासकीय अधिकाऱ्याचा हा धाडसी निर्णय होता. यातून १९९८ साली मध्यप्रदेश सरकारने माहितीचा अधिकार कायदा लागू केला.

### २.५.४ महाराष्ट्र :-

महाराष्ट्र शासनाने २००० साली जेष्ठ समाजसुधारक आणि भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाचे प्रणेते मा. अण्णा हजारे यांनी केलेल्या विविध चळवळीच्या दबावातून राज्यात माहितीचा कायदा लागू केला. इतर राज्याच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रातील कायदा प्रभावशाली होता. या कायद्यामध्ये शासकीय आणि निमशासकीय संस्थाबरोबरच सहकारक्षेत्रे आणि सार्वजनिक संस्था यांचा समावेश करण्यात आला होता. या कायद्यानुसार एखाद्या नागरिकाने मागीतलेली माहिती माहिती अधिकाऱ्याने वेळेत न पुरवल्यास दररोज रू. २५०/- चा दंड त्याला भरावा लागेल अशी त्यात तरतूद होती. जर त्याने संबंधित माहिती चुकीची किंवा अर्धवट देणे असे जाणीवपूर्वक केले असेल, तर अपिलीय माहिती अधिकारी त्याला रू. २०००/- चा दंड लावेल अशी त्यात तरतूद होती.

महाराष्ट्रातील जेष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिध्दी येथे विविध विकास कामाला सुरूवात केली. सुरूवातीला त्यांनी 'पाणी आडवा आणि पाणी जिरवा' हे पाणलोटाचे काम त्यांनी सुरू केले. त्यांनी पिकवलेला भाजीपाला विदेशात निर्यात केला जात असे, या योजना आखतांना त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागले. शासनाकडून पैसा येतो कसा आणि तो खर्च कसा होतो याबद्दल निश्चित माहिती मिळत नव्हती. यामुळे प्रशासनात होणारा भ्रष्टाचार त्यांना दिसू लागला. या बिकट परिस्थितीचा सामना करतांना मा. अण्णा हजारे म्हणतात की, "शासनाच्या विविध योजना यशस्वी होत नव्हत्या, १ रूपयातील १० पैसेही खेड्यापर्यंत पोहचत नव्हते." अशा प्रकारे मंत्र्यापासून प्रशासकीय यंत्रणेपर्यंत जो भ्रष्टाचार चालत आलेला आहे. तो संपवून जनतेला माहितीचा अधिकार मिळावा यासाठी मा. अण्णा हजारेंनी १९९७ ला मुंबई येथे पहिले आंदोलन केले. दरम्यान त्यांनी राज्यामध्ये माहितीचा अधिकार कसा आवश्यक आहे. हे पटवून देण्यासाठी वेगवेगळे दौरे आखले होते. याबरोबरच त्यांनी राज्यव्यापी परिषदा घेवून सरकारवर माहिती अधिकारासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. परिणाम २००० मध्ये महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आणला. याविषयी डॉ. य.दि. फडके म्हणतात की, "जेष्ठ समाजसेवक मा.अण्णा हजारे यांनी महाराष्ट्र माहितीच्या अधिकारासाठी चळवळ केल्यामुळे माहितीचा अधिकार कायदा महाराष्ट्र राज्यात लागू झाला ही वस्तुस्थिती आहे."

### २.५.५ दिल्ली (केंद्रशासित प्रदेश):-

दिल्ली सरकारने २००१ साली माहितीचा अधिकार कायदा तयार केला. पण त्याची अंमलबजावणी २ ऑक्टोबर २००१ पासून झाली. हा कायदा गोवा राज्याने केलेल्या कायद्याप्रमाणेच होता. यामध्ये माहिती देण्याची आणि न देण्याची क्षेत्रे यांचा समावेश करून तो इतर सर्व संस्थांना लागू करण्यात आला होता. या व्यतिरिक्त संबंधित माहिती न पुरविणाऱ्या माहिती अधिकाऱ्याला ५० रू प्रति दिवस असा दंड (३० दिवसांच्या आत माहिती न दिल्यास) भरावा लागण्याची तरतूद होती. असे जर नाही झाले तर त्या अधिकाऱ्याला प्रत्येक अर्जामागे रू. ५००/- चा दंडभरावा लागण्याची तरतूद यात केली होती. दिल्ली सरकारच्या या कायद्यामुळे प्रत्येक नागरिकाला जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणत्याही विभागाची माहिती विशिष्ट फिसच्या स्वरूपात भरून मिळत असे. संबंधीत माहिती अधिकाऱ्याने एखादी माहिती जाणीवपूर्वक चुकीची किंवा अर्धवट देणे असे आढळून आले. तर त्याला प्रतिअर्ज ३०००/- रु. एवढ्या दंडाची तरतूद या कायद्यात करण्यात आली होती.

### २.५.६ कनार्टक :-

कर्नाटक राज्यात २००० साली माहिती अधिकाराबाबत 'कनार्टक माहितीचा अधिकार कायदा' अशा नावाने संमत केला, पण त्याची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी जुलै २००२ मध्ये करण्यात आली. या कायद्यात नियमांचा स्पष्ट उल्लेख केला गेला नव्हता. या माहितीच्या कायद्यामुळे एखाद्या नागरिकाला जी माहिती हवी असेल, ती माहिती तो जन माहिती अधिकाऱ्याकडून अर्जाद्वारे घेऊ शकत होता. यामध्ये माहिती प्राप्त करण्यासाठी जो खर्च येत असे, त्यासंबंधीची माहिती नागरिकाला जन माहिती अधिकाऱ्याने ७ दिवसात कळवण्याचे निर्देश या कायद्यात दिले होते. नागरिकाने मागितलेली माहिती संबंधीताने माहितीच्या खर्चाची रक्कम भरलेल्या दिवसापासून १५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक होते. नागरिकाने विचारलेली माहिती प्राप्त न झाल्यास तो संबंधीत माहिती का मिळाली नाही ? हे जाणून घेण्यासाठी १५ दिवसांच्या आत एका अर्जाद्वारे चौकशी करू शकत होता. या कायद्यानुसार प्रत्येक सार्वजनिक कार्यालयातील अधिकाऱ्यांना त्यांच्या संस्था, त्यांची कर्तव्य आणि कार्ये, नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या योजना याबाबतची माहिती कार्यालया बाहेर सूचना फलकावर लावणे आवश्यक होते.

कर्नाटकात माहितीचा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी तत्कालीन राज्यपाल श्रीमती. व्हि.एस.रमादेवी प्रयत्नशील होत्या. परंतु आपले कृत्य चव्हाट्यावर येणार या भितीने कन्नडी राजकारणी अस्वस्थ झाले होते. समाजच आपली धुलाई करेल, अशी भिती त्यांना पडल्याने कर्नाटक सरकारने तत्कालीन परिस्थितीत कोणताही बदल केला नाही. वस्तुत: या कायद्यासंदर्भात सामान्य जनतेला हेतुपूर्वक निद्रीस्त ठेवण्यात आले.

माहितीच्या अधिकाराचा प्रसार हा थोड्याच कालावधीत इतर राज्यातही झाला. या कायद्यामुळे शासकीय कामातील सत्यता लोकांसमोर येत असल्याने लोकांना हा अधिकार लवकरात लवकर कायद्यातून प्राप्त व्हावा. यासाठी सर्व घटकराज्यातून हालचाली सुरू झाल्या होत्या. उत्तरप्रदेशामध्ये टेहरी गढवाल मधील भिलंगन प्रांतात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी उत्तरप्रदेश सरकारने माहिती अधिकार कायदा लागू करावा. अशी मागणी पुढे आली. आंध्रप्रदेशात हैद्राबाद येथील अद्दागुहा नावाच्या झोपडपट्टीच्या विकासासाठी मान्य झालेल्या

पैशाचा वापर कसा होणार याची माहिती 'असरा महिला संघम' या संघटनेने मागीतली होती. थोडक्यात, आंध्र प्रदेशात माहितीचा कायदा जरी अस्तित्वात नसला, तरी त्याचे महत्व लोकांनी समजून घेतले.

**सारांश:-**

माहितीच्या अधिकाराची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर 'स्वीडन' देशात जन्मास आलेल्या माहिती अधिकार कायद्याच्या रोपट्याने त्याचे विविध राष्ट्रात एका मोठ्या वृक्षात रूपांतर केल्याचे स्पष्ट होते. माहिती अधिकाराचा उद्देशच लोकांच्या मूलभूत अधिकारावर गदा येऊ नये यासाठी झाला. याशिवाय सार्वजनिक कार्यालयात आणि शासन पध्दतीत पारदर्शकता येऊन लोकांमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही रूजवून सुशासन निर्माण करणे हे या कायद्याचे ब्रीद होते. म्हणजेच लोकांना खरे स्वातंत्र्य देवून जबाबदार शासन पध्दतीत जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी स्वीडन बरोबरच अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, कॅनडा या राष्ट्रांबरोबरच भारतानेही हा कायदा लागू केला. भारतात M.K.S.S. संघटनेचा या कायद्याच्या निर्मितीसाठी मोलाचा वाटा होता. याशिवाय राष्ट्रीय पातळीवरील शासकीय व अशासकीय संघटनांच्या चळवळीमुळे या कायद्याची पार्श्वभूमी तयार होवून, भारतातील इतर घटकराज्यातही या कायद्याची विशिष्ट महती जाणून घेवून वेगवेगळे कायदे करण्यात आले. याचाच परिणाम म्हणून भारतामध्येही सुशासन यावे यासाठी 'संयुक्त पुरोगामी आघाडी' सरकारने १२ ऑक्टोबर २००५ रोजी माहितीचा अधिकार कायदा २००५ (जम्मू काश्मीर राज्य वगळून) संपूर्ण देशासाठी लागू केला.

**आपली प्रगती तपासा (सरावासाठी महत्वपूर्ण प्रश्न) :-**

(१) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे निकाल यावर भाष्य करा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

(२) स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार किंवा चळवळी यावर निबंध लिहा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

(३) विविध घटक राज्यांमधील माहिती कायद्यांचे स्वरूप स्पष्ट करा ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-**

१. Right to Information Act, 2005: A Primer, Tata McGraw-Hill Publishing Company Linited, New Delhi, 2006

२. published on behalf of Right to Information Cell, Yashwantarao Chavan Academy of Development Administration (YASHADA).

३. Mishra, Neelabh, A Battle Half Won-Right to Information: 6 Combat Law, Bombay, 2003.

४. Roy Aruna, A Fight for Right to Know, Yojana, January, 2006.

५. Amulya Gopalakrishnan, Information by Right, Frontline, January, 2003.

६. Human Development Resource Centre, UNDP, New Delhi, 2003,

७. https://studylib.net/doc/11537903/the-movement-for-right-to-information-in-india.

(१) आवाळे मनोज, (२००८) माहिती अधिकाराची यशोगाथा, आदिश्रेय प्रकाशन, पुणे.

(२) चपळगावकर न्या. नरेंद्र, माहितीचा अधिकार, राळेगण सिध्दी परिवार, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

(३) आवाळे मनोज, (२००६) माहितीचा अधिकार दप्तर दिरंगाई कायद्यासहित, कृषिदूत प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे.

(४) हजारे अण्णा, (२००६) माहितीचा अधिकार २००५, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगण सिध्दी, ता.पारनेर जि. अहमदनगर.

(५) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, माहितीचा अधिकार कायदा २००५, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.

(६) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), (२००४) (संपा.) महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२, बानेर रोड, पुणे.

(७) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), (२००५) (संपा.) हॅन्डबुक ऑन राईट टू इन्फर्मेशन ॲक्ट २००५, बाणेर रोड, पुणे.

(८) राज्य माहिती आयोग अहवाल, (२००८) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, तिसरा वार्षिक अहवाल ०१ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई.

(९) राज्य माहिती आयोग अहवाल,(२००९) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, चौथा वार्षिक अहवाल ०१ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २००९,१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# माहितीचा अधिकार कायदा २००५ : सार्वजनिक प्राधिकरणाचे दायीत्व

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ (अ) अर्जदाराची पात्रता (माहिती मिळविण्याची पद्धत)

३.४ (ब) स्वतः बोधवाक्य प्रकटीकरण आणि (PIO) जन माहिती अधिकाऱ्याचे नामनिर्देशन व त्यांची कर्तव्य

३.५ (क) अर्ज सादर करणे आणि निकाली काढणे

## ३.१ उद्दिष्टे

३.१.१ अर्जदाराची पात्रता व माहिती मिळविण्याची पद्धत समजून घेता येईल.

३.१.२ स्वतः बोधवाक्य प्रकटीकरण कसे करावयाचे ते लक्षात येईल.

३.१.३ (PIO) जन माहिती अधिकाऱ्याचे नामनिर्देशन व त्यांची कर्तव्य समजून घेता येतील.

३.१.४ अर्ज सादर करणे आणि निकाली काढणे यांची प्रक्रिया माहित होईल.

## ३.२ प्रास्ताविक

भारत सरकारचा केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार कायदा २००० अस्तित्वात होता. आणि कालांतराने या कायद्यातील त्रुटी दूर करून महाराष्ट्र शासनाने हा कायदा २००२ मध्ये नव्याने अस्तित्वात आणला. हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी "तत्कालीन विरोधी पक्षाचे आमदार मंगलप्रभात लोढा यांनी विधानसभेत जे अशासकीय विधेयक १९९७, १९९८,१९९९ साली सादर केले होते." हे अशासकीय विधेयक संमत होऊ शकले नाही, परंतु या विविध विधेयकांमुळे आणि इतर राज्यातील माहिती अधिकाराच्या कायद्यामुळे महाराष्ट्र शासनाला अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात आणणे महत्त्वाचे वाटले.

### ३.२.१ महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा (२०००) :-

महाराष्ट्र शासनाने ११ डिसेंबर २००० मध्ये जो माहितीचा अधिकार कायदा लागू केला होता. तो शासन आणि शासनाने निर्माण केलेल्या संस्था, महामंडळ आणि संघटनांना लागू होता. या कायद्यानुसार माहिती मागणाऱ्या व्यक्तीला ३० दिवसांच्या आत माहिती देण्याचे बंधन होते. संबंधीत माहिती देण्यासाठी जास्त खर्च येत असल्यास अर्जदाराला दिलगिरीचे

उत्तर पाठवण्याची यात तरतूद होती. संबंधीत माहिती नाकारल्यावर आव्हान (अपील) देण्याचे अधिकार शासनाकडे होते. तसेच ही माहिती कोणत्या कारणास्तव पाहिजे याचीही तरतूद या कायद्यात करण्यात आली होती.

महाराष्ट्र राज्याच्या माहिती अधिकार कायदा २००० बाबत तत्कालीन सामान्य प्रशासन विभागाचे मंत्री मा. लक्ष्मण ढोबळे यांच्यामते, "शासकीय कामकाजात पारदर्शकता आणून सामान्य माणसाला माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी हे विधेयक आणले आहे." थोडक्यात शासकीय संस्थामधील दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी नागरिकांना हा कायदा देण्यात आला होता. या कायद्याद्वारे माहिती मिळविणाऱ्या नागरिकाला कोणत्याही दस्तऐवजासाठी १० रू. किंमतीचा न्यायालयीन शुल्क मुद्रांक चिटकावून अर्जाने अधिकाऱ्याकडून माहिती घेता येत होती. ही माहिती अर्ज प्राप्ती पासून ३० दिवसांच्या आत नागरिकांना द्यावी लागत होती. परंतु या कायद्यातील कलम ३ (२) नुसार अर्ज नामंजूर करता येत होते. अर्जदारास माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी छायांकित प्रतिसाठीचा खर्च प्रतिपृष्ठ २ रू. आणि टपालाने माहिती घ्यायची असल्यास टपाल खर्चाची रक्कम भरावी लागत असे.

माहिती अधिकार कायदा २००० च्या तरतुदीनुसार अर्जदाराचे ३० दिवसाच्या आत संबंधित माहितीने समाधान न झाल्यास तो अपील अर्ज शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे करू शकत होता. यामध्ये नामंजूर अर्जासाठी पुनर्विचाराचा आव्हान अर्ज करून त्याचे शुल्क आणि संबंधीत कालावधी याची तरतूद करण्यात आली नव्हती. जो अर्ज नामंजूर झाला आहे. त्या अर्जाचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत २० रू. न्यायालयीन शुल्क मुद्रांक चिटकवून अर्जासोबत नामंजूर झालेल्या आदेशाची प्रत तसेच, आव्हान कर्त्यास लेखी निवेदन करण्याची संधी या कायद्यात होती. आव्हान अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडून माहिती हवी असल्यास आव्हान अधिकारी विभागीय आयुक्त असतील आणि मंत्रालयात शासकीय स्तरावर सचिवाकडून माहिती हवी असेल. तर अशा बाबतीत संबंधीत विभागाचे मंत्री आव्हान अधिकारी असतील, असे या कायद्यात स्पष्ट केले होते. अर्जदाराविरूध्द जो काही शासन निर्णय घेता येईल तो निर्णय अंतीम आहे, असे यात स्पष्ट केले होते.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००० च्या कायद्यात माहिती नाकारण्याच्या काही तरतुदी होत्या. यामध्ये प्रामुख्याने जी माहिती उघड केल्याने राष्ट्राच्या एकात्मतेला, सार्वभौमत्वाला किंवा सुरक्षा व्यवस्थेला धोका निर्माण होईल. अशी माहिती, इतर देशाशी असलेले संबंध, जगातील इतर न्यायालयाकडून मिळालेली गोपनीय माहिती, आंतरराष्ट्रीय संघटना यांची माहिती गुप्त ठेवण्याची या कायद्यात तरतूद होती. याबरोबरच कॅबीनेट समित्यांच्या कार्यवाहीशी संबंधीत असलेली माहिती (कलम ३/२), जी माहिती उघड केल्याने न्यायदानात अडचण होईल अशी माहिती, जी माहिती उघड केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवीतास किंवा शारीरिक सुरक्षेस धोका निर्माण होईल. त्याबद्दलची माहिती, अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन करण्यास शासनास हानी पोहचणाऱ्या बाबींची माहिती याबरोबरच ज्या माहितीची गुप्तता ठेवली जाईल. अशी संविधानात्मक हमी देऊन मिळवलेली माहिती (गुप्तचर संघटना) आणि ज्या माहितीमुळे संसद किंवा राज्यविधीमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल. अशी माहिती गोपनिय ठेवण्याची तरतूद या कायद्यात होती.

महाराष्ट्र शासनाच्या २००० मधील माहितीच्या अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार त्यात अनेक प्रकारच्या त्रुटी दिसून आल्या. तत्कालीन आमदार मा. प्रकाश जावडेकर यांनी विधान परिषदेत या कायद्याबद्दल बोलतांना सांगीतले की, "हा कायदा म्हणजे माहिती मिळविण्याच्या नावाखाली माहिती नाकारणारे विधेयक असा लोकांचा समज झाला आहे." या बरोबरच विधानसभेत चर्चा सुरू असतांना ॲड. लिलाधर डाके असे म्हणाले की, "विधी व्यावसायिकांच्या विशेषाधिकारांचा समावेश होतो अशी माहिती, आणि कोणते विशेषाधिकार आहेत ते सांगावेत. यात ज्या विशेषाधिकारासंबंधी माहिती देण्यास तुम्ही नाखुष आहात तेही सांगावे." याच तरतुदीवर विधानसभेतील चर्चेत मा. एकनाथ खडसे म्हणाले की, "विधी व्यावसायींचा विशेषाधिकार याचा नेमका अर्थ मला वाटते 'वकील' असावा. वकीलांचा म्हणजे विधी व्यावसायीचा विशेषाधिकार वकीलाला असे काय विशेषाधिकार आहेत की, त्यासंदर्भात माहिती घेतल्यामुळे त्यात बाधा येईल." याच कायद्याबाबत बोलतांना आमदार मा. रविंद्र मिर्लेकर म्हणाले की, "कोणकोणत्या बाबतीत माहिती मिळू शकत नाही. याचा उल्लेख करणाऱ्या ६५ ओळी या कायद्यात आहेत. म्हणजेच हा कायदा माहिती मिळविण्याच्या अधिकारासाठी आहे की, ते अधिकार मिळणार नाहीत. हे समजण्यास मार्ग नाही." याच कायद्यावर टीका करतांना तत्कालीन विरोधक आमदार बळवंतराव ढोबळे म्हणाले की, "माहिती मिळविण्याचा अधिकार असे आपण म्हणता आणि ही माहिती देत असतांना आपण ३२ अटी लावता याचाच अर्थ असा आहे की, लोकांना माहिती मिळू नये."

अशा प्रकारे विधान परिषद आणि विधानसभेत महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० वर चर्चा होत असतांना, विशिष्ट माहिती नाकारण्याचे या कायद्यात सुचवल्याने तसेच इतर मुद्यांमुळे या कायद्यावर टिका करण्यात आली. या बरोबरच मा. एकनाथ खडसे पुढे म्हणाले की, "माहिती मागण्याचा हेतू हा शुद्ध असला पाहिजे. असे या कायद्यात असेल तर माहिती मागितल्यानंतर त्याचा हेतू शुध्द आहे किंवा नाही हे कसे ठरवणार" ? या कायद्यातील माहिती देण्यासाठीच्या कालावधीच्या तरतुदीबाबत आणि रक्कमेबाबत सत्ताधारी पक्षाचे तत्कालीन आमदार मा. शिवाजीराव देशमुख म्हणाले की, "अधिकाऱ्याने ३० दिवसांच्या आत माहिती दिली नाही तर १०० रूपये कोणी भरायचे यासंबंधी विधेयकात कुठेही उल्लेख नाही." याच विधेयकातील अर्थव्यवस्थापनाच्या तरतुदीवर टिका करतांना ॲड लिलाधर डाके यांच्या मते, "म्हणजे आपण असे म्हणणार आहात की काय तुम्ही एखादी माहिती मागितली, त्यामुळे आमच्या अर्थव्यवस्थेच्या क्षमतेला कुठेतरी बाधा येते, म्हणून ती देता येणार नाही." आ.गिरीष बापट यांच्या मते, "हे बील न आणताही आजपर्यंत जी माहिती आम्हाला मिळत होती, सामान्य माणसाला मिळत होती, ती माहिती आता भविष्यात मिळणार नाही." महाराष्ट्र माहितीचा कायदा २००० हा कमकुवत ठरला. जेष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यातील त्रुटी बाबत म्हणतात की, "माहिती अधिकारसंबंधात सरकारने २००० मध्ये कायदा केला, मात्र तो करून न करण्यासारखाच होता. या कायद्यामध्ये माहिती देण्यापेक्षा माहिती न देण्यावरच अधिक भर होता."

अशा प्रकारे महाराष्ट्रातील माहितीच्या कायद्यात अनेक प्रकारच्या त्रुटी दिसून येत होत्या. यामध्ये टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यासंदर्भातील दंडात्मक कार्यवाहीची तरतूद, जीवीत व वित्त स्वातंत्र्याच्या संदर्भातील माहिती लवकर देण्याची तरतूद याची स्पष्टता न दिल्याने हा कायदा नागरिकांसाठी अडचणींचा ठरला आणि यात सुधारणा होण्यासाठी मा. अण्णा हजारेंनी आंदोलन सुरू केले.

### ३.२.२ महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा (२०००):-

मा. अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दी जि. अहमदनगर येथून महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० मध्ये सुधारणा करण्यासाठी आंदोलन सुरू केले. याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या कायद्याचा सुधारित मसुदा तयार करण्यासाठी जी समिती गठीत केली होती. त्यामध्ये विधी व न्याय मंत्री अध्यक्ष, प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग, अप्पर मुख्य सचिव, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. माधव गोडबोले, डॉ.सत्यरंजन साठे, ॲड सत्यरंजन धर्माधिकारी आणि विजय कुवळेकर यांचा समावेश होता. या समितीने तत्कालीन विविध राज्यातील कायदे व केंद्र सरकारच्या विचाराधीन असलेल्या तरतुदींचा अभ्यास करून एक मसूदा तयार केला. या मसुद्याला विधानसभा, विधान परिषद, राज्यपाल, राष्ट्रपती यांची संमती घेवून महाराष्ट्राचा २००० चा कायदा सुधारित करून २३ सप्टेंबर २००२ पासून प्रत्यक्ष अंमलबजवणीच्या स्वरूपात पूर्वलक्षी प्रभावाने सुरू करण्यात आला. २००२ च्या कायद्याची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

**या कायदयाची वैशिष्ट्ये**

**१) उद्देश :-**

महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००२ चा उद्देश पूर्वीच्या कायद्यापेक्षा व्यापक करून त्यात पारदर्शकता, खुलेपणा, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही समाजव्यवस्थेत जनतेचा सहभाग वाढवणे असा होता.

**२) व्याप्ती :-**

२००२ पूर्वीच्या महाराष्ट्राच्या कायद्यातील माहिती मागणाऱ्या व्यक्तीच्या प्रामाणिक हेतूची तरतूद काढून त्यात शासन व शासनाच्या संस्था, संघटना यामधून जो दस्तऐवज मिळत होता. त्याची व्याप्ती वाढवून संबंधीत माहिती डिस्केट्स, फ्लॉपी, इलेक्ट्रॉनिक प्रकार अशा स्वरूपात देण्याचे ठरवले.

**३) पध्दती :-**

अर्जदाराला माहिती मिळविण्यासाठी १५ दिवसांची तरतूद केली गेली. तसेच अर्ज नामंजूर करणे व जीवीत आणि वित्त स्वातंत्र्याची माहिती अर्जदाराला २४ तासांच्या आत पुरवली जाईल. याची तरतूद केली गेली. हा अर्ज फेटाळतांना त्याची कारणे व आव्हान अधिकारी याची माहिती अर्जदाराला लेखी देण्याची तरतूद केली गेली होती.

**४) सामान्यीकरण :-**

महाराष्ट्राच्या २००२ च्या कायद्यात माहिती नाकारण्याच्या तरतुदीची संख्या (कलम ८) नुसार ३२ वरून ११ करण्यात आली. यात एखाद्या व्यक्तीने मागितलेली माहिती नाकारण्याच्या हक्कातील अभिलेखाच्या भागात असल्यास व ही माहिती कायद्यात असल्यास ती मूळ अभिलेखा पासून वेगळी करण्याची तरतूद यात करण्यात आली. (कलम १०)

**५) अपील आव्हान पध्दत :-**

अर्जदाराचा अर्ज नामंजूर झाल्यास तो माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूध्द ३० दिवसांच्या आत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आव्हान अर्ज दाखल करण्याची तरतूद व अपील अधिकाऱ्याने दिलेला निर्णय मान्य नसल्यास अंतीम आव्हान लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडे करण्याची तरतूद होती.(कलम ११) आणि त्यांचा निर्णय अंतीम असल्याची तरतूद होती.

**६) दंड :-**

या कायद्यानुसार एखाद्या अधिकाऱ्याने संबंधीत माहिती दिलेल्या मुदतीत, अयोग्य, चुकीची, दिशाभूल करणारी दिल्यास त्याला अर्जाच्या सुनावणीतील नियमानुसार प्रत्येक दिवसाच्या विलंबास २५०/- रू. दंडाची तरतूद केली गेली होती. या कायद्याच्या (कलम १२) नुसार दंडाची जास्तीत जास्त रक्कम २०००/- रू. करून त्याच्या वेतनातून कपात करण्याची तरतूद करून शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

**७) माहिती स्वत:हून प्रसिध्द करण्याची तरतूद :-**

महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००० नुसार प्रत्येक शासकीय प्राधिकरणांना त्यांच्या स्वत:च्या कार्याचा तपशिल, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार, कर्तव्य, निर्णय घेतांना अनुसरावयाची पध्दती, शासन निर्णय, आदेश, कार्यालयीन अभिलेखांची यादी तसेच प्रशासकीय निर्णयांशी संबंधित सर्व माहिती प्राधिकरणांनी स्वत:हून प्रसिध्द करण्याची तरतूद यात करण्यात आली होती. (कलम ४ (ख,ग)

**८) अभिलेख आयोगाची स्थापना :-**

शासनाचे प्रतिनिधी, समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती यांचा मिळून शासनामार्फत अभिलेख आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. (कलम १४) जुने अभिलेख जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाला सल्ला देणे. हे या आयोगाचे कार्य होते. अभिलेख आयोगाचा निर्णय शासनावर बंधनकारक होता.

**९) राष्ट्रसंरक्षणाबाबतची माहिती ठरविण्यासाठी समितीची तरतूद :-**

शासनाचे मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, ज्यात दोन सदस्यांची नियुक्ती शासनामार्फत केली होती. ज्या माहितीमुळे देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला धोका निर्माण होईल, म्हणून माहिती देण्यात येणार नव्हती. अशा बाबतीत मागितलेली माहिती देणे अथवा न देणे हे ठरविण्यासाठी संबंधीत समिती गठीत करण्यात आली होती. सदर माहिती सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीकडे पाठवून ही माहिती देता येत नाही, असे या समितीने सांगीतले तर ती माहिती नाकारण्याची तरतूद करण्यात आली होती (कलम ७ क).

**१०) परिषदा गठित करणे :**

माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'राज्यस्तरीय परिषद' गठीत करण्याची तरतूद करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्ष मा. मुख्य सचिव असतील तर समाजातील नामवंत व्यक्ती, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, शिक्षणतज्ञ, अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी, सदस्य असतील अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली होती. (कलम १३(१) या बरोबरच महसूल विभागासाठी संबंधीत महसूल आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली परिषद गठीत करण्यात यावी. आणि राज्यस्तरीय परिषदे सारख्याच प्रतिनिधींची नेमणूक करण्याची तरतूद यात होती. या परिषदा सहा महिन्यातून किमान एकदा या कायद्याच्या कामाचा आढावा घेऊन शासनास मार्गदर्शन करतील अशी तरतूद करण्यात आली होती. (कलम १३ (२)

**११) सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नियुक्त्या :-**

कायद्याच्या अंमलबजावणीसाठी 'सक्षम प्राधिकारी' कोणते या कायद्यात स्पष्ट करण्यात आले होते. यात राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाचा प्रमुख, राज्यातील शासकीय व इतर प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख, सहकारी संस्थांसाठी सहकारी संस्थांचे निबंधक, सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्थेसाठी धर्मदाय आयुक्त, श्रमिक संघाकरीता कामगार आयुक्त, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी लोकसेवा आयोगाचा सचिव, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांच्यासाठी तसेच प्रशासकीय शाखेसाठी लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे प्रबंधक यांची तरतूद करण्यात आली होती. (कलम ३).

महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००० च्या तुलनेत २००२ च्या कायद्यात उद्दिष्टे व्यापक करण्यात आली होती. यात माहितीची व्याप्ती वाढवून माहिती नाकारण्याच्या तरतुदी कमी करण्यात आल्या, तसेच यात पृथ:करणाची तरतूद करण्यात आली. या कायद्यात अपील पध्दतीत बदल करून १५ दिवसांच्या आत योग्य कारणाशिवाय माहिती न दिल्यास दंडाची तरतुद करण्यात आली होती. यात जुने अभिलेख खुले करण्यासाठी आयोगाची स्थापना, अंमलबजावणीसाठी परिषदा गठीत करण्यात आल्या आणि सक्षम प्राधिकारी कोण ? आणि कार्यालयांनी स्वत:हून माहिती प्रसिध्द करण्याची तरतूद २००२ च्या कायद्यात करण्यात आली होती.

### ३.२.२ केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ :-

भारतात केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्रा बरोबरच कनार्टक, मध्यप्रदेश, तामीळनाडू, राजस्थान, गोवा या राज्यांमध्ये माहितीचा कायदा लागू करण्यात आला होता. या सर्व राज्यातील कायद्याचा उद्देश प्रशासकीय पारदर्शकता आणि खुले शासन असा असला तरी प्रत्येक घटकराज्यातील कायद्यात वेगवेगळ्या तरतुदी करण्यात आल्या होत्या. यात प्रामुख्याने महाराष्ट्रात माहिती अधिकार कायदा प्रभावीपणे अंमलात आणला गेला होता. महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००० मध्ये सुधारणा करुन नव्याने हा कायदा महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००२ च्या रुपाने पूर्वीच्या कायद्यातील त्रुटी व तरतुदी मधील उणीवा दूर करून अंमलात आणला गेला. यात प्रामुख्याने २००० साली जो माहिती अधिकार कायदा केला होता. त्यात माहिती देण्यापेक्षा ती न

देण्यावरच जास्त भर दिल्याने मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे यात सुधारणा करण्यात आली. या कायद्यासाठी महाराष्ट्र शासनाने वरिष्ठ निवृत्त आय.ए.एस. अधिकारी मा. माधवराव गोडबोले, सत्यरंजन साठे, ॲड. धर्माधिकारी यांची समिती नेमली. या समितीने जो मसूदा तयार केला तोच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा माहिती अधिकार कायदा २००२ होता. महाराष्ट्राचा हा कायदा इतर राज्यातील कायद्यापेक्षा अधिक सुटसुटीत व सोपा असल्याने महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी व्यापक स्वरूपात झाली या कायद्यामुळेच प्रशासकीय यंत्रणेत भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. याबरोबरच या कायद्याची लोकप्रियताही वाढत गेली.

लोकशाहीप्रधान भारत देशामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही अनेक घटकराज्यातील नागरिकांना माहितीचे स्वातंत्र्य मिळत नव्हते. परिणामी महाराष्ट्राने जो माहिती अधिकार कायदा लागू केला. तो इतर राज्यात अस्तित्वात नसल्याने तेथील नागरिकांची गरज लक्षात घेऊन केंद्र शासनाने संपूर्ण देशासाठी घटनेच्या रूपातून माहिती अधिकार कायदा अस्तित्वात आणण्याचे योजले होते. महाराष्ट्रात माहिती अधिकाराचा जो कायदा होता. त्याची केंद्र शासनाने दखल घेतली. यामुळेच देशभरातील सर्व राज्यात अस्तित्वात असलेले कायदे रद्द करून देशपातळीवर एकच कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे केंद्राच्या लक्षात आले. यामुळे महाराष्ट्रातील आणि इतर राज्यांच्या कायद्यातील तरतुदी लक्षात घेवून आणि त्यात असणाऱ्या त्रुटी दूर करून केंद्राने १२ ऑक्टोबर २००५ पासून माहिती अधिकार कायदा २००५ (जम्मु आणि काश्मीर वगळून) देशभरात लागू केला. या कायद्यामुळे महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये अस्तित्वात असणारे माहिती अधिकारासंदर्भातील सर्व कायदे आपोआपच रद्द झाले.

भारताच्या केंद्रीय माहिती अधिकार कायद्यात एकूण ३१ कलमे असून ५ प्रकरणे आहेत. National Campaign for People's Right to Information (N.C.P.R.I.) या संघटनेचे निमंत्रक व माहिती अधिकार कायद्याचे अभ्यासक शेखर सिंग यांच्यामते, "या कायद्याचा आवाका व्यापक असून कायद्याची व्याख्या विस्तृत करण्यात आलेली आहे. तसेच माहिती मिळविण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आलेली आहे. या कायद्यात शहरी आणि ग्रामीण जनतेलाही माहिती मिळणार असून माहिती उपलब्ध करून न दिल्यास दंडाचीही तरतूद करण्यात आलेली आहे. यात प्राधिकरणाला स्वत:हून माहिती प्रसिध्द करण्याचे बंधन आहे."

दिल्ली राज्यशासनाच्या प्रशासकीय सुधारणा विभागाचे सचिव प्रकाशकुमार व दिल्ली प्रशासकीय सुधारणा विभागाचे संचालक के.बी. रॉय यांच्यामते, "या कायद्यामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून हवी असलेली माहिती मिळवता येत असून कोणत्याही नागरिकाला शासकीय कामाची पाहणी करता येते. यात माहितीची व्याख्या विस्तृत केली असून जीवीत व स्वातंत्र्या संबंधीची माहिती ४८ तासात देण्याची तरतूद या कायद्यात केली आहे. त्यात द्विस्तरीय आव्हान पध्दती आणि माहिती आयोगाची स्थापना ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत." वरील विचारवंतांनी जी काही २००५ च्या कायद्याची वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत. त्या वैशिष्ट्यांचा अभ्यास पुढील प्रमाणे करता येईल.

**१) संपूर्ण भारतात लागू :-**

केंद्र सरकारने "जम्मु आणि कश्मीर" वगळून भारतातील सर्व घटकराज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना हा कायदा लागू केला (कलम १ मधील (२)) या बरोबरच सार्वजनिक प्राधिकरण, संसद, विधीमंडळे, उच्च व सर्वोच्च न्यायालयाकडून माहिती मिळवण्याचा हक्क या कायद्याने प्रदान करण्यात आलेला आहे.

**२) माहितीचा** अर्थ व **व्याख्या :-**

या कायद्यात (कलम ३ (च,त्र)) माहितीची व्याख्या सुलभ करण्यात आलेली असून यात अभिलेख, दस्तऐवज, ई-मेल, अभिप्राय, सूचना, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, अहवाल तसेच इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहिती मिळविण्याबरोबरच एखाद्या कामाची पाहणी करणे, अभिलेखाची टिपणे घेणे, कामाच्या सामग्रीचे नमुने घेण्याचा अधिकार सर्व सामान्य नागरिकांना देण्यात आलेला आहे.

**३) दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना फिसची सवलत :-**

शासनाने ठरविलेल्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना माहिती मागण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही, मात्र त्यासाठी संबंधीत व्यक्तीला दारिद्र्यरेषेखाली असल्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी लागेल.

**४) हवी असलेल्या माहितीचे कारण देण्याचे गरज नाही :-**

माहिती मिळविणाऱ्या अर्जदारास एखादी माहिती कशासाठी पाहिजे हे सांगण्याची गरज नाही. त्या व्यक्तीने पत्र व्यवहार करण्यासाठी आवश्यक पत्याशिवाय अन्य वैयक्तिक माहिती देण्याची गरज नाही. (कलम ६ (२)) एखाद्या व्यक्तीने तोंडी माहिती मागितल्यास माहिती अधिकारी तोंडी माहितीचे रूपांतर लेखी माहितीत करण्यास मदत करील. तसेच ज्ञानेंद्रियांच्या दृष्टिने विकलांग असणाऱ्या व्यक्तीला माहिती देण्यासाठी ज्यामुळे शक्य आहे ती सर्व मदत माहिती अधिकारी करतील अशी कायद्यात तरतूद आहे. (कलम ७(४))

**५) विशिष्ट वेळेचे बंधन :-**

या कायद्यानुसार कोणत्याही भारतीय नागरिकास अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत माहिती देणे किंवा अर्ज नामंजूर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. याशिवाय जी माहिती जीवित वा स्वातंत्र्याशी संबंधित आहे. अशी माहिती ४८ तासांच्या आत देण्याचे बंधनकारक आहे.

**६) गुप्तचर संघटनांना वगळले :-**

केंद्र सरकारने हा कायदा गुप्तचर संघटना आणि ज्या माहितीमुळे देशाच्या एकात्मतेला तडा बसेल अशी माहिती नाकारण्याचे स्पष्ट केलेले आहे. केंद्र सरकारने निर्माण केलेल्या १८ गुप्तचर संघटनांना (पहा परिशिष्ट क्र.२) या कायद्यानुसार माहिती देण्यास सूट असली तरी भ्रष्टाचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन या संबंधीची माहिती केंद्रीय माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावर ४५ दिवसांच्या आत देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

**७) स्वत:हून माहिती प्रसिध्द करण्याची तरतूद :-**

२००५ च्या कायद्यानुसार (कलम ४) प्रत्येक शासकीय प्राधिकरणाला माहितीचे संगणकीकरण करून आपल्या कार्यालयाची रचना, कर्तव्य व कार्ये याच्या विषयची माहिती व आपल्या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांची कर्तव्य आणि निर्णय घेत असतांना कोणती पध्दत वापरली जाते किंवा कार्यालयीन नियम, सूचना, अभिलेख, कर्मचाऱ्यांना मिळणारे मासिक वेतन, योजनांचा तपशील, ज्या व्यक्तींना परवाने दिलेले आहेत. अशा व्यक्तींचा तपशील इत्यादीची माहिती कार्यालयाने स्वत:हून प्रसिध्द करावी. असे यात स्पष्ट करण्यात आले आहे.

**८) द्विस्तरीय अपील :-**

एखाद्या व्यक्तीचे प्राप्त माहितीनुसार समाधान झाले नसल्यास किंवा अर्ज नामंजूर झाल्यास प्रथम माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूध्द अपिलीय अधिकारी म्हणून ज्या वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडे अपील अर्ज करण्याची तरतूद या कायद्यात केलेली आहे. असे आव्हान अर्ज माहिती नाकारल्याच्या दिवसापासून ४५ दिवसांच्या आत सादर करण्याची तरतूद असून अपिलीय अधिकाऱ्याने आव्हान अर्ज नामंजूर केल्यास केंद्रीय राज्य माहिती आयुक्ताकडे ९० दिवसांच्या आत आव्हान देण्याची सोय आहे; परंतु केंद्रीय राज्य माहिती आयुक्तांनी दिलेला निर्णय अंतीम असून त्या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात आव्हान देता येणार नाही, अशी यात तरतूद आहे, परंतू "केंद्रीय राज्य माहिती आयुक्ताच्या निर्णयाविरूध्द जनहितयाचिकेद्वारे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात भारतीय घटनेच्या कलम ३२ आणि २२५ नुसार आव्हान देता येते."

**९) शुल्कासंबंधीचे अधिकार :-**

अर्जदाराला माहिती देण्यासाठी येणारा खर्च लक्षात घेऊन राज्य सरकारांना झेरॉक्स (छायांकित) प्रतीचा खर्च ठरविण्याची मुभा देण्यात आलेली आहे. (कलम २७ (१)).

**१०) आयुक्तांचे अधिकार :-**

केंद्रीय राज्य माहिती आयुक्तांना या कायद्यानुसार आव्हान अर्जावर निर्णय देण्याबरोबरच या कायद्याच्या अंमलबजावणीचे अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच केंद्रीय किंवा राज्य माहिती आयुक्त संबंधित व्यक्तीला हजर राहण्याची नोटीस पाठवू शकतो. आणि दस्तऐवज सादर करण्यास सांगू शकतो. शपथपत्रावर साक्षी-पुरावा घेण्याचे अधिकारही आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. केंद्रीय वा राज्य माहिती आयुक्त न्यायालयाकडूनही शासकीय अभिलेख मागवू शकतो आणि सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अभिलेखाची तपासणी करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. (कलम १८(४)).

**११) दंडाची तरतूद :-**

केंद्रीय माहिती आयोगाने किंवा राज्य माहिती आयोगाने कोणत्याही तक्रारीवर किंवा आव्हान अर्जावर निर्णय देतांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्यास माहिती अधिकाऱ्यास प्रत्येक दिवसाला २५० रू. दंड होऊ शकतो. असे असले तरी दंडाची

जास्तीत जास्त रक्कम रू. २५०००/- पेक्षा जास्त असणार नाही. याशिवाय केंद्रीय किंवा राज्य माहिती आयोगाला माहिती देण्यासाठी जाणिवपूर्वक टाळाटाळ केली. असे सिध्द झाल्यास आयोग अशा बाबतीत संबंधित कर्मचाऱ्याविरूध्द त्याला लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कार्यवाही करू शकतो.

**१२) प्रशिक्षणाची सोय :-**

माहितीचा अधिकार कायदा प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राज्य सरकारवर टाकण्यात आली आहे. याबरोबरच या कायद्याचा वापर कसा करावा यासाठी नागरिकांनाही प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे. या कायद्यानुसार सर्वसामान्य नागरिकांना समजेल अशा भाषेत या कायद्याची मार्गदर्शिका संबंधित राज्याने त्या-त्या राज्याच्या भाषेत उपलब्ध करून द्यावी, ज्यामुळे या कायद्याचा प्रसार होईल, व जनतेलाही आपण कोणती माहिती मागितली पाहिजे हे कळू शकेल याची तरतूद आहे.(कलम २६).

**१३) वापरण्यास सोपा :**

ज्या नागरिकाला या कायद्यानुसार माहिती प्राप्त करायची आहे. तो सध्या कागदावर १० रूपयाचे न्यायालयीन शुल्क मुद्रांक चिटकवून माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर करू शकतो. माहिती अधिकारी ३० दिवसांच्या आत माहिती देईल किंवा नामंजूर करेल. अर्ज नामंजूर झाल्यास संबंधित माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयावर आव्हान अधिकाऱ्याकडे अपील अर्ज दाखल करता येतो. अपील अधिकाऱ्याचा निर्णय मान्य न झाल्यास शेवटी केंद्रीय किंवा राज्य माहिती आयुक्ताकडे आव्हान अर्ज ९० दिवसांच्या आत दाखल करण्याची यात तरतूद आहे.

२००५ च्या केंद्रीय माहिती अधिकार कायद्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यावर हा कायदा सर्वव्यापक असून सामान्य नागरिकालाही प्रत्येक प्राधिकरणातून माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त झालेला दिसून येतो. या कायद्यातील बऱ्याच तरतुदी महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००२ प्रमाणेच असलेले दिसून येते.

**३.२.३ केंद्रीय माहिती अधिकार कायदा (२००५)आणि महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा (२००२) च्या कायद्यातील साम्य व भेद :-**

**१) उद्दिष्टे :-**

महाराष्ट्र माहितीच्या अधिकार कायद्याचे मुख्य उद्दिष्टे राज्याच्या राज्यकारभारात पारदर्शकता आणणे, खुलेपणा व जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आणि नागरिकांचा लोकशाही समाजव्यवस्थेत सहभाग वाढवणे अशी होती.

"केंद्रिय माहितीचा कायदा २००५ ची उद्दिष्टे लोकशाहीत माहितगार नागरिक समूह तयार करणे, पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, राज्यशासने व त्यांच्या यंत्रणांना जनतेला जाब देण्यासाठी उत्तरदायी ठरवणे,

शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालवणे आणि मर्यादित साधन संपत्तीचा योग्य वापर होणे ही आहेत."

दोन्ही कायद्यांच्या उद्दिष्टांची तुलना केल्यास त्यातील वैशिष्ट्ये सारखी असून भ्रष्टाचाराला आळा घालणे आणि जनतेचा प्राधिकरणातील सहभाग वाढवणे असा उद्देश आहे.

**२) स्वरूप :-**

"महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ नुसार माहितीचा अर्थ शासनाच्या आणि कोणत्याही शासकीय प्राधिकरणाच्या कारभारासंबंधातील, कोणत्याही बाबी विषयीची माहिती, ज्यात दस्तऐवज, डिस्केट्स, फ्लॉपी किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक प्रकारामधील कोणत्याही अभिलेखाच्या प्रतींचा समावेश होतो."

"केंद्रिय माहितीचा कायदा २००५ नुसार शासनाचे अभिलेख, दस्तऐवज, लॉग बुक्स प्राप्त झालेले सल्ले, परिपत्रके, आदेश, निविदा, अहवाल यांच्या प्रती मिळवता येतील असे 'माहिती' या शब्दात सांगीतले आहे. त्याच प्रमाणे शासकीय प्राधिकरणांकडे उपलब्ध असलेल्या साहित्याचे नमुने, प्रतिकृती, इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील साठवलेली माहिती, ई मेल इत्यादी बाबी प्राप्त करता येतील. तसेच या कायद्यात अभिलेख व साहित्य तपासण्याच्या अधिकाराची तरतूद आहे."

वरील कायद्यांच्या स्वरूपाची तुलना केल्यावर त्यात साम्य असल्याचे आढळते. यात प्रामुख्याने शासकीय प्राधिकरणाच्या संबंधातील कोणतीही माहिती मागवता येते. ही माहिती व्यापक स्वरूपाची असून त्यात दस्तऐवज, डिस्केटस, फ्लॉपी, ईलेक्ट्रॉनिक माहिती, प्राप्त झालेले सल्ले हे महाराष्ट्राच्या कायद्यात नव्हते. पण याचा समावेश केंद्रीय कायद्यात करण्यात आलेला आहे.

**३) व्याप्ती :-**

"महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा संपूर्ण महाराष्ट्रापुरताच मर्यादित होता. शासनाचे सर्व विभाग, राज्यातील विविध प्राधिकरणे, सहकारी संस्था, कामगार संघ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्राचे लोकायुक्त कार्यालय आणि राज्य सरकारने स्थापन केलेल्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटनाशिवाय वरील सर्व कार्यालयांना कायद्यानुसार माहिती देणे बंधनकारक होते."

"केंद्रीय कायद्यानुसार हा कायदा कलम १(२) नुसार (जम्मु व काश्मीर) राज्या व्यतिरिक्त संपूर्ण देशात लागू आहे. या कायद्यामुळे केंद्र व राज्य सरकारनी निर्माण केलेले सार्वजनिक प्राधिकरणे, संसद, राज्यविधी मंडळे, न्यायालय, बँका यांनाही या कायद्यानुसार माहिती देणे बंधनकारक आहे. यात केंद्र सरकारने स्थापन केलेल्या विविध १८ गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना यांना वगळण्यात आलेले आहे."

दोन्ही कायद्यांच्या व्याप्तीचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या कायद्याची व्याप्ती ही महाराष्ट्रापुरतीच मर्यादीत होती. शिवाय तो कायदा कायदे मंडळ, न्यायालय आणि बँकांना लागू नव्हता. परंतु केंद्रीय माहितीचा कायदा व्यापक असून तो संपूर्ण भारतासाठी लागू असून त्यात कायदेमंडळ, बँका, न्यायालय आणि राज्य विधीमंडळांना या कायद्यानुसार माहिती द्यावी लागते.

**४) यंत्रणा :-**

महाराष्ट्र माहिती अधिकार कायद्यात अर्जदाराला शासकीय माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याची तरतूद होती त्यात अपिलीय अधिकारी आणि दुसरे अपील लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडे दाखल करण्याची तरतूद होती.

केंद्रीय माहितीचा कायदा २००५ नुसार नागरिकांना हवी असलेली माहिती 'माहिती' अधिकाऱ्याकडून मागितली जाते. यात अर्जदाराचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्यास तो प्रथम अपील अपिलीय अधिकाऱ्याला करू शकतो. आणि दुसरे अपील राज्य सरकारशी संबंधीत राज्य माहिती आयुक्ताकडे तर केंद्राशी संबंधीत माहितीसाठी केंद्रीय माहिती आयुक्ताकडे अपील करण्याची तरतूद या कायद्यात आहे. केंद्रीय किंवा राज्य माहिती आयुक्ताचा निर्णय अंतीम असल्याचे यात स्पष्ट केलेले आहे.

दोन्ही कायद्याच्या पध्दतीचा अभ्यास केल्यास त्यातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या तरतुदी समान असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र कायद्यातील दुसरे अपील लोकायुक्ताकडे किंवा उपलोकायुक्ताकडे दाखल करता येत होते. तर केंद्रीय कायद्यानुसार दुसरे अपील राज्य माहिती आयुक्ताकडे आणि केंद्राशी संबंधीत माहिती असेल तर ती केंद्रीय माहिती आयुक्ताकडे दाखल करावे लागते. माहिती आयुक्तांची कार्ये केवळ अपील करण्यापुरतेच मर्यादित न राहता या कायद्याच्या अंमलबजावणी आणि नियंत्रणाची कार्ये आयुक्ताकडे सोपविलेली असल्याची तरतूद केंद्राच्या कायद्यात असून ती महाराष्ट्राच्या कायद्यात नव्हती. महाराष्ट्राच्या कायद्यात अपीलाचा अंतीम निर्णय लोकायुक्ताचा असेल तर केंद्रीय कायद्यात अंतीम निर्णय हा राज्य किंवा केंद्राच्या आयुक्ताचा असल्याची तरतूद आहे.

**५) अर्जाची पध्दती :-**

"महाराष्ट्र राज्याच्या माहिती अधिकार कायद्यानुसार माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीस विहित नमुन्यानुसार साध्या कागदावर अर्ज लिहून त्यावर १० रूपयांचा न्यायालयीन शुल्क मुद्रांक चिटकवून संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज दाखल केल्यावर संबंधित माहिती अधिकारी १५ दिवसांच्या आत अर्जदाराला माहिती देत असे किंवा नाकारत असे. माहिती देण्याचे ठरविल्यावर संबंधित अर्जदाराला ती माहिती घेण्यासाठी रोखीने शुल्क भरावे लागे किंवा मनीऑर्डरने कोषागरात भरावे लागे."

महाराष्ट्र माहिती अधिकार कायद्यात अशीही तरतूद होती की, मागणी करण्यात आलेली माहिती जर एखाद्या व्यक्तीच्या जीवीत व स्वातंत्र्याशी संबंधित असेल तर ती माहिती अर्जदारास २४ तासांच्या आत दिली जात असे.

केंद्रीय माहितीच्या कायद्यानुसार माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीस लेखी स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे केलेली विनंती विहित शुल्कासह स्वीकारण्यात येईल. तसेच जेव्हा लेखी विनंती करता येत नसेल, तेव्हा माहिती अधिकारी मौखिक विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती लेखी स्वरूपात आणण्यास मदत करील, तसेच माहिती कशासाठी पाहिजे हे सांगण्याची गरज नाही. अर्जदाराला संपर्काच्या पत्याशिवाय कोणतीही माहिती देणे गरजेचे नाही. अर्ज प्राप्त झाल्यावर ३० दिवसांच्या आत अर्ज निकाली काढण्याची व्यवस्था आहे. संबंधित माहिती जर व्यक्तीच्या जीवीत व स्वातंत्र्याशी संबंधित असेल तर विनंती अर्ज मिळाल्याच्या ४८ तासांच्या आत देण्याचे बंधनकारक आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला अर्जाच्या शुल्कातून सूट देण्यात आलेली आहे. मात्र त्याला शासनाने पुरविलेले दारिद्र्यरेषेखालचे प्रमाणपत्र सादर करावे लागते.

दोन्ही कायद्यामध्ये अर्जाची जी प्रक्रिया आहे. त्यात न्यायालयीन शुल्क मुद्रांक लावण्याची तरतूद होती. महाराष्ट्राच्या कायद्यात अर्ज मिळालेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत ती माहिती नागरिकाला पुरवणे बंधनकारक होते. तर केंद्रीय कायद्यात ही मुदत ३० दिवसांपर्यंत करण्यात आलेली आहे. एखाद्या व्यक्तीच्या जीवीत व स्वातंत्र्याशी निगडीत असलेली माहिती महाराष्ट्राच्या कायद्यानुसार २४ तासांच्या आत द्यावी लागत होती. तर केंद्रीय कायद्यानुसार ही मुदत ४८ तासांची करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या कायद्यात हवी असलेली माहिती इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मागण्याची तरतूद नव्हती. तसेच मौखिक माहितीची सुध्दा तरतूद नव्हती. या व्यतीरिक्त केंद्रीय कायद्यात दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला शुल्कात सवलत दिल्याने तो महाराष्ट्राच्या कायद्यापेक्षा वेगळा ठरला.

### ६) शास्ती (शिक्षा) :-

महाराष्ट्र माहितीच्या कायद्यात माहिती अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करून दिली नाही किंवा सदरील माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असेल तर त्याला शिक्षादेण्याची तरतूद या कायद्यात होती. ही माहिती उपलब्ध करून देतांना वाजवीपेक्षा जास्त विलंब झाल्यास प्रतिदिन २५० रूपये इतकी दंडाची शिक्षा आणि जास्तीत जास्त २००० रूपये दंडाची शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यात होती.

केंद्राच्या कायद्यामध्ये अर्जदारास संबंधीत माहिती वेळेत न मिळाल्यास माहिती अधिकाऱ्याला प्रतिदिन २५०/- रूपये व जास्तीत जास्त २५०००/- रूपये दंड करण्याची तरतूद या कायद्यात आहे.

दंडाच्या बाबतीत महाराष्ट्र आणि केंद्राच्या कायद्यात प्रतिदिन २५०/- रूपये दंडाची समान तरतूद आहे. महाराष्ट्राच्या कायद्यात जास्तीत जास्त ही तरतूद २०००/- रूपये एवढी होती तर केंद्रातील कायद्यानुसार ही तरतूद २५०००/- रूपये करण्यात आलेली आहे.

**७) अपील :-**

महाराष्ट्राच्या कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीचा अर्ज नामंजूर झाल्यास अशा व्यक्तीला ३० दिवसांच्या आत माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूध्द अपिलीय अधिकाऱ्याकडे आव्हान देण्याची तरतूद होती. तसेच हा अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अर्जदाराला काही कळविण्यात आले नसल्यास आव्हान देण्याची तरतूद होती. यात अपील अधिकाऱ्याने दिलेला निर्णय मान्य न झाल्यास अंतीम आव्हान लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांच्याकडे ३० दिवसांच्या आत करण्याची तरतूद होती. लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांनी दिलेला निर्णय अंतीम व बंधनकारक होता.

केंद्रीय कायद्यानुसार एखाद्या अर्जदाराचे माहिती अधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्यास तो माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूध्द माहिती मिळालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्याच प्राधिकरणातील अपिलीय अधिकाऱ्याकडे आव्हान देऊ शकतो. अपिलीय अधिकाऱ्याला संबंधीत निर्णय ४५ दिवसांच्या आत देण्याचे (कलम १९ (१)) बंधनकारक आहे. जर अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयानेही त्या अर्जदाराचे समाधान न झाल्यास त्यास अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या विरोधात प्राप्त माहितीच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत केंद्रीय किंवा राज्य माहिती आयुक्ताकडे आव्हान देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आलेली आहे. यात केंद्र किंवा राज्य माहिती आयुक्ताचा निर्णय अंतीम व बंधनकारक आहे. (कलम १९ (१))

दोन्ही कायद्याच्या आव्हान पध्दतीची तुलना केल्यास द्विस्तरीय आव्हान पध्दतीत साम्य असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या कायद्यात प्रथम अपील हे माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत देण्याची तरतूद होती. तर केंद्रीय कायद्यामध्ये माहिती देण्यासाठीचा कालावधी ३० दिवसांचा आहे. पण अर्जदाराचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्यास प्राप्त माहितीच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत प्रथम अपील करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्राच्या कायद्यात द्वितीय अपीलाची मर्यादा ३० दिवसांची होती. तर केंद्रीय कायद्यामध्ये द्वितीय अपील दाखल करण्याची मुदत प्रथम अपिलीय माहिती प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसांची करण्यात

आली आहे. महाराष्ट्राच्या कायद्यात लोकायुक्त किंवा उपलोकायुक्त यांनी दिलेला निर्णय अंतिम व बंधनकारक होता. तर केंद्रीय कायद्यात राज्य किंवा केंद्रीय आयुक्तांचा निर्णय अंतीम व बंधनकारक आहे.

**८) माहिती प्रकाशना बाबत :-**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ मधील (कलम ४) नुसार अशी तरतूद होती की, प्राधिकरणांनी स्वत:हून माहिती प्रसिध्द करावी. यात प्राधिकरणाची रचना, कार्ये, कर्तव्य, प्राधिकरणातील कर्मचारी वर्ग, त्यांची कार्ये, त्यांची निर्णय घेण्याची पध्दती, प्राधिकरण कोणत्या आधारावर निर्णय घेते ते आधार, सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून देता येतील असे नियम, सूचना, नियमपुस्तिका, शासनाने घेतलेले निर्णय, शासनाचे विविध आदेश, शासनाने वेळोवेळी केलेले मार्गदर्शन, प्राधिकरणात उपलब्ध असलेल्या अभिलेखांची यादी तसेच नागरिकांना उपलब्ध असलेल्या सोयी व त्या प्राधिकरणाचा माहिती अधिकारी कोण त्यांचे नांव, त्यांचा हुद्दा तसेच निर्णय व धोरणे घोषीत केल्यावर त्यांचा जनतेवर होणारा परिणाम याची वस्तुस्थिती प्रसिध्द करण्याची व कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी हा प्रकल्प सुरू झाल्यावर ज्यांच्यावर परिणाम होणार आहे. अशा व्यक्तींना किंवा सर्व जनतेसाठी त्या प्रकल्पाबाबत सर्व माहिती प्रसिध्द करण्याची तरतूद होती.

केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार (कलम ४) सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वत:हून माहिती प्रसिध्द करावी अशी तरतूद आहे. यात प्रत्येक कार्यालयाने त्यांच्या कामकाजाची व कर्तव्याची संपूर्ण माहिती, अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अधिकार, निर्णय घेण्याचे अधिकार आणि जबाबदारी, कामकाजाची कार्य पध्दती, नियम, परिपत्रके, सूचना, प्राधिकरणाच्या अखत्यारीत येणारी कागदपत्रे, सल्ला मसलतीसाठीची यंत्रणा व जनतेसाठी मार्गदर्शनाची कार्यपध्दती, प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नावांची सूची, त्यांचा पगार, विनियोगासाठी उपलब्ध असलेला निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी व वापर, अनुदान उपलब्ध असल्यास ती माहिती, कार्यक्रम व लाभार्थी बाबतची माहिती, सवलती परवाने, या बाबत जे अधिकार आहेत त्यांची माहिती, इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे उपलब्ध करून देण्याची माहिती, नागरिकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा, कार्यालयीन वेळ, ग्रंथालयाची माहिती इत्यादी माहिती संस्थेने किंवा प्राधिकरणांनी निश्चित केलेली अन्य संबंधित माहिती दर वर्षी नव्याने प्रसिध्द करण्याची तरतूद आहे.

दोन्ही कायद्याच्या स्वयंप्रेरित प्रकाशित माहितीचा अभ्यास केल्यास असे दिसते की, महाराष्ट्र माहितीच्या कायद्यातील आणि केंद्रीय कायद्यातील तरतुदी सारख्याच आहेत. मात्र महाराष्ट्राच्या कायद्यात ज्या तरतुदी नव्हत्या त्या केंद्रीय कायद्यात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. यात प्रामुख्याने प्राधिकरणाच्या विनियोगासाठी असलेला निधी, योजना, खर्चाच्या तरतुदी, अनुदान उपलब्ध असल्यास अशी माहिती तसेच कोणत्या कार्यक्रमाला किती अनुदान, हे अनुदान दिल्याचे व वाटपाचे तसेच सवलती देण्यात आलेल्यांची

नावे व परवाने यांचा तपशिल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली माहिती संबंधित खात्याने दरवर्षी प्रसिध्द करण्याची तरतूद केंद्राच्या कायद्यात आहे.

## ९) निर्बंध लावलेल्या बाबी :-

महाराष्ट्राच्या २००२ च्या कायद्यात विशिष्ट माहिती नाकारण्याच्या ११ तरतुदी होत्या. यात प्रामुख्याने देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता, राज्याची सुरक्षितता, परराष्ट्रांशी असलेले संबंध, न्यायालयाने माहिती उघड करण्यास घातलेली मनाई, संसद किंवा राज्य विधीमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होईल अशी माहिती, वाणिज्य क्षेत्राविषयीची गुपीते, एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाची माहिती, गुप्ततेची माहिती, गुन्हेगारांची माहिती, चौकशी, अटक यामध्ये अडथळा आणणारी माहिती, जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशी वैयक्तिक माहिती महाराष्ट्राच्या कायद्यानुसार मिळवता येत नव्हती.

केंद्रीय माहितीच्या कायद्यात विशिष्ट माहिती नाकारण्याच्या १२ तरतुदी आहेत.  यात जी माहिती उघड केल्याने भारताचे सार्वभौमत्व धोक्यात येऊन एकात्मतेवर परिणाम होईल, जी माहिती प्रकट करण्यास न्यायालयाने बंदी घातली आहे, विदेशी सरकारकडून गुप्तपणे मिळालेली माहिती, संसद किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल, वाणिज्यविषयक गुपीते, विदेशी शासनांकडून मिळालेली माहिती व जी माहिती मंत्रिमंडळाचे दस्तऐवज या स्वरूपाची असेल आणि ती उघड करण्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल अशी वैयक्तिक स्वरूपाची माहिती तसेच केंद्र शासनाने निर्माण केलेल्या १८ गुप्तचर संघटनांची माहिती या कायद्याच्या तरतूदींनुसार मिळणार नाही.

दोन्ही कायद्याच्या निर्बंध टाकलेल्या माहितीचा अभ्यास केल्यास असे स्पष्ट होते की, देशाच्या संरक्षणासंबंधीची माहिती, व्यापाराविषयीची गुपिते, न्यायालयाने निर्बंध लादलेली माहिती, संसद व विधीमंडळाच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन होईल. अशी माहिती, गुन्हेगारासंबंधीची माहिती देण्याची तरतूद महाराष्ट्राच्या कायद्यात नव्हती. याच तरतुदी केंद्रीय कायद्यातही आहेत. महाराष्ट्राच्या कायद्यात एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाची माहिती देता येत नव्हती. तसेच महाराष्ट्राच्या कायद्यात गुप्ततेच्या कायद्यानुसार जी माहिती उघड करण्यास मनाई केली आहे अशी माहिती देत येत नव्हती; तर केंद्रातील कायद्यानुसार १९२३  च्या गुप्ततेच्या कायद्याच्या तरतुदीत जे काही उघड केलेले नाही अशी माहिती लोकहिताच्या दृष्टीने जनतेला उघड करून देणे सर्व प्राधिकरणांना बंधनकारक आहे. थोडक्यात ब्रिटीशांचा गुप्ततेचा वारसा महाराष्ट्राच्या कायद्यात रूजलेला होता तर केंद्रीय कायद्यामध्ये गुप्ततेच्या कायद्याला हद्दपार करण्यात आलेले आहे, महाराष्ट्राच्या कायद्यात कोणत्याही अर्जदाराला फक्त १५ वर्षापूर्वीचीच माहिती मिळवता येत होती, तर केंद्रीय कायद्यात माहिती २०  वर्षापूर्वीच्या

कालावधीची देण्याची तरतूद आहे. (कलम ८(३)). केंद्र सरकारने ज्या संस्थांची माहिती देता येणार नाही अशा १८ सुरक्षा संस्थांना या कायद्याच्या कक्षेतून वगळलेले आहे. तथापि या संस्थातील भ्रष्टाचारा संबंधीचे आरोप अथवा मानवी हक्कांच्या उल्लंघनाची माहिती प्राप्त करता येते. (कलम २४(१)).

**१०) संगणकीय सुविधा :-**

महाराष्ट्र माहितीच्या अधिकार कायद्यामध्ये फक्त संगणकाद्वारे निर्माण करण्यात आलेली माहिती मिळत होती. (कलम ९(४)) तर केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार अर्जदाराला संगणकाद्वारे निर्माण केलेले कोणतेही साहित्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.(कलम २ (श(घ)) थोडक्यात महाराष्ट्र माहितीच्या अधिकार कायद्यात आणि केंद्राच्या कायद्यात कोणती माहिती देता येईल याचा उल्लेख केलेला आहे. केंद्रीय माहितीच्या अधिकार कायद्यात इलेक्ट्रॉनिक साधनांच्या मदतीने केलेल्या विनंतीच्या माहितीची पुर्तता करण्यात येते. (कलम ६ (१)) जी महाराष्ट्र माहितीच्या कायद्यात नव्हती.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ आणि केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यातील माहितीची व्याख्या, माहिती अधिकाऱ्याची नेमणूक, विनंती अर्ज निकाली काढण्याची मुदत, माहिती नाकारण्याच्या तरतुदी, दंड, सद्भावनेने केलेल्या कृत्तीचे संरक्षण या तरतुदी सारख्याच असल्याचे स्पष्ट होते. थोडक्यात, सांगायचे म्हटले तर महाराष्ट्राचा माहिती अधिकार कायदा हाच केंद्रीय माहिती अधिकार कायद्याचा पाया आहे. याचे कारण म्हणजे केंद्राने महाराष्ट्राच्या माहिती अधिकार कायद्यातील त्रुटीचे निरसण करून नव्याने हा कायदा जनतेला बहाल करून दिला. महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा आणि केंद्रीय माहितीचा कायदा यामध्ये व्यक्तीच्या जीवीत, स्वातंत्र्याशी संबंधित माहिती देण्याचे स्पष्ट केलेले आहे. या माहिती बाबत महाराष्ट्राच्या २००२ च्या कायद्यात २४ तासांचे बंधन होते. तर केंद्रीय कायद्यात ४८ तासांची मुदत देण्यात आली आहे. सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांची माहिती स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करण्याची तरतूद सारखीच असल्याचे स्पष्ट होते. दंडाच्या बाबतीत महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ नुसार अपिलीय अधिकाऱ्याने माहिती न दिल्यास प्रतिदिन २५०/- रू. आणि जास्तीत जास्त २००० रूपयाच्या दंडाची तरतूद होती, तर केंद्रीय कायद्यात प्रतिदिन २५०/-रु. तर जास्तीत जास्त २५०००/-रु. रूपये दंडाची तरतूद आहे.

महाराष्ट्र माहितीच्या अधिकार कायद्यात ज्या महत्त्वाच्या तरतुदी नव्हत्या. त्या केंद्रीय कायद्यात स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

१ अर्ज करण्यामागचे प्रयोजन काय आहे ? हे न विचारणे.

२ शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींनी तोंडी केलेल्या विनंतीनुसार अधिकारी स्वत: मागणी बाबतचे तपशील नमूद करेल.

३ अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असेल तर तिला माहितीसाठी कोणतेही शुल्क लागू राहणार नाही.

४ केंद्रीय माहितीच्या अधिकार कायद्यात संसद, राज्याची विधानमंडळे आणि न्यायालये यांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

केंद्रीय माहितीच्या अधिकार कायदा २००५ बद्दल आकाशवाणी मुंबई केंद्राचे वृत्त निवेदन नरेंद्रकुमार विसपुते यांच्या मते, "केंद्र सरकारने लागू केलेल्या या कायद्यातील ७५ % तरतुदी राज्याच्या कायद्यामध्ये होत्या." तर शासकीय कर्मचारी संघटनेचे महासचिव ग.दि. कुल्थे यांच्यामते, "राज्य शासनाचा माहितीचा अधिकार कायदा गेल्या दोन वर्षापासून राज्यात लागू झालेला होता. केंद्र सरकारने देशभर लागू केलेल्या सुमारे ७५ टक्के तरतुदी राज्याच्या यापूर्वीच्या कायद्यामध्येही होत्या." या बरोबरच महाराष्ट्र राज्याचे माजी माहिती आयुक्त श्री सुरेश जोशी यांच्या मते, "महाराष्ट्र शासनाने माहितीच्या अधिकाराचा जो कायदा अत्यंत तत्परतेने मंजूर करून लागू केला होता. त्या कायद्यातील तरतुदी व केंद्रीय कायद्यातील तरतुदी जवळपास ७५ टक्के समान आहेत."

अशा पद्धतीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा २००२ या छोट्या रोपट्याचे रूपांतर केंद्राने मोठ्या वृक्षात केलेले दिसते. महाराष्ट्राच्या कायद्यातील काही बाबी वगळता महाराष्ट्राचा कायदा २००२ आणि केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ हे तुलनात्मकदृष्ट्या केलेल्या अभ्यासावरून बऱ्याच प्रमाणात सारखे आहेत असे म्हणता येईल. तसेच महाराष्ट्रातील २००२ च्या कायद्यापेक्षा केंद्राचा २००५ चा माहिती कायदा अधिक व्यापक, सुस्पष्ट, अंमलबजावणीस सुलभ आणि मोठ्या प्रमाणात सहाय्यक असल्याचे स्पष्ट होते. यामुळे पूर्वीचे इतर राज्यातील माहितीचे कायदे रद्द होऊन समस्त देशासाठी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने १२ ऑक्टोबर २००५ रोजी जनतेला हा कायदा बहाल केला.

## ३.३ (अ) अर्जदाराची पात्रता (माहिती मिळविण्याचा अर्ज किंवा प्रक्रिया) :- (Eligibility of applicants)

सर्वसाधारणपणे कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा 'माहिती' या संज्ञेचा कायदेशीर अर्थ घेतला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, परिपत्रके, प्रसिद्धिपत्रके, आदेश, दैनंदिनी, अहवाल, संविधा, कागदपत्रे, नमुने, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात जमवलेली माहिती, तसेच सार्वजनिक प्राधिकरणास प्रचलित कायद्यान्वये मागवता येणारी सर्व माहिती इत्यादींचा सामावेश होतो.

अर्थात माहिती या शब्दाच्या व्याख्येत उपलब्ध माहिती देण्याचे बंधन आहे. कुठल्याही निर्णयाची कारणे अथवा निर्णयाचे समर्थन म्हणजेच माहिती असा अर्थ घेतला जाणार नाही. तर प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत निर्णय घेण्याआधी त्या मागच्या कारणांची नोंद केली जाते. परिस्थितीनुरूप त्या निर्णयाचे समर्थनही करणे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ वीज निर्मिती

पाणी अथवा कोळसा वापरून केली जाते. नवीन तंत्रज्ञान वापरून अणुऊर्जेवर वीज निर्मितीचा निर्णय घेण्यास काही कारणे अथवा समर्थन असल्यास इत्यादी. माहिती ही माहितीच्या सदरात येणार नाही. तसेच न्यायालयात निकाल देताना कारणे देणे आवश्यक आहे. परंतु अशी कारणे माहिती या शब्दाच्या व्याख्येत बोलत नाहीत. म्हणजेच का ? केव्हा? कसे? या स्वरूपाच्या प्रश्नांना उत्तरे मागण्याचा अधिकार या कायद्याखाली नागरिकांना देण्यात आला नाही. फक्त उपलब्ध माहिती मागण्याचा केवळ अधिकार आहे.

सरकारी परिपत्रके, हुकूम हे बरोबर अथवा चूक याविषयीची मते माहिती म्हणून मागता येणार नाही. अर्जदाराने स्पष्ट शब्दात माहिती मागून माहिती कुठल्या कालावधीसाठी मागितली आहे. याचा उल्लेख देखील करणे आवश्यक आहे. मागितलेल्या माहितीचा स्पष्ट खुलासा नसल्यास सर्वसाधारण शब्दात मागितलेली माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही. अनेक माहिती अधिकारी या तरतुदीचा आधार घेऊन अर्ज नाकारताना दिसतात अथवा माहिती देण्याचे टाळतात. त्याचप्रमाणे काही अर्जदार अर्ज अत्यंत भोंगळ स्वरूपात लिहितात जेणेकरून माहिती अधिकाऱ्याने नेमकी कुठली माहिती देने अपेक्षित आहे. याचा त्यावरून बोध होत नाही. अर्थबोध न होणे म्हणजेच एकाला काय म्हणायचे आहे. ते दुसऱ्याला न समजणे होय. अशा परिस्थितीत केवळ तांत्रिक सबक सांगून अर्ज नाकारण्यापेक्षा माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराकडून जरूर तो खुलासा मागवावा व नंतर माहिती द्यावी. असे करण्याने कामाचा निपटारा लवकर होण्यास मदत होईल. तसेच अपिलांची संख्या ही मोठ्या प्रमाणात कमी होईल. कायद्याचा हेतू सफल होण्यासही हातभार लागेल. माहिती मिळवण्याच्या अधिकारात कागदपत्रांची, दप्तरांची तपासणी कागदाच्या नकला घेणे. नमुने देणे अंतर्भूत आहे.

**माहिती अधिकाराच्या महत्त्वाच्या बाबी :-**

१. शासकीय नियंत्रण व आर्थिक सहाय्य असणाऱ्या सर्व सार्वजनिक संस्थांना कायदा लागू.

२. प्रत्येक भारतीय नागरिकाला माहितीचा अधिकार.

३. सार्वजनिक प्राधिकरणांना स्वतःहून माहिती खुली करण्याचे कायदेशीर बंधन.

४. माहिती पुरविण्याची सुलभ व गतिमान व्यवस्था उभारण्याचे कायदेशीर बंधन.

५. माहिती बाबत समाधान न झाल्यास अपिलाचा अधिकार.

६. देखरेख व नियंत्रणासाठी माहिती आयोग ही स्वायत्त यंत्रणा.

७. माहिती नाकारल्यास समर्थनीय व सकारण लेखी आदेश देणे बंधनकारक.

३. माहितीचा अधिकार या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल.

**माहिती मिळविण्याची पद्धत किंवा यंत्रणा प्रक्रिया :-**

या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे कलम- ६ हे कलम म्हणजे या कायद्याचा प्राण आहे. या तरतुदींचा नागरिकांकडून जेव्हा प्रभावी वापर होईल. तेवढ्या प्रमाणात या कायद्याची उपयुक्तता सिद्ध होईल.

**कलम (६) (१) नुसार ज्या व्यक्तीस-**

या कायद्यान्वये माहिती मिळवावयाची आहे. तिने इंग्रजी हिंदी अथवा त्या राज्याच्या अधिकृत भाषेत लेखी अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासोबत जरूर ती फी देणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेखालील उत्पन्न गटात असणाऱ्या अर्जदाराला फी लागत नाही. त्यास दारिद्र्यरेषेखाली असल्याचा प्रमाणपत्र किंवा पुरावा देणे मात्र आवश्यक आहे.

माहिती अधिकाराखाली प्रमाणित केल्या पेक्षा जास्त दराने अर्जदाराकडून शुल्क मागवता येणार नाही असा महत्त्वपूर्ण निर्णय माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २४ मे २०१० रोजी दिला. काही सरकारी अधिकारी माहिती अधिकाराखाली दाखल केलेले अर्जापोटी अर्जदाराने मागितलेली माहिती गोळा करण्यासाठी झालेला खर्च अथवा टपाल खर्च इत्यादी रकमांची मागणी करीत होते परंतु कायद्यातील तरतुदी पेक्षा जास्त पैसा मागता येणार नाही असा हुकूम पंतप्रधानांनी केल्यामुळे याबाबतीत पुढचे वाद टाळण्यात यश आले आहे.

प्रकरणाच्या आवश्यकतेनुसार अर्ज केंद्रीय अथवा राज्याच्या सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याकडे द्यावा तसेच अर्जदारास पाहिजे असलेल्या माहितीचा तपशील अर्जात लिहावा. जर अर्जदाराला लेखी स्वरूपात अर्ज देणे शक्य नसल्यास अर्जदारला केंद्रीय अथवा राज्याच्या सहाय्यक सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांनी जरूर ती मदत करावी आणि अर्जदाराचा अर्ज लिहून घ्यावा. लेखी स्वरूपातही अर्ज स्वीकारला जाईल. अर्ज छापील असण्याची फारशी आवश्यकता नाही. अर्जदाराने अर्जाचे कारण देण्याची आवश्यकता नाही तसेच वैयक्तिक माहिती संपर्क साधण्यास पुरेशी असेल तेवढीच माहिती द्यावी उदाहरणार्थ पत्ता दूरध्वनी क्रमांक अथवा भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल इत्यादी संदर्भातील माहिती. अर्जदाराने सार्वजनिक कार्यालयाकडे अथवा उद्योगाकडे मागितलेली माहिती अन्य सार्वजनिक उद्योगाकडे अथवा कार्यालय कडे असेल तर संबंधित अर्ज संबंधित कार्यालयाकडे अथवा उद्योगाकडे अर्ज मिळाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवणे अनिवार्य आहे. अर्ज संबंधित उद्योगाकडे अथवा कार्यालयाकडे पाठवण्याची जबाबदारी माहिती माहिती अधिकाऱ्यावर सोपविली आहे. तसेच केलेल्या कारवाईची माहिती अर्जदाराला कळवणे हे देखील बंधनकारक आहे.

## ३.४ (ब) स्वत: बोधवाक्य प्रकटीकरण :- (सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य किंवा दायीत्व) (PIO जन माहिती अधिकाऱ्यांना पदनिर्देशन व त्यांची कर्तव्य)

**(Public authority obligations about suo motto disclosures, Appointment of PIO and their duties)**

**(१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण :-**

(क) या आधी नियमान्वये देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचीबद्ध करेल आणि त्याची निर्देश सूची तयार करेल आणि त्यांचे संगणकीकरण करणे योग्य

आहे अशा सर्व अभिलेखांचे वादवी कालावधीत आणि साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगे संगणकीकरण केले जात आहे. याची आणि असे अभिलेख पहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्क मार्फत जोडले जात आहेत याची खात्री करील.

(ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून १२० दिवसांच्या आत पुढील सर्व प्रक्रिया राबवील.

१. आपली रचना कार्य व कर्तव्ये यांचा तपशील.

२. आपले अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य.

३. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारे कार्यपद्धती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली.

४. स्वतःची कार्य पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके.

५. त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्य पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.

६. त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण.

७. आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेले कोणत्याही व्यवस्थेचा तपशील.

८. आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकाल यांचे विवरण आणि त्या मंडळांच्या, परिषदाच्या, समित्यांच्या आणि निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यव्रते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

९. आपल्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका.

१०. आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियमानमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पद्धती.

११. सर्व योजनांचा तपशील प्रास्ताविक खर्च दर्शविणारा आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल.

१२. अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील.

१३. ज्या व्यक्तींना सवलती परवाने किंवा प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील

१४. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.

१५. माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.

१६. जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील.

१७. विहित करण्यात येईल अशी इतर माहिती प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशांनी अद्यावत करील.

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील.

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकत्व निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळविल.

(२) माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा. यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह संपर्काच्या विविध साधनांद्वारे स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी पोट कलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकते नुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

(३) पोट कलम (१) च्या प्रयोजनासाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल आणि अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

(४) पुरेपूर मोबदला देणारा खर्च स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन सर्व माहिती प्रसारित करण्यात येईल. आणि यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल. इतक्या माध्यमाच्या खर्चा एवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चा एवढ्या किमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

**स्पष्टीकरण-** पोट कलम (३) आणि (४) च्या प्रयोजनाचा अर्थ प्रसारित याचा अर्थ सूचनाफलक वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारण माध्यमांकडून ध्वनीक्षेपण, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे असा आहे.

**जन माहिती अधिकाऱ्यांचे पदनिर्देशित करणे :- (PIO ची नियुक्ती आणि त्यांची कर्तव्य)**

**सहाय्यक जण (APIO) माहिती अधिकारी कोठे नेमावेत ?**

(१) एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाचा विस्तार एकाच शहरातील अनेक शाखांमध्ये असेल किंवा वेगवेगळ्या अनेक शहरांतही असेल.

(२) असे सार्वजनिक प्राधिकरण की जे त्याच्या मुख्यालयात एक जन माहिती अधिकारी नेमू शकेल. परंतु नागरिकांना माहिती मागविण्यासाठी मुख्यालयात जाण्याची गरज पडू नये, म्हणून असे सार्वजनिक प्राधिकरण शाखा पातळीवर एक अथवा अनेक सहायक जन अधिकारी नेमू शकेल.

(३) एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाची कार्यालय अथवा शाखा राज्यभर असतील व प्रत्येक ठिकाणी जन माहिती अधिकाऱ्याचे पद नियुक्त किंवा निर्देशित करणे शक्य नसेल. तर नागरिकांच्या सोयीसाठी उपविभागीय अथवा तालुका स्तरावर सहायक जनक माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे उचित ठरते.

**सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्याची (APIO) ची प्रमुख कार्य :-**

(१) अर्ज अथवातील तपासून घेणे व पोच देणे.

(२) तोंडी विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती लेखी स्वरूपात आणण्यासाठी योग्य ते सर्व सहाय्य करणे. उदा. अशिक्षित, अपंग, वृद्ध, अर्जदारास कोरा कागद नसल्यास तो उपलब्ध करून देणे.

(३) अर्जाची अथवा आपिलाची फी घेणे.

(४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र अथवा इतर पुरावा तपासून घेणे.

(५) अर्जाचे शुल्क रोख स्वरूपात भरल्यास न चुकता त्याची पावती देणे.

(६) अर्ज अथवा अपील संबंधित जन माहिती अधिकारी, अपीलिय प्राधिकारी, राज्य माहिती आयोग, यांच्याकडे पाठविणे.

(७) अर्जाची अथवा अपिलाची प्राप्त तारीख व अनुक्रमे जी माहिती जन माहिती व अपिलीयात प्राधिकारी, अधिकारी यांच्याकडे पाठविण्याची नोंद ठेवणे.

(८) हे काम बीनचूक व्हावे, यासाठी नोंदवही ठेवणे.

**जन माहिती अधिकाऱ्याची (PIO) मुख्य कार्य :-**

(१) स्वतः अर्जदाराकडून अर्ज स्वीकारणे.

(२) पोस्टाने अथवा सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यामार्फत प्राप्त अर्ज तपासून घेणे.

(३) तोंडी विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती लेखी स्वरूपात आणण्यासाठी आवश्यक ते सर्व सहाय्य करणे.


(४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असल्यास प्रमाणपत्र किंवा इतर पुरावा तपासून घेणे.

(५) अर्जदाराने अर्जाचे शुल्क रोख स्वरूपात भरल्यास त्याची पावती देणे.

(६) हे काम बीनचुक व्हावे, यासाठी अर्जाची नोंद नोंदवहीत करणे.

(७) अर्जाची प्राप्त तारीख अर्जावर नमूद करून ३० दिवसाच्या आत अर्जावर निर्णय घेण्याचे नियोजन करणे.

**माहिती प्रक्रिया**




अर्ज छापील स्वरूपातच असला पाहिजे असे बंधन नाही

### ३.(क) अर्ज सादर करणे आणि निकाली काढणे :- (Submissions and Disposal of Applications)

**(PIO) जन माहिती अधिकाऱ्याची माहिती पुरविण्याची जबाबदारी :-**

(१) माहिती पुरविण्याची जबाबदारी या कायद्यानुसार पूर्णपणे फक्त जन माहिती अधिकारी यांचीच आहे. माहिती नाकारणे, विलंबाने पुरविणे, चुकीचे, अफवा, दिशाभूल करणारी माहिती देणे, इत्यादी करणासाठी जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरले जाते.

(२) मात्र अर्ज अपील प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या पाच दिवसांच्या कालावधीत जन माहिती अधिकारी प्रथम आपिलिय प्राधिकारी यांच्याकडे पाठविण्यास सहाय्यक जन माहिती अधिकारीच जबाबदार असतात.

(३) जन माहिती अधिकारी या संज्ञेमध्ये सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचा समावेश होतो. त्यामुळे विहित कालावधीचे बंधन न पाळण्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते.

(४) जन माहिती अधिकाऱ्याने माहिती पुरविण्यासाठी अधिकृतपणे त्याच्या कार्यालयातील ज्यांचे सहकार्य मागितलेले असते. ते अधिकारी व कर्मचारी यांनाही जन माहिती अधिकारी असे मानले जाते.

(५) जन माहिती अधिकाऱ्यास आवश्यक ते सहाय्यक न पुरविल्यामुळे माहिती पुरविण्यास विलंब झाल्याचे सिद्ध झाल्यास अशा मानीव किंवा काही विशिष्ट कालावधीसाठी नियुक्त केलेल्या जन माहिती अधिकाऱ्यासही दंड केला जाऊ शकतो.

**कलम- ६ (१) अंतर्गत माहिती अर्ज तपासणीची पद्धती**

| **कलम- ६ (१) अंतर्गत आवश्यक माहिती** | **अर्ज प्राप्त झाल्यावर काय करावे ?** |
|---|---|
| १. राज्य शासनाचे कार्यालयात मराठीतून व केंद्र शासनाच्या कार्यालयात हिंदी किंवा इंग्रजीतून अर्ज करावा. | १. अर्जावर दिनांक, अर्जदाराची सही, अंगठा, पत्ता, इत्यादी नमूद आहे का ? हे तपासावे. |
| २. अर्ज साध्या कागदावर केला तरी चालतो. | २. माहितीचा तपशील वाचन्या योग्य व समजणे योग्य आहे का ?ते पाहावे. |
| ३. दारिद्र्य रेषेखालील अर्जदारास अर्ज शुल्क लागणार नाही इतर अर्जदारांना रुपये १० रु. शुल्क अर्जा सोबत घ्यावे लागते. | ३. मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे का ? ते पाहावे. |
| ४. दारिद्र्य रेषेखालील असल्याचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक असते. | ४. माहिती उपलब्ध नसल्यास पाच दिवसांच्या आत ज्यांच्याकडे ही माहिती आहे. त्यांच्याकडे अर्ज हस्तांतरित करावा. |
| ५. महाराष्ट्रामध्ये अर्ज शुल्क रोख, डिमांड ड्राफ्ट, बँकर्स चेक, कोर्ट फी स्टॅम्प, यापैकी कोणत्याही पद्धतीने भरता येईल. | ५. अर्जदारास माहिती टपालाद्वारे हवी आहे की ? स्वतः घेऊन जाणार ते पाहावे. |
| ६. केंद्र सरकारच्या कार्यालयात इंडियन पोस्टल ऑर्डर द्वारे ही भरता येईल. | ६. माहिती उपलब्ध असल्यास त्रयस्थ पक्षाची माहिती आहे का ? ते पाहावे. |
| ७. रोख भरलेल्या शुल्काची पावती देणे जन माहिती अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे. | ७. माहिती कलम 8 व 9 प्रमाणे नाकारण्यासारखे आहे का ? ते तपासावे. |
| ८. अर्जात माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे हे नमूद करण्याचे बंधन अर्जदारावर नाही. | ८. पुरविण्याजोगी माहिती उपलब्ध असल्यास किती प्रति होतात ते पाहून शुल्क परिगणना करावी व ती अर्जदारास शक्य तितक्या लवकर कळवावी. |
| ९. अर्ज नोंदणीकृत रजिस्टर टपालाने आला असल्यास टपालाच्या | ९. शुल्क भरल्याचा पुरावा पाहून माहिती शक्य तेवढ्या लवकर पुरवावी. |

| कलम- ६ (१) अंतर्गत आवश्यक माहिती | अर्ज प्राप्त झाल्यावर काय करावे ? |
|---|---|
| अकनॉलेजमेंट वर सही व तारीख आवश्यक नोंदवावी. | |
| | १०. माहिती नाकारावयाची असल्यास सकारण लेखी आदेश काढून शक्य तेवढ्या लवकर व कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसात नाकारावी. |
| अर्ज छापील स्वरूपातच असला पाहिजे असे बंधन नाही. | अर्ज छापील स्वरूपातच असला पाहिजे असे बंधन नाही. |

**विनंतीचा अर्ज निकालात काढणे :-**

१. कलम (५) पोट कलम (2) च्या अधीन राहून यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी कलम (६) अन्वये माहिती मिळविण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून ३० दिवसाच्या आत एक तर विहित करण्यात येईल. अशा फी चे प्रदान केल्यावर माहिती देईल किंवा कलम (८) व (९) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी विनंतीचा अर्ज फेटाळेल. परंतु जर मागितलेली माहिती एखाद्या व्यक्तीचे जीवित वा स्वातंत्र्य या संबंधातील असेल तर विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांच्या हाती देण्यात येईल.

२. जर केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यांनी किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकाऱ्याने पोट कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत माहिती मिळण्याच्या विनंतीवर निर्णय देण्यात कसूर केला. तर अशा केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याने किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यांनी विनंती नाकारल्याचे मानण्यात येईल.

३. माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल, त्याबाबतीत केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी विनंती करणाऱ्या व्यक्तीस पोट कलम (१) अन्वये केलेल्या फी नुसार ही जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे आकारली त्या हिशेबासह माहिती पुरविण्याचा त्यांनी निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फी चा तपशील नमूद करणारी सूचना पाठवील व त्याद्वारे तिला ती फी भरण्याची विनंती करील. आणि उक्त सूचना पाठविल्याच्या व फी प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा त्या पोट कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेले ३० दिवसाच्या कालावधीची वरीलगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल. तसेच आकारलेल्या फी ची रक्कम संबंधीच्या किंवा दिलेल्या माहितीच्या स्वरूपा संबंधीच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याच्या बाबतीतील त्याचे किंवा तिचे अधिकार तसेच अपील प्राधिकारी काल मर्यादा प्रक्रिया व इतर कोणतेही स्वरूप याचा तपशील यासंबंधीची माहिती देणारे सूचना पाठवील.

४. या अधिनियमांवर जेव्हा अभिलेखाचे किंवा त्याच्या भागाची माहिती मिळवून घ्यावयाचे असेल आणि जिला ती माहिती मिळवून घ्यावयाचे आहे. अशी व्यक्ती ज्ञानेंद्रियांच्या दृष्टीने विकलांग असेल. त्याबाबतीत यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी माहिती मिळवणे ज्यायोगे शक्य होईल, असे सहाय्य देईल, तसेच पाहणी करण्यासाठी उचित असेल असेही सहाय्य देईल.

५. मागितलेली माहिती जेव्हा छापील स्वरूपात किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात द्यावयाची असेल त्या बाबतीत पोट कलम (६) च्या तरतुदींना अधीन राहून अर्जदार विहित करण्यात येईल अशी फी प्रदान करील.

परंतु कलम (६) च्या पोट कलम (१) अन्वये आणि कलम (७) ची पोट कलमे (१) व (५) या आडवे विहित केलेली फी वाजवी असेल आणि अशी कोणतीही फी ज्या व्यक्ती दारिद्ररेषेखाली आहेत. असे शंभूचीत शासनाकडून निर्धारित करण्यात येईल. अशा व्यक्तीकडून नाकारण्यात येणार नाही.

६. पोट कलम (५) मध्ये काहीही अंतरभूत असले तरी जर सार्वजनिक प्राधिकरणाने पोट कलम (१) मध्ये मी निर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे पालन करण्यात कसूर केला असेल, तर माहिती मिळविण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती माहिती मोफत देण्यात येईल.

७. पोट कलम (१) अन्वये कोणताही निर्णय घेण्यापूर्वी यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी त्रयस्थ पक्षाने कलम (११) अन्वये केलेले निवेदन विचारात घेईल.

८. जेव्हा पोट कलम (१०) अन्वये विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल, त्याबाबतीत यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी माहिती मिळविण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तीस-

१. असा विनंतीचा अर्ज फेटळण्याची कारणे.

२. ज्या कालावधीत असा विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल. तो कालावधी.

३. आणि अपील प्राधिकरणाचा तपशील कळविल.
माहिती नाकारल्यास सुस्पष्टपणे आदेश काढण्यात येईल. त्या संदर्भातील मुद्दे पुढील प्रमाणे असतील.

स्वयं स्पष्ट विवेचन थोडक्यात वस्तुस्थिती विचारार्थ मुद्दे कारणासहित कलमे, नियम, इत्यादी माहिती उपलब्धता, ती देण्याची योग्य – अयोग्यता, न्याय व राष्ट्र कारणे, पूर्वग्रह कमी करणारे विवेचन व अभ्यासपूर्ण इत्यादी असतील.

९. सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानिकारक नसल्यास माहिती ज्या स्वरूपात मागविण्यात आली असेल. त्या स्वरूपातील माहिती सर्वसाधारणपणे पुरविण्यात येईल.

**व्यापक प्रमाणात माहिती मागितली म्हणून माहिती नाकारणे कायदेशीर नाही :-**

१. केवळ मोठ्या प्रमाणावर माहिती मागितली व ती तयार करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाची साधन सामग्री प्रमाण बाहेर वळवावी लागते. हे माहिती नाकारण्याचे कारण होऊ शकत नाही.

२. व्यापक प्रमाणावर मागितलेली माहिती काही वेळा देणे शक्य नसते. अशी माहिती नाकारण्यापेक्षा ती पाहण्याची व तपासण्याची संधी दिली. तर नागरिकाचा माहितीचा अधिकार अबाधित राहू शकतो.

३. सुज्ञ नागरिकाच्या अडचणी समजून घेतात व तपासणीनंतर आवश्यक तेवढ्याच माहितीची यादी करून मागवतात व ती देणे सहज शक्य असते.

४. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने या कायद्याअंतर्गत पूवावयाच्या माहितीसाठी व टपाल खर्चासाठी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच पुरेशी आर्थिक तरतूद केली पाहिजे.

**माहिती प्रकटीकरणा बाबत महत्वपूर्ण तरतुदी :-**

या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही.

१. जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्ध तंत्र विषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना परकीय राज्याबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाची छावणी मिळेल अशी माहिती.

२. कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायधीकरणाने जी माहिती प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे. किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती.

३. जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधीमंडळाच्या विशेष अधिकाराचा भंग होईल. अशी माहिती.

४. वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्ह, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल. त्या माहिती व्यतिरिक्त जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल अशी माहिती.

५. जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल. त्या माहिती व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाच्या संबंधांमुळे तिला उपलब्ध असणारी माहिती.

६. विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली राज्नायीकदृष्ट्या महत्वपूर्ण स्वरुपाची माहिती.

७. जी प्रकट केलेली कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल. अथवा कायदेशीर अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा

प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीच्या स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती.

८. मंत्रिमंडळाची कागदपत्रे तसेच मंत्री परिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचार विमर्शाचे अभिलेख परंतु मंत्री परिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावरती निर्णय घेण्यात आले होते. ती सामग्री ही निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करण्यात येईल. परंतु आणखी असे की, या कलमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपवादांतर्गत असणाऱ्या बाबी प्रकट करण्यात येणार नाहीत.

९. जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. अशी यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची व राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल. ती खेरीज करून जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबतीत अंगतूक हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशीला संबंधातील माहिती. परंतु जी माहिती संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही. ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.

१०. शासकीय गोपनीयतेचे अधिनियम १९२३ चा १९ किंवा पोट कलम (१) अनुस्वार अनुदेय असले, कोणतेही अपवाद यामध्ये काही अंतर्भूत असले तरी माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानी पेक्षा अधिक असेल, तर सार्वजनिक प्राधिकरण ती माहिती पाहण्यास परवानगी देऊ शकेल.

११. पोट कलम (१) चा खंड (क) (ग) आणि (झ) च्या तरतुदींना अधीन राहून कलम (६) अन्वये ज्या दिनांकास विनंती केली असेल. त्या दिनांका पासून २० वर्षांपूर्वी झाली असेल, उद्भवली असेल किंवा घडली असेल, अशी कोणतीही घटना, प्रसंग किंवा बाब या संबंधातील कोणतीही माहिती ही कोणत्याही व्यक्ती त्या कलमान्वये विनंती करण्यात आल्यावर पुरविण्यात येईल.

**लोकहिताची माहिती**



**विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे :-**

एखादी माहिती पुरविण्याच्या विनंती मुळे जर राज्या व्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल. तर कलम (८) च्या तरतुदींना बाधा न येऊ देता, यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास अशी माहिती पुरविण्याची विनंती नाकारता येईल.

**सारांश:-**

सदरील प्रकरणामध्ये अर्जदाराने करावयाच्या अर्जाची पद्धत व माहिती देण्याची किंवा प्रकटीकरण प्रक्रिया या संदर्भात APIO सहाय्यक जन माहिती अधिकारी आणि PIO जन माहिती अधिकारी यांचे नामनिर्देशन किंवा नियुक्ती तसेच आवश्यकते नुसार नामनिर्देशित केलेल्या प्रधीकार्र्याची जबाबदारी, त्यांची प्रमुख कार्य किंवा त्यांना पर्पदावयाचे महत्वपूर्ण दायित्व या बाबी संबंधी माहितीचा उहापोह करण्यात आला आहे. याशिवाय देशाच्या हितासंदार्भातील माहिती देण्यापासून किंवा उघड करण्यापासून सवलत देण्यात आली आहे.

**आपली प्रगती तपासा (सरावासाठी महत्वपूर्ण प्रश्न) :-**

(१) अर्जदाराची पात्रता व माहिती मिळविण्याची पद्धत सांगा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(२) स्वतः बोधवाक्य प्रकटीकरण कसे करावे ते विशद करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(३) जन माहिती अधिकाऱ्याचची (PIO) नियुक्तीची प्रक्रिया सांगून त्यांची कर्तव्य स्पष्ट करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

(४) अर्ज सादर करणे आणि निकाली काढणे यांची प्रक्रिया स्पष्ट करा?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-** .


१. Right to Information Act, 2005: A Primer, Tata McGraw-Hill Publishing Company Linited, New Delhi, 2006

२. जाधव डॉ. एस.एस., (२००८) माहितीचा अधिकार, राजश्री प्रकाशन, पटेल नगर, धर्माबाद

३. राज्य माहिती आयोग अहवाल,(२००७) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, दुसरा वार्षिक अहवाल ०१ जानेवारी २००७ ते ३१ डिसेंबर २००७ ,१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई. देशपांडे अशोक, (२००६) माहितीचा अधिकार अधिनियम २००५, राजहंस प्रकाशन, पुणे.

४. फडके य.दि., (२००२) माहितीचा अधिकार, अक्षर प्रकाशन, मुंबई.

५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,(२००६) माहितीचा अधिकार कायदा

६. माहिती अधिकार केंद्र यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कारमीक जन तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, भारत सरकार नवी दिल्ली.

७. ॲड. वि. पु. शिंत्रे, (मार्च-२०१६) माहिती अधिकार कायदा, राजहंस प्रकाशन प्रा. लि. पुणे. प्रथम आवृत्ती.


❄❄❄❄❄❄❄

# ४

# मुक्त माहिती आणि भविष्यातील मार्ग

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ माहिती देण्यापासून सूट किंवा सवलत, मोठ्या सार्वाजनिक हित संबंधाची माहिती, कॉपीराईट्सची माहिती,

४.४ पृथक्करणीयता किंवा माहितीचे विभाजन, त्रयस्थ किंवा तृतीय पक्षाची माहिती

४.५ व्हिसलब्लोअर कायदा, सुनावणीचा कायदा, तक्रार निवारण कायदा/विधेयक, सार्वजनिक अधिकार सेवांचा कायदा.

## ४.१ उद्दिष्टे

४.१.१ माहिती देण्यापासून सूट किंवा सवलत, मोठ्या सार्वाजनिक हित संबंधाची माहिती, कॉपीराईट्सची माहिती, इत्यादी महत्वपूर्ण घटकांची माहिती प्राप्त होईल.

४.१.२ पृथक्करणीयता किंवा माहितीचे विभाजन, त्रयस्थ किंवा तृतीय पक्षाची माहिती या संबंधीची माहिती मिळेल.

४.१.३ व्हिसलब्लोअर कायदा, सुनावणीचा कायदा, तक्रार निवारण कायदा/विधेयक, सार्वजनिक अधिकार सेवांचा कायदा या सर्व महत्वपूर्ण कायद्यांबद्दल माहिती मिळेल.

## ४.२ प्रास्ताविक :-

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रशासनामध्ये चांगल्या प्रकारचे बदल होणे अपेक्षित होते. पण गुप्ततेचा सुरूंग लागलेल्या राज्यकर्त्यांनी इंग्रजांची देणगी स्वातंत्र्योत्तर काळात सुरू ठेवली. याशिवाय गुप्ततेच्या कायद्यामधील काही तरतुदी सौम्य करण्याचा प्रयत्न खूप वेळेस करण्यात आला. परंतु हितसंबंधी लोकांनी तसे होवू दिले नाही. लोकशाहीप्रधान भारतात व्यक्ती स्वातंत्र्याला दगा देऊन राज्यकारभारात येणारी गोपनीयता आणि प्रजेचे होणारे शोषण हे येथील नागरिकांना झालेली खंतच होय. म्हणूनच या कल्याणकारी लोकतांत्रिक राज्यात गुप्ततेचा कायदा लवकरात लवकर नाहीसा होणे, आणि त्याच्या विरूध्द टोकाची भूमिका घेणारा माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात येणे अनिवार्यच होते.

परंतु जर भारताचे सार्वभौमत्व, राष्ट्रीय एकात्मता, सुरक्षाविषयक महत्त्वपूर्ण धोरण, करार, वैज्ञानिक किंवा आर्थिक व्यवहार आणि परराष्ट्र संबंध किंवा धोरण यासंदर्भातील माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे. सदरील प्रकारात मोडणारी माहिती देशाच्या हिताला बाधा निर्माण करणारी असल्यास ती उघड केली जाणार नाही. अर्थात देशाचे हित लक्षात घेता नागरिकांना तशा स्वरुपाची माहिती दिली जाणार नाही

म्हणजेच ती उघड केली जाणार नाही. तसेच कलम (८) व (९) या कलमान्वये काही महत्त्वपूर्ण घटकांना माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे. या माहिती कायद्यापूर्वी ब्रिटीश कालीन १९२३ साली अस्तित्वात आलेला ऑफिशियल गुप्ततेचा अॅक्ट, यानुसार जी माहिती सूट देण्यात आली आहे. जर या तरतुदीच्या अंतर्गत येणाऱ्या सार्वजनिक हितसंबंधाचे नुकसान झालेले नसल्यास किंवा देशाच्या सार्वभौमत्वाचे हनन होत नसल्यास अपवादात्मक ती माहिती उघड करता येईल. अन्यथा ती करता येणार नाही.

## ४.३ (अ) माहिती देण्यापासून सूट किंवा सवलती बाबत :- (Exemption for Information)

**मोठे सार्वजनिक हित :- (Larger public interest)**

देशाच्या संरक्षणाच्या व सार्वभौमत्वाच्या दृष्टीकोनातून, सार्वजनिक हित लक्षात घेऊन काही प्रसंगी माहिती उघड करता येणे शक्य नसते. त्यामुळे अशा प्रकारची माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आलेली असते. त्या महत्वपूर्ण बाबीचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

१. या कलम (८ व ९) कलमान्वये पुढील प्रमाणे माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे. तसेच या संबंधी वीस वर्षे उलटल्यानंतरही कोणत्याही नागरिकाला माहिती देणे बंधनकारक राहणार नाही.

२. देशाच्या हिताच्या दृष्टिकोनातून अनेकवेळा देशांतर्गत महत्वपूर्ण निर्णय-निर्धारण करण्याचे कार्य भारताच्या संसदेला आणि राज्य विधानसभेला करावे लागते. त्यामुळे संसद किंवा राज्य विधानसभेसंबंधीची माहिती जी मंत्रिमंडळातील महत्त्वपूर्ण निर्णयाशी व दस्तऐवजांशी संबंधित असेल, अशी माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे.

३. कलम (८) नुसार माहिती उघड करण्यापासून पुढील प्रमाणे सूट किंवा सवलत आहे. खालील प्रकारची माहिती देशातील नागरिकांना देणे बंधनकारक नाही. कारण देशाच्या हितसंबंधाशी ती निगडीत असेल तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन ती उघड केली जाणार नाही.

**महत्वपूर्ण तरतुदी :-**

(१) न्यायप्रविष्ठ खटले किंवा सर्वोच्च व उच्च न्यायालयाने बंदी घातलेली सार्वजनिक हिताची माहिती उघड केली जाणार नाही.

(२) देशाच्या व राज्याच्या कायदेमंडळाच्या विशेष अधिकाराचा भंग होईल, अशी कोणतीही माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे.

(३) बौद्धिक संपदा, पेटंट्स, व्यावसायिक गुप्तता किंवा त्रयस्थ गटाला हानी किंवा बाधा पोहोचेल अशी माहिती उघड करण्यापासून सूट, सवलत आहे. जर अपवादात्मक अशा प्रकारची माहिती ही सार्वजनिक हितसंबंध जोपासणारी असेल तर ही माहिती उघड केली जाऊ शकते.

(४) एखाद्या महत्वाच्या व्यक्तीच्या विश्वासू नातेसंबंधा विषयीची माहिती किंवा गंभीर गुन्हेगाराच्या संदर्भातील माहिती, अशा प्रकारची कोणतीही माहिती ची आवश्यकता लक्षात घेऊन त्यामध्ये सवलत दिली जाईल. किंवा वेळप्रसंगी सार्वजनिक हित लक्षात घेऊन अशा प्रकारची माहिती उघड देखील केली जाऊ शकते.

(५) इतर राष्ट्रांकडून प्राप्त झालेली महत्त्वपूर्ण स्वरूपाची गुप्त माहिती किंवा दस्तएवज उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे. उदा. राजनयज्ञा कडून प्राप्त झालेली गुप्त माहिती उघड केली जाणार नाही.

(६) एखाद्या व्यक्तीच्या जीविताला हानी पोहोचेल अशी माहिती किंवा माहितीचा स्त्रोत याविषयीची माहिती उघड करण्यापासून सूट, सवलत आहे. अशी माहिती उघड करता येणार नाही.

(७) एखाद्या गंभीर स्वरूपाच्या चौकशी करिता अडथळा निर्माण करणारी माहिती उघड करण्यापासून सूट किंवा सवलत देण्यात आली आहे.

(८) सार्वजनिक हिताची नसलेली किंवा एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक स्वरूपाची, संबंधित माहितीची आवश्यकता लक्षात घेऊन ती उघड करण्यापासून सूट, सवलत आहे.

**काही महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये प्रवेश नाकारण्याचे कारण–**

कलम (८) मधील तरतुदीनुसार कोणताही पूर्वग्रह न ठेवता केंद्रीय किंवा राज्य जन माहिती अधिकारी किंवा सक्षम अधिकारी कोणत्याही प्रकरणाविषयी माहिती देण्याचे नाकारू शकतो.

कलम (२४) मधील विवक्षित संघटनांना हा अधिनियम लागू नाही. या तरतुदी नुसार काही महात्वाच्या संघटनांना हा माहिती कायदा लागू होत नाही. उदाहरणार्थ केंद्र शासनाने स्थापन केलेल्या बौद्धिक आणि सुरक्षा विषयक संस्था किंवा संशोधन केंद्र, औद्योगिक केंद्र, इत्यादींना या कायद्याच्या कोणत्याही तरतुदी लागू होत नाहीत. या अंतर्गत या संघटनांतील किंवा संस्थांतील भ्रष्टाचार आणि मानवी हक्क कायद्याच्या उल्लंघना संबंधीत माहिती देणे सुद्धा बंधनकारक नाही. जर अपवादात्मक कोणी माहितीची मागणी केली असेल आणि ती देणे आवश्यक असेल, तर अशावेळी ती माहिती ४५ दिवसाच्या आत द्यावी लागते.

अशा पद्धतीने वरील प्रमाणे देशाचे सार्वजनिक हित आणि आवश्यकता लक्षात घेऊन माहिती देणे किंवा न देण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय घेतला जातो.

**कॉपीराईट्स संबंधीची माहिती (कलम – ९) :- (Copyrights)**

सार्वजनिक पातळीवर एखाद्या व्यक्तीकडे असलेल्या कॉपीराईटचा भंग होत असल्यास, माहिती नाकारता येते. परंतु राज्य अथवा केंद्र सरकारकडे कॉपीराइट्स असल्यास त्याविषयी माहिती नाकारता येणार नाही. कॉपीराइट्स एखाद्या व्यक्तीकडे असल्यास त्याची माहिती देण्यापासून त्या व्यक्तीच्या खाजगी जीवनाच्या हक्कास बाधा येऊ शकते. त्यामुळे त्यांची सरकारकडे कॉपीराईटस असल्यास त्याची माहिती सर्व जनतेला खुली असणे आवश्यक आहे. कॉपीराईटच्या संदर्भातील काही नियमावली किंवा काही हक्क संबंधित पेटंट्स असलेल्या व्यक्तीने राखून ठेवण्याचा अधिकार त्याला प्राप्त झाला आहे. किंवा त्या संदर्भातील

वाद विवाद उद्भवल्यास संबंधित व्यक्तीने आशा खटल्या संदर्भात ज्या न्यायालयाची नोंद किंवा मागणी केली असेल तेथेच संबंधित स्वरूपाचा खटल्याबाबत सुनावणी केली जाईल.

## ४.४ (ब) पृथक्करणीयता किंवा माहितीचे विभाजन (कलम- १०) (Severance of Information)

नागरिकाने अर्जामध्ये मागितलेली माहिती दोन प्रकारची असल्यास म्हणजेच, जी माहिती न देण्याचे बंधन आहे, आणि जी माहिती देण्यासाठी कुठलेही बंधन नाही, अशा मागितलेल्या माहितीचे विभाजन करावे व जी माहिती देण्यासाठी कुठलेही बंधन नाही, किंवा ती सार्वजनिक हिताला बाधा निर्माण करणारी नाही, अशा सरुपाची माहिती अर्जदाराला केंद्रीय अथवा राज्य माहिती अधिकाऱ्याने लेखी जाणीव करून देऊन खालील गोष्टी कळविणे आवश्यक आहे.

१. जी माहिती देण्यास कुठलेही बंधन किंवा सूट नाही, अशी माहिती देण्यात येईल असे कळवावे.

२. निर्णयाची कारणे, निष्कर्ष आणि ज्या सामग्रीवर निर्णय आधारित असेल, त्यांचे संदर्भ देण्यात यावेत.

३. निर्णय देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा पत्रात लिहिण्यात यावा.

४. अर्जदाराने फी म्हणून भरावयाची रक्कम कळवण्यात येऊन किती मुदतीत फी भरणे आवश्यक आहे ते कळवावे.

५. निर्णयाविरुद्ध अर्जदारास उपलब्ध असलेला दाद मागण्याच्या हक्काचा स्पष्टपणे उल्लेख करून दाद कोणाकडे मागावयाची आहे. त्या अधिकाऱ्याचे नाव व पत्ता कळवण्यात यावा. तसेच दाद मागण्यास किती बोधक उपलब्ध आहे ते कळवावे.

६. जी माहिती मिळविण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. ती माहिती जी प्रकट करण्याबाबत आपवाद केला होता. अशा माहितीशी संबंधित असल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आली असेल. तेव्हा या अधिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले, तरी या अधिनियमांवर प्रकट करण्याबाबत अपवाद केलेल्या कोणत्याही माहितीचा ज्यात अंतर्भाव नसेल, आणि अपवाद केलेल्या माहितीचा समावेश असलेल्या कोणत्याही भागापासून तो व्यवस्थितपणे पृथक किंवा वेगळा करता येत असेल, असा अभिलेखाचा भाग पुरवण्यात येईल.

७. पोट कलम (१) अन्वये अभिलेखाच्या एखाद्या भागातील माहिती देण्यात आली असेल. अशा प्रकरणात केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकारी अर्जदारास मागणी करण्यात आलेल्या अभिलेखांपैकी जी प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे. अशी माहिती अंतर्भूत असणारा अभिलेख पृथक किंवा वेगळा केल्यानंतरचा उर्वरित भाग पुरविण्यात येत असल्याची माहिती देईल.


८. वस्तुस्थिती संबंधातील कोणत्याही महत्त्वपूर्ण प्रश्नावरील कोणत्याही निष्कर्षासह ते निष्कर्ष ज्या सामग्रीवर आधारले होते. त्या सामग्रीचा निर्देश करून निर्णयाच्या कारणांची माहिती देईल.

९. निर्णय देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पदनाम यांची माहिती देईल.

१०. माहितीचा भाग प्रकट न करण्यासंबंधातील निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याच्या बाबतीतील त्याचे किंवा तिचे हक्क कलम (१९) च्या पोट कलम (१) अन्वये किंवा केंद्रीय माहिती आयोगाकडून किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा तपशील, काल मर्यादा, अपील प्रक्रिया आणि माहिती पुरविण्याचा इतर कोणताही प्रकार या आकारलेल्या फी ची रक्कम किंवा माहिती पुरविण्याचा प्रकार यांची माहिती देणारे नोटीस देईल.

## पृथक्करनियता

**(Severability) कलम -१०**




## त्रयस्थ किंवा तृतीय पक्षाची माहिती (कलम - ११) :- (Third Party Information)

अर्जदाराने एखाद्या व्यक्तीविषयी माहिती मागितल्यास, अशी माहिती देण्यासंबंधात निर्णय घेण्याआधी अर्ज दाखल झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधित त्रयस्थ, तृतीयपक्ष किंवा तिर्हाईत व्यक्तीला तिचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येते. संबंधित त्रयस्थ व्यक्तीने हरकत घेतल्यास त्याचा विचार करून माहिती अधिकारी योग्य तो निर्णय घेऊ शकतात. नोटीस मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत संबंधित त्रयस्थ व्यक्तींना नोटीसचे उत्तर देणे बंधनकारक आहे. अर्ज दाखल झाल्यापासून ४० दिवसाच्या आत माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे. याबाबत दिलेल्या निर्णयावर अर्जदार अथवा संबंधित तिर्हाईत व्यक्ती अपील दाखल करू शकते. व्यापारी अथवा व्यावसायिक माहितीला गोपनीय म्हणून संरक्षण दिले असल्यास संबंधित माहिती जाहीर करण्यात, गोपनीयतेपेक्षा जनहित अधिक महत्त्वाचे वाटत असल्यास संबंधित अधिकारी माहिती जाहीर करू शकतात.

या अधिनियमान्वये केलेल्या विनंतीवरून जेव्हा यथास्थिती एखाद्या केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पूरवावयाचा असेल, तेव्हा यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी अशी विनंती करण्यात आल्यापासून ५ दिवसांच्या आत त्या विनंती बाबत आणि यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ पक्षास देईल. आणि त्रयस्थ पक्षाला अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे या संबंधात लेखी किंवा मौखिक निवेदन सादर करण्यासाठी आमंत्रित करील. आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल. परंतु कायद्याचे संरक्षण दिलेले व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत माहिती असेल, तर त्या शिवाय किंवा खेरीज करून जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्त्वाचे असेल तर ती माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल.

**महत्वपूर्ण तरतुदी :-**

(१) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडून किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात पोट कलम (१) अन्वये त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल. अशा बाबतीत अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासून १० दिवसाच्या आत प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात येईल.

(२) कलम सात मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी कलम (६) अन्वये केलेला विनंतीचा अर्ज मिळाल्यानंतर ४० दिवसाच्या आत पोट कलम (२) अन्वये निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात आलेली असल्यास ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करावा किंवा करू नये, याबाबत निर्णय घेईल. आणि त्याच्या निर्णयाची लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास देईल.

(३) पोट कलम (३) अन्वये दिलेल्या नोटिशीत ज्याला नोटीस देण्यात आली असेल. असा त्रयस्थ पक्ष त्या निर्णयाविरुद्ध कलम (१९) अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार असेल या विधानाचा समावेश असेल.

**पत्रव्यवहार करताना घ्यावयाची दक्षता :-**

(१) पत्र व्यवहारातील भाषा सौजन्यपूर्ण तसेच अर्जदारांना मार्गदर्शक ठरेल अशीच असावी.


(२) मौखिक विनंती करणाऱ्या व्यक्तीस ती लेखी स्वरूपात आणण्यासाठी आवश्यक ते सर्व सहाय्य करणे कलम (६) (१) चे परंतुक व कलम (७) (४) नुसार.

(३) माहिती अधिकारासंदर्भात अर्जदारांशी केल्या जाणाऱ्या पत्र व्यवहारात कार्यालयाचा पूर्ण पत्ता, जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी, दूरध्वनी क्रमांक, उपलब्ध असल्यास फॅक्स क्रमांक, ई-मेल आयडी, इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याने अर्जदारांना अनेक अडचणी उद्भवतात.

(४) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी व विशेषतः जन माहिती अधिकारी अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार व इतरही सर्वसाधारण बाबी संदर्भात केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहारावर संबंधित कार्यालयाचा पूर्ण पत्ता, जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी, दूरध्वनी क्रमांक, उपलब्ध असल्यास ई-मेल आयडी, इत्यादी बाबी नमूद करण्याची दक्षता घ्यावी.

(५) असे केल्यास अर्जदारांना संबंधितांशी योग्य व जलद पद्धतीने संपर्क साधणे शक्य होईल. तसेच अनावश्यक पत्र व्यवहार व उपलब्ध मर्यादित संसाधनावर पडणारा ताण टाळणे ही सार्वजनिक प्राधिकरणांना शक्य होईल.

**त्रयस्थ पक्षाची माहिती**




| |
|---|
| **कलम २ (ढ) कलम ७ (७) कलम ८ (ड) कलम ८ (छ) कलम ११ व १९ एकत्रित वाचावेत.** |

## ४.५ (क) व्हिसलब्लोअर कायदा (२०१४) :- (Whistleblower Act)

माहिती अधिकाराच्या संदर्भातील हा एक महत्त्वाचा कायदा मानला जातो. व्हिसलब्लोअर म्हणजे असा व्यक्ती की, जो एखाद्या व्यक्तीच्या किंवा संघटनेतील भ्रष्टाचाराविषयी माहिती पुरवितो. या कायद्यासंदर्भात २००१ मध्ये भारतीय कायदा आयोगाने अशी शिफारस केली होती. की, भ्रष्टाचाराच्या समूळ उच्चाटनासाठी व्हीसलब्लोअरला सुरक्षित ठेवण्याचा कायदा करण्यात यावा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार २००४ साली एक ठराव पारित केला

गेला. की "पब्लिक इंटरेस्ट डिस्क्लोजर अँड प्रोटेक्शन ऑफ इन्फॉर्मर्स रिसोल्युशन" या ठरावानुसार केंद्रीय दक्षता आयोगाला व्हिसलब्लोअरच्या तक्रारीवरून कार्यवाही करता येते.

**दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग :-**

२००७ मध्ये या आयोगाने सुद्धा व्हिसलब्लोअरच्या सुरक्षेसाठी कायद्याची आवश्यकता आहे. अशी शिफारस केली होती. संयुक्त राष्ट्र संघाच्या भ्रष्टाचार विरोधी अधिवेशनामध्ये झालेल्या करारावर भारताने २००५ मध्ये स्वाक्षरी केली होती. त्यामध्ये घटक राज्यांना प्रशासकीय भ्रष्टाचार उघड करणाऱ्या सुरक्षा पुरविण्याचे आदेश दिले होते. या सर्व घडामोडीतून शेवटी २०१४ मध्ये व्हिसलब्लोअरचा सुरक्षा कायदा अस्तित्वात आला.

**या कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतुदी :-**

(१) या कायद्यान्वये भ्रष्टाचाराचे प्रकरण, सत्तेचा गैरवापर व इतर स्वरूपाची चौकशी हे उघड करणाऱ्या व्यक्तीला सुरक्षा पुरविण्याच्या उद्देशानेच या कायद्याची निर्मिती करण्यात आली. या कायद्याच्या अंतर्गत कोणताही व्यक्ती तसेच प्रशासकीय व्यक्ती, सक्षम अधिकाऱ्यांच्या समोर तक्रार करू शकतो.

(२) या कायद्याच्या अंतर्गत तक्रार दात्याला आपली ओळख सांगावीच लागते. ही तक्रार जास्तीत जास्त सात वर्षापर्यंत करता येऊ शकते. या कायद्याच्या अंतर्गत नि नावी तक्रार दाखल करता येत नाही.

(३) सुरक्षा दलांना हा कायदा लागू होत नाही. तसेच सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या विरोधात पीडित व्यक्ती ६० दिवसापर्यंत दावा दाखल करू शकते.

(४) एखाद्या व्यक्तीने नकळतपणे किंवा जाणीवपूर्वक तक्रारदात्याची माहिती उघड केली असेल. तर त्या व्यक्तीला तीन वर्षापर्यंत करावास आणि ५००००/- रुपये एवढा दंड लागू शकतो.

(५) सक्षम अधिकारी वर्षभरात केलेल्या सर्व कार्याच्या माहितीवर अहवाल तयार करून तो केंद्र किंवा राज्य शासनास सादर करतो. हा अहवाल पुढे संसदेत किंवा विधानसभेत सादर केला जातो.

(६) व्हिसलब्लोअर कायदा हा या पूर्वी आधी लिखित १९२३ चा अधिकृत गुप्त कायदा आहे. याद्वारे तक्रार करता हा सक्षम अधिकाऱ्यांसमोर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तक्रार दाखल करू शकतो. परंतु ती तक्रार भारताच्या सार्वभौमत्वास व राष्ट्रीय एकात्मतेस बाधित करणारी नसावी.

(७) २०१५ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. तसेच १९२३ च्या प्रशासकीय गुप्ततेच्या कायद्यांतर्गत येणाऱ्या तरतुदीनुसार तक्रार कर्त्याला भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर किंवा गुन्हेगारी कृत्य, याविषयी कोणतेही कागदपत्रे उघड करता येत नाहीत. यामुळे २०१४ च्या कायद्याचे महत्त्व कमी झाले आहे.

**सुनावणीचा अधिकार :- (Right to Hearing Act, 2012)**

नागरी अधिकाराच्या संदर्भातील हा एक महत्वपूर्ण कायदा मानला जातो. सुनावणीचा अधिकार कायदा २०१२ या कायद्यान्वये एखाद्या व्यक्तीला विशिष्ट कालमर्यादेमध्ये लोकांना सुनावणीचा अधिकार मिळणे. तसेच त्यासंबंधीचे कागदपत्रे किंवा दस्तऐवज पुरविणे. हा महत्त्वपूर्ण उद्देश या कायद्याचा आहे.

सर्वप्रथम राजस्थान या राज्याने २१ मे २०१२ रोजी हा कायदा लागू केला. त्यामुळे हा कायदा राजस्थान सुनावणीचा अधिकार कायदा या नावाने देखील ओळखला जातो. हा कायदा संपूर्ण राजस्थान या राज्यासाठी लागू होतो.

या कायद्याचा अर्थ व व्याख्या सांगत असताना "तक्रार म्हणजे एखाद्या नागरिकांना किंवा नागरिकांच्या गटाने एखाद्या धोरणाविषयी फायदा किंवा सवलत मिळावी म्हणून सुनावणी

अधिकाऱ्याकडे केलेला अर्ज होय."

तसेच "सुनावणीचा अधिकार म्हणजे नागरिकांनी केलेल्या तक्रारींच्या संदर्भात विशिष्ट कालमर्यादेपर्यंत सुनावणीस उपस्थित राहण्याचा अधिकार तसेच त्या सुनावणीत घेतलेल्या निर्णयाची माहिती मिळवण्याचा अधिकार होय."

**महत्वपूर्ण तरतुदी :-**

(१) विशिष्ट काल मर्यादेच्या अंतर्गत राहुन तक्रार केलेल्या विषयाच्या अनुषंगाने सुनावणीस उपस्थित राहण्याचा अधिकार होय.

(२) सार्वजनिक सुनावणी अधिकारी हा विशिष्ट कालमर्यादेच्या अंतर्गत सुनावणीस उपस्थित राहण्याची परवानगी देतो.

(३) या कायद्याला कालमर्यादेची मर्यादा किंवा बंधन आहे. अशा रीतीने सुनावणी अधिकार कायद्या अंतर्गत माहिती प्रदान केली जाते.

**तक्रार निवारण विधेयक (कायदा - २०११) :- (Grievance Redressal Bill)**

विशिष्ट काल मर्यादेत नागरिकांना वस्तू व सेवांचा पुरवठा प्राप्त करण्याचा अधिकार आणि तक्रार निवारण विधेयक - २०११ असे या कायद्याला पूर्ण नावाने ओळखले जाते. या तक्रार निवारण विधेयकातील

**महत्त्वपूर्ण तरतुदी :-**

(१) विशिष्ट काल मर्यादेच्या अंतर्गत राहून नागरिकांना आवश्यकतेप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करणे तसेच सेवा पुरविणे आणि त्या संबंधातील निर्माण झालेल्या तक्रारींचे निवारण करणे यासंदर्भातील नागरिकांचे अधिकार ओळखणे.

(२) नागरिकांच्या अधिकारांना घटनात्मक किंवा कायदेशीर दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ६ महिन्याच्या आत नागरिकांच्या अधिकारांची सनद प्रकाशित करणे बंधनकारक आहे.

(३) त्वरित व गुणात्मक दृष्ट्या परिणामकारक सेवा पुरविण्यासाठी माहिती आणि सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी सार्वजनिक अधिकाऱ्यांची आवश्यकता असते.

(४) तक्रार निवारण अधिकारी (GRO) ची नियुक्ती केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हा व तालुका स्तरावर करावी. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरूनही अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. तक्रार निवारण अधिकारी जीआरओ दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नागरिक ३० दिवसांच्या आत वरिष्ठ पातळीवरच्या नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडे दावे करू शकतात.

(५) सदरील अधिकाऱ्याने वस्तू व सेवांबद्दलच्या तक्रारी बद्दल वेळीच माहिती किंवा निवारण न केल्यास त्या अधिकाऱ्यास ५००००/- एवढा दंड होऊ शकतो.

(६) या कायद्याचे कार्यक्षेत्र - सार्वजनिक प्राधिकरणावर वेळेच्या आत वस्तूंचा पुरवठा आणि सेवा देण्याचे या कायद्यान्वये बंधनकारक केले आहे. राज्यघटनेनुसार निर्माण झालेले तसेच संसदेने पारित केलेल्या किंवा महत्त्वपूर्ण प्रमुख संस्था किंवा राज्य विधानसभेने पारित केलेल्या कायद्याद्वारे निर्माण झालेल्या संस्था या कायद्याअंतर्गत येतात.

उदाहरणार्थ स्वयंनिर्मित संस्था, शासकीय अनुदान पात्र अशासकीय संस्था, संघटना किंवा खाजगी व्यावसायिक संघटना, संस्था किंवा कंपन्या इत्यादी या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येतात.

(६) सार्वजनिक प्राधिकरण अधिकारी आणि विभागप्रमुखांचे दायित्व या घटकांतर्गत नागरिकांच्या अधिकार प्रकाशित करणे, माहिती व सेवा केंद्राची स्थापना करणे, तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्ती करणे, तक्रार निवारण अधिकारी या विषयी सगळीकडे माहिती पुरविणे, तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी सर्व माहिती संग्रहित करून ठेवावी. तसेच नागरिकांच्या अधिकारांसंबंधीची माहिती प्रतिवर्षी अद्यावत करावी. तसेच नागरिकांचे सर्व अधिकार सर्वच सार्वजनिक ठिकाणी मोफत प्रसारित करावी. या पद्धतीने सर्वसामान्य नागरिकास वस्तू व सेवांच्या संदर्भात निर्माण झालेल्या तक्रारी संबंधित या तक्रार निवारण कायद्याअंतर्गत माहिती प्राप्त करून दिली जाते.

**सार्वजनिक सेवांचा अधिकार कायदा - २०१५ :- (Right To Public Services)**

महाराष्ट्र राज्यापुरता मर्यादित असलेला हा एक महत्त्वपूर्ण कायदा आहे. हा कायदा महाराष्ट्र सार्वजनिक सेवांचा अधिकार म्हणून ओळखला जातो. आणि २८ एप्रिल २०१५ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये हा कायदा लागू करण्यात आला आहे. तसेच हा कायदा सर्वच सार्वजनिक प्राधिकरणांना लागू होतो.

**महत्वपूर्ण तरतुदी :-**

(१) ज्याद्वारे महाराष्ट्र राज्यातील एखाद्या नागरिकास पारदर्शक, तात्काळ आणि वेळेत माहिती प्राप्त व्हावी. या उद्देशाने निर्माण करण्यात आला आहे. या कायद्याद्वारे एखाद्या

पात्र व्यक्तीला कायदा, नियम, आदेश, शासकीय अध्यादेश, इत्यादींची माहिती हवी असेल, तर ती त्वरित पुरविली जाते.

(२) सार्वजनिक सेवा अधिकाऱ्यामार्फत या कायद्याची अंमलबजावणी करताना विशिष्ट काल मर्यादेचे पालन त्याला करावे लागते. तसेच याविषयीची कार्यवाही करण्यासाठी नियुक्त अधिकारी तसेच प्रथम व दुय्यम अपिलीय अधिकारी त्यांची काल मर्यादा स्वरूप आणि फी या विषयीची माहिती द्यावी लागते.

(३) विशिष्ट काल मर्यादेच्या आत सार्वजनिक सेवांचा अधिकार मिळावा. या उद्देशाने कायदेशीर, तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता यानुसार प्रत्येक पात्र नागरिकाला विशिष्ट कालमर्यादेतच सार्वजनिक सेवांचा लाभ मिळण्याचा अधिकार प्राप्त व्हावा. यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे.

(४) या कायद्यांतर्गत माहिती प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र असलेल्या नागरिकास नियुक्त अधिकाऱ्याने सार्वजनिक सेवांचा लाभ मिळवून देणे बंधनकारक आहे. त्यासंबंधीची माहिती प्रदान करण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा ही निवडणुका किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात राज्यशासन वाढू शकते. अशा पद्धतीने सार्वजनिक सेवांचा अधिकार कायदा अंतर्गत माहिती देण्याची प्रक्रिया राबविली जाते.

**सारांश :-**

भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत स्वच्छ, पारदर्शक, भ्रष्टाचार विरहित आणि जबाबदार शासन निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने १२ ऑक्टोबर २००५ रोजी माहितीचा अधिकार कायदा लागू केला. या पूर्वी गोपनियतेच्या नावाखाली इंग्रज सरकारने सुरू केलेला १९२३ चा कायदा लोकशाहीप्रधान आणि प्रजासत्ताक भारतात नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरत होता. परिणामी समाजात असंतोष वाढून प्रशासनाबद्दल जनतेत निरूत्साह दिसून येत होता. माहिती अधिकार कायद्याचा समाजात झालेला परिणाम जाणून घेण्यासाठी तत्कालीन समाजिक आणि राजकीय परिस्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे होते.

माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी गुप्ततेच्या कायद्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणली गेली होती. याशिवाय महाराष्ट्र, राजस्थान, कनार्टक या राज्यामध्ये तत्कालीन माहिती अधिकाराचे कायदे जरी अस्तित्वात असले तरी त्याप्रमाणेच आपल्या राज्यातही अशा प्रकारचे कायदे असावेत. असे इतर राज्यातील नागरिकांना वाटू लागले. असे असले तरी या राज्यातील कायदे अनेक प्रकारच्या त्रुटींनी अस्तित्वात आणले गेले होते. त्यामुळे प्रशासनामध्येही हस्तक्षेप करतांना अडचणी येत होत्या, गुप्तता विषयीची क्षेत्रे माहिती कोणती द्यावी किंवा कोणती देऊ नये या बाबीचा त्यात स्पष्टपणे उहापोह करण्यात आला नसल्याने तत्कालीन सामाजिक व्यवस्था आणि प्रशासन यांच्यामध्ये मतभेद वाढत गेले. सामाजिक व्यवस्थेबरोबरच राजकीय व्यवस्था सुध्दा गैरमार्गाने जात असल्याचे निदर्शनास आल्याने केंद्राचा माहिती अधिकार जनतेसाठी वरदानच ठरला. कारण या कायद्यामुळे प्रशासनात तत्परता तर आलीच त्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांना हा कायदा व्यक्तीस्वातंत्र्याचा महत्त्वाचा घटक वाटल्याने त्याचा प्रशासनावर दबाव वाढत गेला. शासकीय पातळीपासून ते

राज्यकर्त्यांच्या दैनंदिन खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य या कायद्याने केल्याने समाजात त्याचे महत्त्व वाढले.

**आपली प्रगती तपासा (सरावासाठी महत्वपूर्ण प्रश्न) :-**

(१) कॉपीराईट्स कायद्या संबंधी माहिती स्पष्ट करा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

(२) त्रयस्थ किंवा तृतीय पक्षाची माहिती म्हणजे काय ते सांगा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

(३) व्हिसलब्लोअर कायद्याची माहिती विशद करा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

(४) तक्रार निवारण कायद्याचे महत्व सांगा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

(५) सुनावणीचा कायदा यावर निबंध लिहा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

(६) सार्वजनिक सेवांचा अधिकार कायदा यावर भाष्य करा ?

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

**अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :-**

१ Right to Information Act, (2005): A Primer, Tata McGraw-Hill Publishing Company Linited, New Delhi, 2006

२ Human Development Resource Centre, UNDP, New Delhi, 2003,

३ भारताचे राजपत्र असाधारण, भाग – १२, अनुभाग – १, विधी व न्याय मंत्रालय, प्राधीकाराद्वारे प्रकाशित, नवी दिल्ली, २२ डिसेंबर २००५

४ हजारे अण्णा,(२००६) माहितीचा अधिकार २००५, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगण सिध्दी, ता.पारनेर जि. अहमदनगर.

५ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), (२००५) (संपा.) हॅन्डबुक ऑन राईट टू इन्फर्मेशन ॲक्ट, २००५,पुणे.

६ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, (२००२) माहितीचा अधिकार २००२ , शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

७ कचरे प्रल्हाद आणि गायकवाड शेखर, (२०१०) कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे.

८. राज्य माहिती आयोग अहवाल, (२००५) माहिती अधिकार अधिनियम २००५ , प्रथम वार्षिक अहवाल १२ ऑक्टोबर २००५ ते ३१ डिसेंबर २००६ , १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मुंबई.

९. ॲड. वि. पु. शिंत्रे, (मार्च-२०१६) माहिती अधिकार कायदा, राजहंस प्रकाशन प्रा. लि. पुणे. प्रथम आवृत्ती.

❄❄❄❄❄❄❄